
# हळव्या मनाची पाखरे

कथासंग्रह

लेखक

**अ‍ॅड. यशवंत बाबुराव कदम**

(नमनेश्वर)



# हळव्या मनाची पाखरे

कथासंग्रह

ॲड. यशवंत बाबुराव कदम,
नमनेश्वर

कोमल प्रकाशन

**हळव्या मनाची पाखरे / कथासंग्रह**
Halvya Manachi Pakhare / Kathasangrah
पहिली आवृत्ती : १ मे २०२४

**लेखक :**
© ॲड. यशवंत बाबुराव कदम
बी–११०१, एकता मेडोज, सिद्धार्थ नगर,
बोरीवली (पूर्व), मुंबई ४०० ०६६.
भ्रमणध्वनी : ९८९२०४६८६८/९६१९३६०६६१

**प्रकाशक :**
ई–साहित्य प्रतिष्ठान
– श्री.सुनील सामंत
E-mail : esahitya@gmail.com

**मुखपृष्ठ :**
नरेश ठाकूर
मोबाईल : ९८२०३८०२९९

**अक्षर जुळणी :**
चैतन्य आर्टस्, दादर, मुंबई ४०० ०२८.
मोबाईल : ९२२३४७८४८९

‘हळव्या मनाची पाखरे’ या माझ्या कथासंग्रहातील कथांमध्ये वाचकांना काही प्रसंग, नावे, काही सत्य घटना आढळून आल्यास, माझ्या कथेतील वास्तव चित्रण, व्यक्तिदर्शन आणि घटना प्रसंग यांचा वास्तवाशी काहीही संबंध नाही, असेल तर तो केवळ योगायोग समजावा...  ॲड. यशवंत बाबुराव कदम

# हळव्या मनाची पाखरे

हा उत्कृष्ट कथांचा संग्रह ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना ई स्वरुपात विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान लेखक ॲड. श्री. यशवंत कदम यांचे आभारी आहे.

या पुस्तकाचे ई प्रकाशन व विनामूल्य वितरण करण्यास परवानगी दिल्याबद्दल आम्ही कोमल प्रकाशन यांचे आभारी आहोत.

या पुस्तकावरील आपले अभिप्राय ॲड. श्री. यशवंत कदम यांना 98920 46868 या क्रमांकावर कळवावे.

धन्यवाद

सुनीळ सामंत
टीम ई साहित्य
esahity@gmail.com
www.esahity.com
Whatsapp: 99877 37237

ई प्रकाशन तिथी- चार जुलै दोनहजार चौवीस

# अल्प–परिचय

**ॲड.यशवंत बाबुराव कदम**

बी.ए., एल एल बी. ॲडव्होकेट हायकोर्ट, मुंबई

**जन्मतारीख** : १४ ऑगस्ट १९४८

**मूळगांव** : मु. पो. टेरव, ता. चिपळूण, जि.रत्नागिरी

**प्राथमिक शिक्षण** : ज्ञानेश्वर विद्यालय, वडाळा, मुंबई

**महाविद्यालयीन शिक्षण** : रुईया महाविद्यालय, मुंबई
न्यू लॉ कॉलेज, माटुंगा, मुंबई

**नोकरी** : आयकर खाते (मुंबई) येथून वरीष्ठ अधिकारी म्हणून निवृत्त
सध्या – मुंबई उच्च न्यायालयात वकिली

***

खालील साहित्य संस्थांशी स्थापनेपासून सहभाग
काव्यमंच, मुंबई
कोकण मराठी साहित्य परिषद
मराठा मंदिर साहित्य संघ, मुंबई
लोटिस्मा, चिपळूण आणि अनेक सामाजिक संस्था

***

**प्रकाशित साहित्य** :

१. सद्गुरू दत्तात्रय शिंदे महाराजांचे जीवन परिचय १९७५
२. फुलोरा प्रातिनिधिक काव्यसंग्रह २००८
३. जीवनगाणे (काव्यसंग्रह) ५ जून २०१०
४. अंतरंगत (काव्यसंग्रह) २८ फेब्रुवारी २०१०
५. घे भरारी प्रातिनिधिक काव्यसंग्रह २०११
६. जय दुर्गे (आरती संग्रह) २०११
७. भक्तिरंग (काव्यसंग्रह) २०१२
८. बोलविता धनी वेगळाची (काव्यसंग्रह) ११ जानेवारी २०१३
९. तांडव (चरित्र) ११ जानेवारी २०१३
१०. जय दुर्गे (आरती संग्रह) चौथी आवृती
११. श्री कुस्वामीनी आई भवानी वाघजाई देवस्थान, श्री क्षेत्र टेरव मंदिराचा समग्र इतिहास, ८ मे २०१३
१२. बोलके झाड (कथासंग्रह) मार्च २०१६
१३. महामानव... (प्रातिनिधिक कविता संग्रह) मार्च २०१६

१४. दसपटीच्या श्रीरामवरदायिनीचा इतिहास (संपादित एप्रिल २०१६)
१५. आकाशाचे पंख (कथा संग्रह) १८ फेब्रुवारी २०१७
१६. अंतरीचा दीप (अभंगगाथा) १२ एप्रिल २०१८
१७. गडगीचा डोह (कथासंग्रह) २० मे २०१८
१८. देव माणूस (व्यक्तिचित्र) मे २०१८
१९. लोहितचे मानसपुत्र : संत शंकरदेव यांचे चरित्र (मार्च २०१९)
२०. हरिपाठ चिंतन (मार्च २०१९)
२१. वळणावळणाची वाट (कादंबरी) १६ डिसेंबर २०२२
२२. मावळतीच्या सावल्या (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२३. गरुडझेप (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२४. ऊनपावसाचा खेळ (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२५. लंडनचा किनारा (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२६. आडवळणाची वाट (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२७. चांदण्याचा पाऊस (ललित लेख) १ जानेवारी २०२४
२८. गोंदण (कथासंग्रह) ७ मे २०२४
२९. गुडघ्याला बाशिंग (एकांकिका)
३०. हळव्या मनाची पाखरे (कथासंग्रह) १५ मे २०२४

**आगामी पुस्तके** :
- ◆ मावळतीच्या साक्षीने (कविता संग्रह)
- ◆ शब्द स्फोट (हिंदी काव्यसंग्रह)
- ◆ क्षितीजा पलीकडच्या प्रवासात (मराठी काव्यसंग्रह)
- ◆ आध्यात्मिकतेचा अन्वयार्थ – एक अभ्यास (ज्ञानदेव आणि तुकाराम)
- ◆ नक्षत्रांच्या सहवासात (व्यक्तिचित्र)
- ◆ आठवणींचा पेटारा (चरित्र)

**पुरस्कार** : 'जीवन गौरव पुरस्कार' – वंदना प्रकाशन उल्लेखनीय साहित्यिक कार्याबद्दल.
लोटिसमाचा कविवर्य द्वारकादास शेंडे कथा पुरस्कार २०१८ बोलके झाड या कथा संग्रहाला. गो. नि. दांडेकर यांच्या नावाचा कथेला तृतीय पुरस्कार २०१८ कोकण मराठी साहित्य परिषदेचा 'गडगीचा डोह' या कथा संग्रहाला विशेष पुरस्कार, २०१८.

# अर्पण पत्रिका

मी ज्याच्यावर आयुष्यभर प्रेम केले आणि आजही करीत आहे
त्या माझ्या प्रिय भगिनी श्रीमती उर्मिला शरद पवार (ताई)
आणि श्रीमती मनिषा भाऊसाहेब कदम (माई) यांना
हा माझा कथासंग्रह 'हळव्या मनाची पाखरे'
अर्पण करीत आहे.

**– ॲड. यशवंत बाबुराव कदम**
**नमनेश्वर**

# मनोगत

‘‘हळव्या मनाची पाखरे हा माझा दहावा कथासंग्रह. त्यापैकी चार कथासंग्रहाचे मुद्रण झाले. त्यात ‘बोलके झाड’, ‘आकाशाचे पंख’ आणि ‘गडगीचा डोह’ त्याच बरोबर ‘गरुडझेप’ हे चार कथासंग्रह होत. पण त्यानंतरचे सहा कथा संग्रह आणि हा सातवा मात्र इ–साहित्य प्रतिष्ठान या संस्थेचे श्री.सुनील सामंत यांनी इ–बुक वर प्रकाशित केले.

आजवर तीस पुस्तके प्रकाशित झाली आहेत. इ–बुक वरच्या कथा संग्रहांना वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभला. त्यातील चांदण्याचा पाऊस हा कथा संग्रह मराठवाडा युनिर्व्हसिटी ‘एम.ए.’ (First Part) या अभ्यास क्रमासाठी लावला आहे.

आम्ही कोकणची माणसे, कोकणच्या संस्कृतीत वाढलेली. त्याचे संस्कार लहानपणापासून आमच्यावर झालेले, आणि त्यात भाईच्या उर्फ मधु मंगेश कर्णिक यांच्या आशीर्वादाने संस्काराने घडलेली त्यानंतरची पिढी. भाईनी कोमसापची स्थापना १९८९–९० मध्ये रत्नागिरीतील अ.भा संमेलनाच्या व्यासपीठावरून अध्यक्षीय भाषणातून केली. आम्हाला एक व्यासपीठ निर्माण करून दिले. त्यातला एक शिलेदार होण्याचे भाग्य मला लाभले. हात लिहीते झाले. सुरुवातीला कवितेत गुंतलेला मी साहित्याच्या विविध विषयाना स्पर्श करीत राहीलो. त्यात चरित्र, ललीत, संशोधन, नाटक, भाषांतरित साहित्य आहे,  मग मी कथेकडे वळलो.

गेली पाच वर्षे माझे वास्तव्य हे कोकणात आहे. तेथेच कथेला कोंब फुटला. शेकडो कथा लिहिल्या आणि ती पुस्तके इ–बूक वर प्रकाशित झाली. त्या दहा कथासंग्रहांपैकी फक्त चार पुस्तके मुद्रीत झाली. इतर कथासंग्रह इ–बूक वर प्रकाशित झाली आणि हा सिलसिला अजून सुरू आहे.

माणसे वाचण्याचा माझा छंद, त्यांचे चेहरेच बोलतात. त्याच्या विषयी, त्यांच्या विविधांगी जीवन मूल्याशी आणि अलगद उतरतात माझ्या कथासंग्रहात. त्यांची भाषा, साधी, सोपी, प्रेमळ, दयाळू आणि जीवन मूल्यांची रांगोळी रेखाटतात. अगदी प्रेम करणाऱ्यापासून–निभावण्यापर्यंत तेच सारे बोलतात माझ्याशी आणि माझा पांडुरंग लिहून घेतो माझ्याकडून. ही त्याची कृपा म्हणायला हवी.

माझी अजून काही पुस्तके प्रकाशित व्हायची आहेत. त्यात ‘नक्षत्रांच्या

सहवासात' हे मला घडवणाऱ्या अनेक दिग्गज व्यक्तिंबद्दल आहे. त्यात मधुभाई पासून ते आता आताच्या कोमसापच्या कार्यकर्त्यांबद्दल लिहावेसे वाटलेले अजून प्रकाशित व्हायचे आहेत.

अजून एक पुस्तक ललीत वाङ्मयाचे आहे. शिवाय मला चरित्र लिहावेसे वाटले ते ''११ आठवणीचे कपाट'' हे असून मार्गस्थ होत आहे. ते माझ्या शालेय जीवनापासून आज पर्यंतच्या जीवन प्रवासाचा लेखा जोखा आहे. अनेक हिंदी कविता लिहील्या त्याही अजून मार्गस्थ व्हायच्या आहेत. छान, अगदी सर्वांना आवडेल असे.

शिवाय हजारो कविता लिहिल्या गेल्या. त्यातील निवडक अशा 'मावळतीच्या सावल्या', आता क्षितिज पार होताना, मागे वळून पाहतानाच्या भावनांचा मनाला झालेला स्पर्श.

शेवटच्या श्वासापर्यंत माझा पांडुरंग माझी सोबत करील आणि त्याच्या मनात जे काही असेल ते लिहील अशी आशा करतो. मी माझा हा कथासंग्रह माझ्या प्रिय भगिनींना अर्पण केला आहे.

चैतन्य आर्टस्, दादरच्या नंदाताई  साळवी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या सहकारी प्रिया तसेच नरेश ठाकूर यांनी कथासंग्रहाचे मुद्रण /मुखपृष्ठ तयार केले आहे. यातून हा कथा संग्रह सजला आहे. त्यांना सर्वांना धन्यवाद! माझे मित्र कवी व समीक्षक कमलाकर राऊत यांनी या कथासंग्रहाला समीक्षात्मक प्रस्तावना लिहीली आहे. त्याचे ही आभार.

हा कथा संग्रह माझ्या वाचकांना नक्कीच आवडेल अशी आशा करतो आणि इथेच थांबतो!!

**ॲड.यशवंत कदम (नमनेश्वर)**

## प्रस्तावना

## हळव्या मनाची पाखरे – यशवंत कदम

– कमलाकर राऊत

मराठी साहित्यात ‘कथा’ हा प्रकार रसिकप्रिय झालेला आहे, कारण कथेमधून थोडक्या मजकुरातून मोठी गोष्ट सांगितलेली असते. कथांचे अनेक प्रकार असले तरी कौटुंबिक आणि सामाजिक आशयाच्या कथा रसिक वाचकांना खूप जवळच्या वाटतात त्यामुळे या कथांना वाचकाश्रय मिळालेला आहे.

कोणत्याही कलाकृतीमधून संबंधित लेखकाने स्वतःची अनुभूति आणि समाजात वावरत असताना केलेले निरीक्षण आपल्या साहित्यकृतीतून मांडलेली असते, सभोवताली घडलेल्या घटना आणि प्रसंग यांच्याकडे पाहण्याचा प्रत्येक लेखकाचा दृष्टिकोन वेगवेगळा असतो यामुळे लेखक आपल्या शैलीनीसार सदर कथा फुलवित नेतो.

यशवंत कदम हे मूळ कवी आहेत आणि ते कवीमनाचे लेखक आहेत. त्यांनी कवितासंग्रह, व्यक्तीचित्र, चरित्र, अध्यात्मिक लेख, ललितलेख अशा विविध प्रकारच्या लेखनाची पुस्तके प्रकाशित करून मराठी साहित्याच्या दालनात विपुल प्रमाणात भर घातली आहे. ‘हळव्या मनाची पाखरे’ हा त्यांचा दहावा कथासंग्रह आणि एकतीसावे पुस्तक आहे.

यशवंत कदम हे एक नामवंत वकील आहेत.त्यांच्या व्यवसायाच्या माध्यमातून अनेक प्रकारच्या व्यक्तीं त्यांना भेटल्या आहेत त्यांनी अनेक ठिकाणी भटकंती केली आहे. विविध क्षेत्रातील अनुभव त्यांच्या गाठीशी आहेत.यामुळे त्यांनी आपल्या कथांमधून वेगवेगळे कौटुंबिक आणि सामाजिक विषय हाताळले आहेत.

यशवंत कदम यांनी आपल्या कथासंग्रहातील काही कथांमधून योगायोगाच्या घटनांचे वर्णन केले आहे. ‘हळव्या मनाची पाखरे’ या शीर्षक कथेसह ‘नक्षत्राचे देणे’, ‘अदला बदल, ‘खेळ नियतीचा’ आणि ‘दरवळ’ या कथांमध्ये योगायोग घडलेले दिसतात.

‘हळव्या मनाची पाखरे’ या कथेत बाळासाहेब आणि उल्का यांच्या महाविद्यालयातील मैत्रीचे रूपांतर विवाहात झाले नाही तरीही उतार वयात त्यांची झालेली भेट, ‘नक्षत्रांचे देणे’ या कथेतील श्याम व सुमा या विवाहित

जोडप्यात, विवाहानंतर काही दिवसातच झालेली फारकत आणि काही वर्षांनी त्यांची रेल्वे फलाटावर झालेली भेट, दरवळ या कथेतील नंदन आणि स्नेहा या दोन्ही शासकीय अधिकाऱ्यांची अधिकारी पदावर असताना श्रीनगरमध्ये झालेली अकस्मात भेट.

तसेच 'अदला बदल' या कथेमध्ये, सर्वसामान्य स्त्रीने काही कारणास्तव नवजात बालकाला रूग्णालयात सोडून जाणे, एका अधिकाऱ्याने आपल्या पत्नीच्या संमतीने, त्या मुलाला स्वीकारून त्याला एक पोलीस अधिकारी बनविणे, काही वर्षानंतर त्या स्त्रीला अपघात होऊन तिने रूग्णालयातच सोडून दिलेल्या त्या मुलानेच तिचे प्राण वाचविणे, आणि खेळ नियतीचा या कथेतील दोन मित्रांची अचानक भेट होणे, नंतर एका मित्राने सांभाळलेल्या 'सुंदरी' नामक मुक्या मुलीला दुसऱ्या मित्राने सून म्हणून स्वीकारणे आणि तिच्यावर उपचार करून तिचं स्वरयंत्र पुर्ववत करणे, अशा या कथांमधील पात्रांच्या एकमेकांशी झालेल्या भेटी आणि घडलेल्या घटना योगायोगाने घडलेल्या दिसतात. मात्र यामुळे यातील संबंधित पात्रांच्या जीवनाला मिळालेली नवी दिशा सकारात्मक संदेश देणारी आहे.

'आभास' या कथेमधून आपल्या पूर्वजांच्या वास्तव्याने पुनित झालेल्या वास्तूची देखभाल सतत करत राहण्याचा संदेश दिलेला आहे. 'अस्वस्थ आत्मा' या कथेमधून मुंबईच्या पोलीस खात्यातील नोकरी करून आपल्या गावाकडे जाऊन आपल्या पूर्वजांनी लावलेल्या बागेची देखभाल करून सात आठ वर्षांनंतर तेथेच देह ठेवणाऱ्या एका मुंबईच्या जयराम नामक निवृत्त इसमाची ही कथा आहे.

'गुरुदक्षिणा' या कथेतून शाळेतील मुलांनी व्यावसायिक शिक्षणा-बरोबरच, शासनाच्या स्पर्धा परीक्षेतही यश मिळवून उच्च पदावर आरूढ व्हावे, ही आपल्या शिक्षकांची इच्छा पूर्ण करणाऱ्या मंदारची कथा सांगून समाज प्रबोधन केले आहे.

'ध्यास भक्तीचा' या कथेतून मुंबईतील महत्वाच्या ठिकाणी राहणाऱ्या साई भक्तांचे श्रध्दास्थान म्हणजेच साई मंदिर वाचवण्यासाठी साईभक्तींनी केलेल्या यशस्वी प्रयत्नांचे वर्णन केले आहे. 'स्फोट' या कथेमधून एका वाईट घटनेमुळे एक चांगली घडलेली दाखविली आहे. कोलदांडा या कथेमधून पुनर्विवाहाला चालना देण्यासाठी आनंदराव नामक समाजसुधारकाने सुरू केलेल्या प्रथेची अंमलबजावणी करण्यासाठी स्वतः

लेखकाने हातभार लावलेला येथे दिसतो. ओलावा वात्सल्याचा या कथेतून एका धनाढ्य व्यक्तीच्या घरावर धाड पडल्यावर घरातील एका लहानशा मुलीच्या कृतीने व बोलण्याने अधिकाऱ्याच्या मनालाही कसा पाझर फुटतो हे दाखवून दिले आहे.

शाप उशाप या कथेत सुनिता आणि सुहास यांचे विवाह नंतर वेगळे होणे, त्यांनी विकलांग मुलांना जन्म देणे, कालांतराने त्या मुलाचे निधन होणे, नंतर त्यांनी दोन मुलांना दत्तक घेणे आणि आनंदाने संसार करणे अशी सुखांत कहाणी आहे. पिंपळपार या कथेतून कदम यांनी बालपणीच्या आठवणी आणि गावातील काही आठवणींना उजाळा दिला आहे. जीवन साफल्य मधून आई-वडिलांपासून दूर झालेल्या दहा-बारा वर्षे वयाच्या मुलाने जिद्द, चिकाटी आणि मेहनत या जोरावर मिळवलेल्या यशाची गाथा सांगितली आहे याशिवाय शासकीय सेवेत भ्रष्टाचार न करताही चांगल्या प्रकारे जगता येते, असा वस्तुपाठ येथे घालून दिला आहे.

यशवंत कदम यांनी कथा लेखनासाठी स्वतःची एक वेगळी शैली निर्माण केलेली आहे. त्यांच्या कथांतील पात्रे त्यांच्या स्वभाव गुणधर्मानुसार मूर्त झालेली आहेत. सर्व पात्रांना माणुसकीचे भान असलेले दाखविले आहे.

यशवंत कदम यांनी समाजात घडणाऱ्या घटना सूक्ष्म निरीक्षणातून शब्दबध्द केल्या आहेत. त्यांनी वर्णन केलेल्या प्रसंगांना दृश्यत्मकता प्राप्त झालेली आहे. कथांची मांडणी अगदी सहज परंतु परिणामकारकरीत्या केलेली दिसते, त्यांच्या निवेदन शैलीत रसिक वाचकाला सोबत घेऊन जाण्याची ताकद आणि कथानकात गुंतवून ठेवण्याचे हातोटी आहे.लेखक मुळात कवी असल्याने त्यांच्या लेखनात काव्यात्मकता प्राप्त झाली आहे.

यशवंत कदम यांच्या कथा म्हणजे त्यांच्या जीवनातल्या अनुभवांचा परिपाक आहे. या कथांमधून जीवनातील सुख-दुःखाची परिस्थितीची जाणीव व्यक्त झाली आहे.

यशवंत कदम यांना असेच रसिकप्रिय लेखन करण्यासाठी निरंतर ऊर्जा मिळत राहो ही सदिच्छा आणि पुढील लेखनासाठी माझ्या लाख लाख शुभेच्छा.

**– कमलाकर राऊत.**

# अनुक्रमणिका


१. हळव्या मनाची पाखरे

२. आभास

३. नक्षत्रांचा खेळ

४. अस्वस्थ आत्मा

५. गुरुदक्षिणा

६. अदलाबदल

७. ध्यास भक्तिचा

८. खेळ नियतीचा

९. स्फोट

१०. कोलदांडा

११. ओलावा वात्सल्याचा

१२. शापउशाप

१३. पिंपळपार

१४. जीवन साफल्य

१५. दरवळ

# हळव्या मनाची पाखरे !

बाळासाहेब महसूल खात्यातून निवृत्त झाले. आणि मुंबईतच सध्या स्थायिक होण्याच्या इराद्याने त्यांनी त्यांची दादरमधली जागा विकायला काढली. खरे तर खूपच जुनी इमारत, त्यांच्या आजोबांनी बांधलेली. छान बंगली वजा. त्यांचे आजोबा, वडील आणि सगळे कुटुंब हिऱ्याच्या व्यापारात होते. हिऱ्यांना पैलू पाडण्याचा त्यांचा व्यवसाय खूप छान चालला होता. पण दुसऱ्या महायुद्धाच्या धबडक्यात तीन तेरा वाजले धंद्याचे, मुंबईत भीतीचे वातावरण, बाळासाहेबांची सख्खी चुलत भावंडे या व्यवसायात होती. त्यांनी सरळ कोकण गाठले. नाही परतले ते कधी मुंबईत आणि मुंबईत कस्टम मध्ये नोकरी करणारे बाळासाहेब. त्यांच्या पत्नी आणि मुलेच काही ते उरले मुंबईत.

युद्ध संपले. मुंबईचे मानवी जीवन हळूहळू स्थिरावत गेले. अजून बाळासाहेबांची नोकरी चालू होती. ते अधिकारी झाले. आणि ऐंशीच्या दशकात निवृत्त झाले. पत्नी ही... त्यांची जी मुंबई हॉस्पीटलमध्ये सेवा करीत होती ती ही त्यांच्या निवृत्ती नंतर निवृत्त झाली. त्यांना दोन मुलगे V. J.T.I. मधून इंजिनिअर झाले आणि मुंबईमध्येच स्थिर झाले. चांगल्या नोकऱ्या, चांगला पगार, पण याचवेळी परदेशात उत्तम संधी उपलब्ध झाल्याने, त्यांनी लंडनमध्ये स्थयिक होण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी बाळासाहेब नुकतेच निवृत्त झाले होत.

बाळासाहेबांची मुले तिकडेच स्थायिक झाली आणि लग्नेही तिथल्याच हिंदु मुलींशी केल्याने त्यांना तिथलेच नागरिकत्व मिळाले. विसरले हिंदुस्थान, आई-बाप आणि बाळासाहेबांचे सगळे संबंध दुरावले ते कायमचे. आणि बाळासाहेब, त्यांची पत्नी सुनिता एकाकी पडले. यायचे केव्हा केव्हा फोन. पण त्यात मायेचा, प्रेमाचा ओलावा त्यांना कधीच जाणवला नाही, येवढे मात्र खरे.

आता दादर मधली रानडे रोड वरची ही टुमदार हवेली वडिलोपार्जित मिळकत बाळासाहेबांची झाली होती. चार मजली ही इमारत, खाली दुकाने, वरच्या दोन मजल्यावर रहाण्यासाठी प्रशस्त अशी जागा होती. पहिल्या मजल्यावरची जागा त्यांनी एका हॉस्पिटलला भाड्याने देऊ केली. या सगळ्यातून सध्या त्यांना भाडे येत असे. तो त्यांना निवृत्ती व्यतिरिक्त चांगले मिळकतीचे साधन होते. शिवाय या बंगल्यातील जागेवरचे डिपॉझीट, यातून

त्यांना चांगला इंटरेस्ट मिळत होता. पण त्यासाठी त्यांना त्यांच्या मालवणच्या सगळ्या मालमत्तेवर पाणी सोडावे लागले, ते कायमचे.

पत्नीच्या निवृत्तीनंतर बाळासाहेब उभयता आनंदात आपले जीवन व्यतीत करीत होते. खूप सुखात म्हणता येणार नाही. पण वाढत्या वयामुळे भूतकाळच आता अधिक वरचढ व्हायला लागला होता. त्यात सुनिताचे आजारपण त्यात तिची होणारी परवड त्यांना सहन होत नव्हती. त्यांचे मन आताशा खूपच अस्वस्थ होत होते आणि त्यात पत्नीचे निधन झाले.

त्यानंतर जवळजवळ वर्षभर बाळासाहेबांचे जीवन, हळूहळू अस्वस्थतेने ग्रासले होते. घराच्या चार भिंतीत मन लागेना. सैरावैरा पळते, पण त्याला जराही स्थिरता नव्हती. मुलांची आठवण येई पण तो प्रेमाचा झरा केव्हाच आटून गेला होता. आता उरले होते एकटेच बाळासाहेब आणि एकाकीपणाची शिकार होऊन त्यांचे अंतरमन अस्वस्थ झाले होते. आता खरेतर त्यांना हवा होता कोणाच्या तरी प्रेमाचा सशक्त आधार पण त्यासाठी दादरच्या घराच्या चार भिंती त्यांना सोडणे अगत्याचे होते. ते धडपडत होते. पण मार्ग काही सापडत नव्हता.

त्याचे असे झाले, बाळासाहेबांचे तरूणपण दादरलाच गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण दादासाहेब रेग्यांच्या बालमोहनमध्ये व महाविद्यालयीन शिक्षण रुईया महाविद्यालयात. शेवटी त्यांचे मन हे तरूण, अनेक सुंदर पाखरे वर्गात असायची. त्यातल्या एका मुलीवर त्यांचे मन जडले. अगदी रात्रंदिवस ते त्या मुलीच्या प्रेमात हरवून गेले. पण त्या काळातल्या सामाजिक, सांस्कृतिक वातावरणात सारेच व्यक्त करणे त्यांना शक्य नव्हते. दिवस रात्र त्याच मुलीचा म्हणजे उल्काचा त्यांनी ध्यास घेतला होता. पण शिक्षण पूर्ण होण्याआधीच त्यांना नोकरीची उत्तम संधी चालून आली आणि तीही गुजरातच्या पोरबंदला. त्यामुळे प्रेमाच्या या झऱ्याला निदान सध्यातरी फुलस्टॉप द्यावा लागला.

आता तुम्ही हे म्हणाल ते बाळासाहेबांचे प्रेम एकतर्फी होते का? पण तसे नाही उल्काच्याही मनाला हे राजबिंडे रुप स्पर्शून गेले. कॉलेजमध्ये अनेक कार्यक्रमात वावरताना बोलणी होत. बाळासाहेब हे एक हरहुन्नरी कलाकार होते. त्यांना पेटी, सतार, तबला ही सगळी वाद्ये लहानपणा पासून अवगत होती. कॉलेजच्या गॅदरींगमध्ये याचा प्रत्यय सर्व मुलामुलींना आला. आणि

उल्का त्यांच्याकडे ओढली गेली, पण दुरूनच ही गोष्ट कधीच बाळासाहेंबापर्यंत पोहोचली नाही. आणि या प्रेम प्रकरणाला पालवी फुटण्या आधीच सुकून गेली.

दोन जीव दोन दिशेला भरकटले आणि त्यांचे मार्ग वेगवेगळे झाले. बाळासाहेब जात्याच हुशार, त्यांना भराभर प्रमोशन मिळत गेली आणि हिंदुस्थानातील अनेक बंदरातील कस्टम ऑफीसमध्ये त्यांच्या बदल्या होत गेल्या. या सगळ्या दहा वर्षाच्या काळात हा प्रेमाचा झरा बाळासाहेबांच्या मनातून पूर्ण पुसला गेला नाही. पण महायुद्धाच्या काळात जी परिस्थिती निर्माण झाली त्यात तो थोड्या फार प्रमाणात पुसला गेला. कारण तो काळच फार कठीण होता. त्यावेळी त्यांची पोस्टींग कलकत्याला होती. लग्नाचे वय होत होते. घरून बाळासाहेबांनी लग्न करावे असा प्रचंड दबाव येत होता. त्यात उल्का कोठे असेल याचा थांग पत्ता नव्हता.

कलकत्यात बाळासाहेबांचे एक मित्र लांबचे नातेवाईक रहात होते. बाळासाहेब एकटे असल्याने या परिचित कुटुंबात त्यांचे जाणे येणे होते. त्यात हंबीररावांची कन्या सुनिता ही उपवर झाली होती. बाळासाहेबांचा तिचा सहवास म्हणजे परिचय गेल्या वर्षभराचा होता. आणि दोन्ही कुटुंबांनी त्यांच्या लग्नाचा बार लडवायचा ठरवून, लग्न कलकत्यातच झाले. बाळासाहेबांचा प्रपंच कलकत्यातच सुरू झाला. त्याला दोन धुमारे फुटले आणि दोन वर्षांनी त्यांची मुंबई कस्टम ऑफीसमध्ये आल्यावर हे कुटुंब मुंबईला स्थलांतरित झाले. त्यावेळी बाळासाहेब सुपरिटेंडेंटच्या पोस्टवर होते.

त्यांच्या नोकरीच्या एकाकीपणात त्यांना विरंगुळा होता तो त्यांच्या संगीत साधनेचा. फावल्या वेळात ते भावगीते, चित्रपटातील जुनी गाणी, स्वरसाधनाही ते करीत असत. वेळ जाई, मन रमे सप्तसुरात. पण लग्न झाले आणि या सगळ्या गोष्टी बासणात बांधल्या गेल्या त्या कायमच्या. त्यांच्या पत्नीला काडीचाही स्वारस्थ नव्हते बाळासाहेबांच्या या छंदात. पण पूर्णपणे हा झरा काही आटला नव्हता. त्यात नंतरच्या पत्नीच्या आजारपणात या त्यांच्या छंदाने डोके वर काढले. पण त्यातही त्यांचे मन काही त्यात रमत नव्हते.

पण जेव्हा पत्नीचे निधन झाले. त्यांच्या या छंदाने पुन्हा उचल खाल्ली. सगळ्या साधानांचा साज घराच्या गच्चीवरील प्रशस्त दालनात त्यांनी मांडला आणि मनाला थोडा फार विरंगुळा मिळाला. पण आताशा बाळासाहेबांचे

उल्काचे प्रेम पुन्हा जागृत झाले. कॉलेज सोडल्याला आता ३०-३२ वर्षे होऊन गेली होती आणि विरंगुळा म्हणून त्यांचे पाय सकाळ संध्याकाळ रूईया महाविद्यालयाच्या आयलँडवर येऊन विसावत. आठवीत भुतकाळातले गुलाबी दिवस, आशाळभूतपणे अनेक प्रश्न त्यांच्या मनात घोळत रहात. ती कुठे असेल? तिची भेट होईल कां? आणि मनाचा मोहर पुन्हा फुलेल? पण तसे काही होत नव्हते. या सगळ्या गडबडीत आता बाळासाहेबांनी वयाची त्रेसष्ट वर्षे केव्हाच पार केली होती.

गेल्या दोन तीन महिन्यात त्यांचे मन जराही स्थिर नव्हते. कशातच लक्ष लागत नव्हते. सारखी आठवण यायची ती उल्काची आणि तिची छबी दिवस रात्र तरळत रहायची अंर्तचक्षुपुढे. तिचे ते सुंदर मोहक ध्यान, निटनेटकेपणा मागे बांधलेला केसाचा झुपका, पाणीदार डोळे नी हसत मुख ओठ. सारे तरळत रहायचे डोळ्यांपुढे, वेडा पीसा व्हायचा बाळासाहेबांच्या मनाचा बाज आणि ते हरवून जायचे. अगदी दिवसरात्र. खरोखर हे प्रेम अगदी हृदयापासूनचे होते. त्याला नव्हता वासनेचा स्पर्श. ओढ होती ती अगदी नैसर्गिक आणि कधी कधी बाळासाहेबांना हुंदका फुटे, डोळे पाणावत आणि मिटल्या डोळ्यापुढे उल्का तशीच, अगदी तशीच संचार करीत राही. आता तर ती भावनाच अगदी तीव्र होत गेली होती. त्यामुळे त्यांना वाटे खरोखरोच ती आपल्याला भेटेल कां?

त्यांचे मन आता त्या सुरावटीत जराही स्थिर व्हायला मागीत नव्हते, कधी कधी तर सुरांच्या गाण्यात मध्येच विसर पडे. कोणता सुर आपण आळवत आहोत हे ही त्यांच्या ध्यानी येईना. शिवाय पेटीवरच्या फिरत्या बोटांना कळेना आपल्या वाजवण्यातून कोणते शब्द लमटतात. शेवटी त्यांनी त्या सगळ्या सुरांच्या साजांना पूर्णपणे बासणात बांधून ठेवले. आणि गेले महिना दोन महिने त्याकडे त्यांनी ढुंकूनही पाहिले नाही.

कां, जाणे पण आता त्यांना त्यांच्या घराच्या भिंती, घर आणि दादरचा परिसर ही आवडेनासा झाला होता. त्यानंतरच्या दोन रात्री अगदी बेचैनीत गेल्या. डोळ्याला डोळा लागला नाही. या कुशीवरून, त्या कुशीवर शरिराची सारखी होणारी तळमळ त्यांना जराही चैन पडेना. आताशा कोण जाणे, पण आपण कोठेतरी दुर निसर्गाच्या सानिध्यात जावे. नदी, नाले, वहाते पाणी आणि दूर पूर्वेला दिसणारे सह्याद्रीचे कडे याकडे त्यांचे मन ओढ घेत होते.

अनावर झाली होती त्यांना ती ओढ आणि त्यांनी ठरवले लद्या आपण आपली मर्सीडीजच घेऊन जायचे. आदल्या दिवशी त्यांनी गाडी पेट्रोलने फूल केली. आणि सकाळी सुसाट वेगाने बाळासाहेब कर्जतकडे निघाले.

तसेच ते फारसे देवभोळे नव्हते मंदिरात केव्हा गेले तर त्यांचे पाय वळायचे सिद्धीविनायक मंदिराकडे. का? कोण जाणे आपण जीवाची मुंबई करावी तसे भन्नाट वेगाने वाशीचा परिसर पार करून पनवेल गाठून पुढे निघाले. त्यांनी प्रथम पंचमुखी हनुमंताच्या मंदिरापुढे गाडी पार्क केली, लांबूनच नमस्कार करून त्यांचे पाय वळले ते बाजूच्या भजीच्या दुकानात तेथे निवांत बसून त्यांनी एक प्लेट भजी आणि कडक चहाची ऑर्डर दिली. आणि ती संपवून पुढचा सुरू केला.

पनवेल कर्जतमधला दोन्ही बाजूच्या हिरवळीचा प्रदेश त्यांना खूप भावला. आज रविवार असल्याने रस्त्याला गर्दी किरकोळ... का कोण जाणे त्यांना शिट्टी वाजवावीशी वाटली, चेहऱ्यावर कधी नाही ते स्मित हास्य आज साकारले होते. आणि आज अधीर झाले मन. उल्काची सतत आठवण येऊ लागली, तिचा तो तेव्हाचा चेहरा साकारला अंत: चक्षुपुढे. खरच ती असेल का या जगात? असेल तर ती कशी असेल? ओळखेल का मला? तिच्या आयुष्याचे काय झाले असेल? जशी ती पूर्वी चेहऱ्यावर स्मित हास्य घेऊन वावरायची तशीच आता असेल काय? की प्रकृतीच्या तक्रारींशी झगडत प्रत्येक दिवस पुढे ढकलीत असेल?... आणि त्यांची गाडी गगनगिरी महाराजांच्या आश्रमाजवळून जाताना क्षणभर थांबली. का थांबली? पुढचा सगळा रस्ता डोंगराचा पुण्याकडे जाणारा होता. त्यांनी डावीकडे टर्न घेतला, गाडी पार्क केली आणि त्यांचे पाय आश्रमाकडे वळले. तसा त्यांनी आजवर कोणा गुरूंचा, साधू पुरूषांचा अनुग्रह घेतला नव्हता. पण तो परिसर सुंदर, मोहक, प्रसन्नदायक पाहून ते आश्रमात आले.

आश्रमाच्या डाव्या बाजूला एक फलक त्यांनी पाहिला. त्यात अनेक गोष्टींचा समावेश आणि खाली महाप्रसादाची वेळ १ ते ३ अशी होती. आता तो वाचून त्यांच्या मनात जेवणाची इच्छा निर्माण झाली. आणि त्यांचे पाय भटारखान्याकडे वळले. बरेच भक्त पूर्वीच प्रसाद घेत होते. बाळासाहेबांनी सेल्फ-सर्व्हिस असल्याने प्रसाद घेतला आणि बाहेरच्या स्वामींच्या समाधीजवळ जाऊन बसले. कोण जाणे पण आज त्यांना कमालीची शांती

मनाला जाणवत होती. तिथला सारा परिसरच त्यांना भक्तिमय वाटत होता. साष्टांग दंडवत त्यांनी स्वामींना घातले आणि मागे पहातात तर झुळझुळ वहाणारे नदीचे पाणी पाहून त्यांचे पाय पाण्यात सोडावे हा मोह त्यांना आवरेना. ते पाण्यात लतरले छोटे छोटे मासे त्यांच्या पायाला झोंबत आहेत असे त्यांना जाणवले. त्या होणाऱ्या गुदगुदल्याच्या स्पर्शाने क्षणभर त्यांना लल्काचा विसरला पडला. आणि या आश्रमाबाबत ऐकलेल्या अनेक आख्याईकांची पाने उलटत ते बसले. पुर्वी म्हणजे स्वामी सकाळी नदीच्या पाण्यात स्वत: तासनतास बसत. भगवंताचे स्मरण करीत. या नदीचे पाणी झाडा-झूडपातून, वृक्षवेलीतून मारा काढीत खाली जात होते. खूप मोहक दृश्य होते ते. त्यात हरवले बाळासाहेब. आपण इथल्या रेस्टहाऊसमध्ये चार दिवस रहावे, इथला परिसर पहावा, मनसोक्त हुंदडावे असे ठरवून त्यांनी प्रथम रेस्ट हाऊसमध्ये नोंदणी केली आणि आपल्या गाडीत बसून एसटी स्टँडपर्यन्तचा परिसर धुंडाळला. त्या परिसरात अनेक लोकांनी आपली घरे बांधून फळबागा फुलवल्या होत्या. खूप मोहक वाटला बाळासाहेबांना तो परिसर. आणि याच भागात एक बंगला बांधावा अशीच बाग फुलवावी, फळा फुलांची लागवड करावी आणि आपले उर्वरीत आयुष्य येथेच घालवावे हे त्यांनी मनाने नक्की केले. आणि त्या दृष्टीने आश्रमात परत येऊन तिथले व्यवस्थापक राणे यांना भेटून एखादा छान प्लॉट मिळतो का? याबाबत चर्चा केली. त्यांनी व्यवस्थापकांनी त्यांना आश्‍वस्थ केले व मदतीचे आश्वासन दिले. त्या रात्री बाळासाहेबांना प्रथमच छान झोप लागली आणि मनावरचा ताण लतरला.

दुसऱ्या दिवशी त्यांनी जागा पाहिल्या व सर्व सोईंनी युक्त म्हणजे पाण्याचा आसरा, रोड टच जागा इ. ने योग्य प्लॉट निवडला व तातडीने कागद-पत्रे करण्याची सुचना राणे यांना दिल्या. येथ पर्यंत पाच दिवस कधी गेले त्यांना कळलेच नाही. रोज ते सकाळी उठत, आंघोळ करून समाधी जवळ आरत्यांना येत. या अर्ध्यातासात त्यांचे मन शुन्यात जाई आणि मनाला चिरंतन शांतीने व्यापले आहे असा भास क्षणोक्षणी होई. मग संध्याकाळच्या शेजारत्या व महाप्रसाद घेऊन थोडा वेळ चिंतन होई. हे पाच दिवस म्हणजे त्यांना सापडलेला परीसच होता असे म्हटले तर चुकीचे ठरू नये.

नंतर बाळासाहेब मुंबईला आले. घराखालची चारी दुकाने चांगल्या

भावात विकली. येवढ्यात ती वास्तु रिडेव्हलपमेंटला काढण्यात आली. आता वेळ कमी होता. त्यांनी आपल्या घरातले सामान समोरच्या इमारतीत स्थलांतरित केले आणि कर्जतला आपल्या प्लॉटवर छान बंगला बांधण्याच्या कामाला लागले. नरीमन नावाच्या एका नामचीन आर्किटेकला त्यांनी ते कॉन्ट्रॅक्ट दिले. आणि हा हा म्हणता कपाऊंड वॉल बांधून घेतली व वर्षभरात बंगला तयार झाला. वास्तुचे वास्तुशांत त्यांनी भोदे या ब्राम्हणाकडून करून घेतले आणि ऐन थंडीत जानेवारीत त्यांनी आपले सामान तेथे ठेवले. मुंबईचा एक नोकर शाम त्यांनी सोबत नेला होता. पण त्याला काही ते ठिकाण आवडेना, एकाकी जंगलात मग त्यावर तोडगा त्यांनी शोधला. त्या आश्रमातला एक छान खानसामाच त्यांनी आपल्या सोबत नेला. छान जेवण करी, शिवाय तो त्या भागातला असल्याने बाजारहाट करणेही तो करी. त्याला विशेष म्हणजे सर्व प्रकारच्या गाड्या चालवायला येत. उत्तम पगार देऊन कामाला ठेवले त्याला. त्याचे नाव रामू.

बाळासाहेबांचे तेथील वास्तव्य फारच सुखात चालले होते. पण त्यात त्यांचे त्या आश्रमात सकाळ संध्याकाळ जाणेही चालू होते, ते आरत्या होई पर्यंत थांबत आणि आपल्या श्रेयस बंगल्यात परत येत.

सहा महिने होऊन गेले होते बाळासाहेबांचे कर्जत ला येऊन. एवढ्यात टी.व्हीवर एक बातमी झळकली की, कर्जतला वीस एकराच्या जागेवर एक वृद्धाश्रम बांधण्याची योजना आखली जात आहे. हा वृद्धाश्रम मातोश्री या नावाने हिंदु हृदय सम्राट आदरणीय बाळासाहेब ठाकरे बांधण्याचे काम लौकरच सुरू होणार आहे आणि विशेष म्हणजे तो प्लॉट श्रेयसच्या बाजूचा आहे, फक्त पाच मिनिटाच्या अंतरावर.

तसे पाहिले तर आज आपल्या बाळासाहेबांच्याकडे आज आठ कोटीची माया होती. त्याचा विनियोग योग्य प्रकारे करावा हे त्यांच्या मनात होते. या सत् कार्याला आपलाही हातभार लागावा यासाठी त्यांनी ‘पन्नास’ लाखाची रक्कम देण्याचे मनोमन ठरवले होते.

त्या वृद्धाश्रमाच्या भूमीपूजनाचा दिवस होता. बाळासाहेब ठाकरे, सपत्नीक आले होते... प्रचंड गर्दी होती. आपल्या बाळासाहेबांनी त्यांना त्यांच्या बंगल्यात येण्याची विनंती केली व सर्व पाहुण्यांची चहा पाण्याची व्यवस्था केली आणि पन्नास लाखाचा चेक हिंदु हृदय सम्राटांच्या हवाली

केला. कां! कोण जाणे पण या वृद्धाश्रमाबद्दल बाळासाहेबांना खूपच आकर्षण वाटत होते. कधी कधी ते त्या परिसराला भेट देत. याचे कारण आता त्यांना त्या वृद्धाश्रमाचा शेजार त्यांना झाला होता. लोकांची रहदारी वाढेल, कधी तरी जेव्हा वुद्धत्वात जेव्हा विकलांगता येईल, त्यावेळी आपण त्यातला एक भाग असू असे त्यांना वाटत होते.

या सगळ्या गडबडीत वयाची सत्तरी केव्हा येऊन ठेपली हे बाळासाहेबांना समजले नाही. थोडी फार शिथीलता शरीराला जाणवत होती पण मन अजून तसेच तजेलदार होते. त्यात उल्काच्या आठवणीच्या झुळूकेने खूप आल्हाद वाटायचा त्यांना. आता तर त्यांना असे वाटत होते की, उल्काची भेट हे स्वप्नचं राहिल कां? असेल कां ती या जगात? आपण मात्र तिच्या ओढीने एक एक पाऊल क्षितीजाकडे टाकीत जात आहोत; मावळतीच्या किरणात विलीन होण्यासाठी घेऊन आपले प्रेमाचे गाठोडे पुढच्या जन्मीच्या नवरंगी दुनियेत जी अनभिज्ञ आहे आपल्यालाही.

त्या मातोश्री वृद्धाश्रमाच्या उद्‌घाटनाचा दिवस आला. काही संबंधीतांना माहिती होते बाळासाहेब छान गातात, खूप चांगली मैफील व्हावी अशी मनिषा आश्रमातल्या त्यांच्या सहकाऱ्यांना वाटत होते. सेना प्रमुख, कुटुंबीय, सगळे बुजुर्ग नेते, कार्यकर्ते आणि या वृद्धाश्रमात ज्यांनी नोंदणी केलीत ते सगळे वृद्ध स्त्री-पुरूषही या कार्यक्रमाला हजर होते. सर्व मिळून दोनशे लोकांची व्यवस्था त्या वृद्धाश्रमात होणार होती. हा मातोश्री वृद्धाश्रम तसा प्रशस्त दोन मजली होता. प्रत्येक सदस्याला वेगळी सुंदर व्यवस्था होती. पण अजून अनेक सोई सदस्यांना उपलब्ध करून द्यायच्या होत्या. त्यात वैद्यकीय सोयी, औषधोपचाराची चांगली व्यवस्था, वाचनालय, व्यायाम शाळेची व्यवस्था, खेळाची साधने जसे कॅरम, बुद्धीबळ, इ. ची सोय अजून बाकी होती, पण सध्या सगळेच सदस्य येणार नव्हते पण महिनाभरात आश्रमात सर्व सदस्य यावेत अशी अपेक्षा होती, रोज कोणी ना कोणी येतच होते. खरे तर या वृद्धाश्रमातल्या सोयीसुविधांचा पाहून या वृद्धाश्रमाला प्रचंड मागणी होती. पण तेवढी जागा उपलब्ध नसल्यामुळे सध्यातरी ते शक्य नव्हते.

१ मे च्या शुभमुहुर्तावर या वृद्धाश्रमाचे उद्‌घाटन ठरले. सकाळ पासून हजारो लोक येत होते. थोडा फार राजकीय रंग यात आला होता. सगळीकडे भगवे झेंडे लावण्यात आले होते. प्रमुख पाहुण्यांचे आगमन झाले. त्यात

वेळचे मुख्यमंत्री मनोहर जोशी, यांच्या संकल्पनेतून या वृद्धाश्रमाची योजना साकार झाली होती. या परिसरात एक मोठे स्टेज उभारले होते. उद्‌घाटनाचा कार्यक्रम संपला व मग करमणुकीचा कार्यक्रम. प्रथम पहिला एक तास बाळासाहेबांच्या सुगम संगीताने छान सुरूवात झाली. बाळासाहेबांनी आपल्या बहारदार आवाजाने श्रोत्यांची मने जिंकली. त्यानंतर ५/६ गायक आपली क्लासिकल व चित्रपट गाण्यांचे कार्यक्रम सादर करणार होते.

संयोजकाने प्रथम नाव उच्चारले ते श्रीमती उल्का साळवी या गायिकेचे आणि लगबगीने त्या स्टेजवर आल्या. त्यांनी मराठी भावगीतातील दुर्मिळ पाच गाणी सादर केली. त्यात रागदारीतील ‘‘हे चंद्रमा...’’ या गाण्याला श्रोत्यांनी वन्समोर दिला. त्याही बरोबर लल्काने अनेक सुरेल गाणी सादर केली. प्रेक्षक, श्रोत्यांनी टाळ्यांच्या कडकडात तिला अभिवादन केले.

तिचे गायन चालू असताना बाळासाहेब आपल्या संगीत साधनांची बांधा-बांध करीत उजव्या कोपऱ्यावर आपल्या सहकाऱ्यांसोबत लभे होते. उल्काने पूर्वी कॉलेजमध्ये असताना अनेक गॅदरींगमध्ये आपल्या गायनाची चमक दाखविली होती. हे तिचे गायन चालू असताना बाळासाहेब तिच्या चेहऱ्यावर लक्ष केंद्रीत करीत लभे होते. ही तिच तर नसेल? पण कसे शक्य आहे. गेली अनेक दशके दुरावलेली आपली प्रेयसी अशी या अनोख्या ठिकाणी दिसावी? शिवाय तिच्यात पडलेला चेहऱ्याचा फरक, अंगयष्ठी, पिकलेले केस यातून हे ध्यान तेच कां? असा प्रश्न बाळासाहेबांना पडला होता. पण तिच्या त्या सुरेल स्वरांच्या सुरवटीने बाळासाहेबांना मोहिनी घातली होती. एवढे मात्र खरे. बाळासाहेब सुरांचे जाणकार होते. परमेश्वराचे देणे ते. आणि ते लाभणेही देवाची कृपाच म्हणायला हवी. ते हरवले लल्काच्या गाण्यात, गाण्याच्या सुरावटीत आणि त्या सुंदर अदाकरीत सामान गाडीत चढवले तरी ते तेथेच त्या कोपऱ्यावर लभे होते...... आणि तीचे गाणे आटोपले. श्रोत्यांना अभिवादन करून ती उजवीकडे वळली आणि खाली लतरणार.... एवढ्यात तिचा पाय तिच्याच साडीत अडकला आणि तिचा तोल गेला.... क्षणाचाही विलंब न लावता बाळासाहेबांनी तिला सावरले..... थँक्स् म्हणत ती खाली उतरली.... पण तेवढ्या दोन मिनिटात बाळासाहेबांना त्या सुकूमार चेहऱ्याची ओळख पटली आणि.....

‘‘उल्का!’’ बाळासाहेब.

''हां बाळ! उल्का म्हणजे तुम्ही मला ओळखले तर! तीस वर्षाचा काळ मध्ये लोटला तरीही?'' उल्का.

''उल्का! तुझ्या आठवणीशिवाय अख्ये आयुष्य सुने सुने झाले होते माझे! कसा विसरेन मी! आपली ताटातुट झाली... आणि आज येथे भेट होते आहे! यायची काय गं माझी आठवण तुला?'' बाळ.

क्षणभर थांबून..... ''हो! नाही विसरू शकले मी तुला! तुझा चेहरा नाही स्मृती आड मी करू शकले!'' उल्का.

ही भेट दोन प्रेमळ जिवांची काहीतरी नवे संकेत देणारी आहे. हरवलेला आनंद, सुख, प्रेमाचा ओलावा अधिक गडद होणार याचा हा संकेत आहे. असेच बाळला वाटले. आज हा अविस्मरणीय प्रसंग अनेपक्षीत घडला याचेच आश्चर्य दोघांना वाटले असणार.

''उल्का! थांबा! मला काही खूप बोलायचे आहे तुझ्याजवळ! मला एक सांग तू येथे कशी? आणि आज अनपेक्षीत पणे तुझी माझी भेट व्हावी?'' बाळ.

''मी काय सांगू? नियतीच्या मनात काही तरी वेगळेच असावे, नक्कीच.'' उल्का.

''बोलू आपण नंतर!'' बाळ.

आणि दोघेही त्या कार्यक्रमाच्या ठिकाणाहून बाळच्या गाडीकडे गेले.

''बस!'' बाळ.

'' नको! माझी गाडी आहे! ती बघ समोर, दोन सीटी!'' उल्का.

''अग पण माझा बंगला बाजूलाच आहे. आपण दहा मिनिटात परत येऊ! कार्यक्रम संपायला अजून एक तास लागेल!'' बाळ.

''बर! चल... म्हणत ती त्याच्या मर्सिडिजमध्ये बसली. दोनच मिनिटात ती बाळच्या बंगल्यात आले. तेव्हा दुपारचे १२/३० झाले होते. घरी येताच त्याने खानसाम्याला काहीतरी खास करण्यास सांगून छान ढोकळा करायला सांगितला आणि सोबत कॉफी कारण सकाळपासून बाळानेही काही खाल्ले नव्हते आणि बाळचे मन चाळवले....

''उल्का! तू मला सांग? तू येथे कशी?'' बाळ.

खूप मोठी स्टोरी आहे त्या मागे. माझ्या जीवनाची परवड गेली पंचवीस वर्षे चालू आहे. माझ्या वडीलांनी एका NRA पायलटबरोबर लग्न लाऊन दिले

तो सिंगापुरला 'लूफ्तासा' एअरवेजचा पायलट. त्याचा कधी ठाव-ठिकाणा नसायचा. उगवायचा पंधरा दिवसांनी. मी सिंगापूरला गेली तरी त्यात फरक पडत नव्हता. इन-मीन चार वर्षाचा आमचा वैवाहीक काळ वादळा सारखा गेला. एखादया रात्रीसाठी त्याचा मुक्काम असायचा. त्याने तिथे म्हणजे सिंगापूरमध्ये एका चायनीज महिलेशी मेथकूट जमले आणि हे समजल्यावर मी सिंगापूर कायमच सोडले. पुन्हा नाही परतले त्याच्याकडे. त्यानेही माझ्याकडे येणे बंद केले आणि नंतर ४/५ वर्षांनी त्याच्या विमानाचा अपघात झाला आणि माझ्या जीवनाचे एक पर्व संपले नी वादळ वाटेला सुरुवात झाली. मला मुले नाही झाली. एकाकीपणाने पूर्ण ग्रासले होते. पैसा होता गडगंज. नवऱ्याची मुंबईतील प्रोपर्टी, सिंगापूर येथील अपार्टमेंट मी भाड्याने दिली नी मग पैशाची ददाद कधीच पडली नाही. पण एकाकीपणाची पोकळी भरून कशी निघणार? मी Insurance Agency घेतली जेणे करून मी बाहेर बडू शकत होते. तेथे Club Member झाले वेळ जात होता.

पण मग तब्येतीने घोळ केला महिनाभर. डीप्रेशनने आजारी होते. हॉस्पिटलला ठाण्याला, पण फारशी सुधारणा नाही. मला आता या वयात कोणाचा तरी अधार हवासा वाटत होता. प्रेमाचा, वात्सल्याचा, मायेचा या विषण्ण अवस्थेत. पण मग जगणे सुकर झाले असते साठीत आल्यावर त्याची प्रकर्षाने जाणीव व्हायला लागली. पण या अथांग जगात बाळ.... माझे कोणीही नव्हते रे.''

आणि तिला हुंदका फुटला. बाळने तिला सावरले.

''उल्का! तू आता एकाकी नाहीस! मी सदैव तुझ्या सोबत असेन! अगदी शेवटच्या श्वासापर्यंत!'' बाळ.

आणि ती बाळला बिलगली, बराच वेळ ती दोघे त्या अवस्थेत होती. मनोमिलन झाले होते आणि भविष्यातील आराखडे प्रत्येकजण आपल्या मनात रेखीत होता. आणि उल्काही.

मग तो तिला घेऊन तिच्या गाडीपर्यंत सोडून आला...

''अजून एक प्रश्न बाकी आहे?

''काय?'' ती.

'' तू या कार्यक्रमात कशी?

''योगायोग! अरे मी वृत्तपत्रात, दुरदर्शनवर या वृद्धाश्रमाबद्दल ऐकले

आणि आपण आपल्या एकाकी जीवनात शेवटचे क्षण सुखात जावेत माणसांच्या सहवासात जावेत यासाठी या संस्थेत मी नाव नोंदवले आणि १० लाखाचे डोनेशन दिले. त्यांनी मला निमंत्रीत केले आणि तुझी भेट झाली.'' उल्का.

''हा योगा योगच म्हणायचा. अग मी ही पन्नास लाख या संस्थेला दिले आहेत, उद्देश तोच, जो तुझा आहे.'' बाळ.

''छान म्हणजे आपल्या भेटीची इच्छा आता पूर्ण झाली तर!'' उल्का.

''आता पुन्हा केव्हा भेटशील! तू तर माझ्यापासून दूर जाऊच नये असे मला वाटत आहे.'' बाळ.

''आणि मलाही! तुला सोडून जाणे माझ्या जीवावर आले आहे.'' उल्का.

''मग राहना येथेच! छान जमेल आपले. मज्जेत दिवस जातील!'' बाळ.

''मी हे एअर ऐडींगच काम आटोपते आणि येते तुझ्या भेटीला!''उल्का.

''बघ हां!'' बाळ.

''नक्की, म्हणजे नक्की पुढच्या रविवारी मी येते, नी रहाते आठवडाभर तरी! चालेले!''लल्का.

''मला आवडेल तुझा सहवास, जीवनभर!'' बाळ.

''ओके!'' उल्का.

म्हणत ती आपल्या गाडीने ठाण्याला गेली.

आणि बाळ हरवला गतकाळाच्या गुलाबी स्वप्नांच्या लडी उलगडत... तिची वाट पहात आपल्या गुलाबी स्वप्नांच्या कॅन्व्हासवर सुखाचे, प्रेमाचे गुलाबी रंग छटांनी रंगवीत भविष्यातील हिरवे गार कुरण!

तो रविवार होता. बाळची मनस्थितीतील हुरहुर परमोच्च कोटीला गेली होती. लल्का येणार, नक्की येणार या विचारानेच त्याचे शरीर, मन हिंदोळ्यावर झोका घेत होते. सकाळ पासून जसा-जसा वेळ होत गेला त्या हुरहुरीने परमोच्च बिंदु गाठला होता. बंगल्याच्या दरवाज्याचा आवाज आला आणि तो सावध झाला. त्याने त्याच्या पहिल्या मजल्या वरच्या बेडरूमधून डोकावले तिची गाडी आत आली होती. ती उतरली, आणि डीक्कीतून आपली सुटकेस तिने बाहेर काढली. बाळाने पाहिले. आज ती खूपच छान दिसत होती. तिचे ते झुपकेदार मागे बांधलेले केस हेलकावे घेत होते. फक्त रंग बदलला होता

थोडासा बस. आणि ती बंगल्यात आली. खानसाम्यान तिची बॅगवर त्याच्या बेडरूम मध्ये आणली.

‘‘हाय!’’ ती.

‘‘हाय!! स्वागतम्!’’ तो.

‘‘कसा आहेस?’’ ती.

‘‘बस तुझ्याच आठवणीत बुडालो होतो!’’ तो.

‘‘आणि मी ही! तुला केव्हा भेटेन असे झाले होते. एक एक क्षण एक दिवसाचा वाटत होता!’’ ती.

आणि बाळ तिचे हात हातात घेऊन तिच्या कपाळाचे दीर्घ चुंबन घेतले, ती सुखावली आणि दोघेही विसावले सोफ्यावर. आताशा पाच वाजले होते संध्याकाळचे येवढ्यात खानसाम्याने कॉफी आणि थालीपीठ समोरच्या टी पॉयवर ठेवले.

‘‘तुला येत होती का रे माझी आठवण?’’ ती.

त्याने क्षणभर डोळे मिटले आणि तो हरवला गत स्मृतीत....

‘‘हो! एक क्षणाचाही विसर नाही पडला तु गेल्या पासून, ना अन्न पाणी गोड लागले. सारखी तू डोळ्यासमोर उभी, काही कामही सुचत नव्हते. अग आलेली वर्तमानपत्रेही ओकाबोका पहात आहेत नाही उघडली गेले चार दिवस, तू गेल्यापासून आणि आज माझ्या मनाचा कोंडमाराही होत होता. सारखे डोळे लागले होते तुझ्या वाटेकडे!’’ बाळ.

आणि उल्का शांतपणे सगळे ऐकत होती. हा काय खेळ आहे नियतीचा दोन दूर झालेले जीव अनेक दशकांनी एकत्र येतात. जीवापाड प्रेम करतात एकमेकांवर, याला वासनेचा गंध नाही. सारे काही अलौकीकच म्हणावे लागेल.

मग थोडा वेळ ते दोघेही निघून बंगल्याबाहेर पडले आणि दूरवर भटकून आले. या भटकंटीत त्यांचे हात एकमेकांच्या हातात गुंफलेले होते. एकमेकांच्या स्पर्शाने उल्हासीत मने अगदी मोहरून गेली होती....

‘‘आता तू येथून कोठेही जायचे नाही!’’ बाळ.

‘‘नाही! तू म्हणशील तसे पण मला माझ्या व्यवसायाचा फाफट पसारा मला आवरावा लागेल!’’ उल्का.

‘‘ठीक आहे! जशी तुझी इच्छा!’’ बाळ.

तो बंगला तसा प्रशस्थ, चार बेडरूमचा होता. सर्व सोयींनी परिपूर्ण. सव्वा करोड रूपये खर्च करून त्यांनी तो बांधून घेतला होता.

संध्याकाळी खानसाम्याने आज खास चिकन वडे बनवले होते. आज रविवार होता. जेवणे आटोपली आणि मग गप्पांचा फड रंगला.

''उल्का! तुझी व्यवस्था माझ्या बाजूच्याच बेडरुममध्ये केली आहे. सेल्फफंडेड आहे सगळ्या सोयींनी युक्त. त्यात AC चीही व्यवस्था आहे. आपण आता झोपू या, सकाळी आपण छान फेरफटका मारून येऊ सकाळच्या उबदार थंडीत. शेजारी भगवान शंकराचे मंदिर आहे तेथेही जाऊन येऊ!'' बाळ.

''चालेलं!'' उल्का.

पण त्यांना झोप कसली लागते. ती दोघे बिछान्यावर तळमळत होती. खूप काहूर माजले होते मनात, मनात आणि त्यांच्या भिरभिरत्या नजरा छताकडे पहात होती. रात्रीचे १२ वाजले असतील दोघांनाही झोप नव्हती... आणि दोघांच्या मनातील काहुरने परमोच्च बिंदू गाठला होता.

लल्का बराच वेळ आपल्या पलंगावर लठून बसली होती. तिला कळेना काय करावे. ती तडकाफडकी उठली नी बाळच्या बेडरूम जवळ आली. त्याच्या बेडचा दरवाजा सताड उघडा होता. तो डाव्या उजव्या कुशीवर तळमळत होता. हे सारे उल्का पाहत होती आणि आवेशाने तिने बाळच्या बेडरूम मध्ये प्रवेश केला... कोणीतरी आल्याची चाहुल बाळला लागली आणि तो पलंगावर उठून बसला....

''अरे! तू?'' बाळ.

''हो! नाही झोप लागली. मी जागीच आहे रात्रभर तुला भेटावेसे वाटले!'' ती.

''ये! बैस! बाळ

आणि ती त्याच्या पलंगावर विसावली, बाळाच्या शेजारी, दोघेही अबोल. कोणीच काही बोलत नव्हते... आणि येवढ्यात बाळ उल्काच्या कुशीत विसावला. क्षणात ही हालचाल इतक्या वेगाने घडली की ती दोन ''हळव्या मनाची पाखरे'' क्षणभर हरवली शोधीत प्रेमाचा ओलावा!!

०–०–०

# ‘आभास’

अण्णा लकेश्री एअर इंडियाच्या आपल्या नोकरीतू निवृत्त झाले साठाव्या वर्षी. निवृत्ती पूर्वीच त्यांना वेध लागले होते ते, आपण आपल्या गावी गणपती पुळ्याला जावे, आपली वडिलोपार्जित प्रॉपर्टीची बऱ्याच वर्षी पासून होत असलेली हेळसांड थांबवावी, कंपाऊंड वॉल, घराची डागडूजी करावी, थोडे आधुनिकीकरण करावे येवढ्या मोठ्या आठ रूमच्या घराचे हे ठरवलेच होते त्यांनी. आता ती उभयता गेले ४/६ महिने येथे स्थायिक झाले होते.

पूर्वी या येवढ्या प्रशस्त वाड्यात त्यांचे एकत्र कुटुंब होते. त्यांचे वडिल, दोन चुलते त्यांची मुले. पण मुले शिक्षणाला बाहेर पडली, कोणी परदेशात गेली, कोणी आपल्या धंदा-व्यवसायात स्थिर झाले. पण गेली ३५ वर्षे कोणीही गणपती पुळयाला फिरकले नाही.

त्यांच्या कुटुंबाच्या मालकीची होती, बरीचशी जुनी आंब्या फणसाची झाडे. की लागत होती ती त्यांनी १०/१० वर्षाच्या करारावर दिली होती. पण कधी पैसे येत कधी नाही. त्यांना कोणी फवारणी करीत नव्हते. नवी लागवड थांबली होती. येवढ्या ६०/७० एकरच्या मिळकतीची हेळसांड होतेय हे आण्णांना गेली दोन वर्षे जाणवत होते. त्याची व्यवस्था लावावी याच लद्देशाने पुळ्यालाच स्थायिक व्हायचे त्यांनी ठरवले, जवळ जवळ ३५० आंब्याची कलमी झाडे, काजूची झाडे आपल्या मालकाची वाट पहात होती हे त्यांचे अंतर मन अण्णांना खुणावत होते.

त्यांचे घराणेही तसे मातब्बर, आजोबा वारकरी, ते गुरु पदावर होते. मग आजोबांच्या शिष्यांनी छानशी समाधी बांधली आंबराईत. जोवर अण्णाचे वडील होते तोवर घरात दत्त जयंतीचा मांड भरे. पण घरातली सगळी पाखरे उडाली आणि सगळे थांबले. आजोबांच्या समाधीवर पाणी, फुले घालणे ही बंद झाले.

अण्णा येथे आल्यावर त्यांनी समाधी साफ सुफ केली, पाण्याने धुतली आणि चार फुले वाहिली त्या समाधीवर आणि अण्णांचा हा नित्यक्रमच होऊन बसला. गेले चार महिने त्यांच्या वाड्याचे दुरूस्तीचे काम सुरू होते आणि मग सगळ्या सोयींनी युक्त तो वाडा गजबजला उभयतांच्या त्या वास्तुतल्या वावराने.

अण्णांचे बालपण खेड्यात गेले आंबा, फणसाच्या सानिध्यात. अण्णा डिसेंबरमध्ये निवृत्त झाले आणि गावाला आले. त्यांनी झाडांचे सगळे करार रद्द केले आणि प्रथम सगळ्या झाडांना पुरणे भरली, फवारणी केली आणि काय राव या वर्षी भरभरून आंबा, फणसाचे पीक आले. असेच काजूचे उदंड पीक आले. त्यामुळे वाडीतल्या २०/२५ महिलांना व्यवसाय मिळाला. अण्णांनी त्यांच्या बागेतील शेडमध्ये काजू बिया भाजण्यासाठी आधुनिक ओव्हन आणले. गावच्या काजूच्या पिकातच त्यांच्या घराच्या दुरुस्तीचा खर्च निघाला.

अण्णांनी मुंबईच्या क्रॉफर्ड मार्केटच्या व्यापारांना पाचारण केले आणि आंबे, फणस यांच्या विक्रीची व्यवस्था केली. मुलांना, नातेवाईकांना त्यांनी आंब्याच्या पेट्या पाठवल्या व बऱ्याचशा परदेशी पाठविण्याची योजना आखली. चांगली फळे, त्यामुळे भावही चांगला आला. १५/१७ लाखाचे लत्पन्न झाले. नाहीतरी पूर्वी व्यापारी काय देत २/३ लाख रुपये.

मज्जा म्हणजे प्रथमच घरचे आंबे मुंबईला मुलांना, बहिणींना, मित्रांना गेल्याने, अनेक जणांनी अण्णांना धन्यवाद दिले. शिवाय त्यांचे कोकणात गणपती पुळे येथे येणे-जाणे वाढले. पाहुण्या-राहुण्यांनी वाडा गजबजला. रात्रंदिवस मुले माणसांच्या वावराने घराला घरपण आले. गावाला गावपण आले आणि मुलांचे, नातवंडांचे सणासुदीला येणे जाणे वाढले. आणि अण्णा सुखावले. आपण नोकरीला असल्याने घराकडे त्यांचे दुर्लक्ष झाले होते व या सुखाला मुकालो हे त्यांच्या ध्यानात आले आणि आपण घेतलेला गावाला येण्याचा निर्णय किती योग्य हे आता त्यांच्या ध्यानात आले. अण्णांना अधिक प्रसन्नता वाटली ती त्यांची चार नातवंडे मे महिन्यात वाड्यात येऊन राहण्याने मुलांच्या किलबिलाटाने घर अगदी मोहरून गेले होते.

त्यांच्या जेष्ठ चिरंजीवांचा मुलगा रोहीत, नुकताच दहावी झाला. परीक्षा होताच प्रथम त्याचे पाय गावाकडे वळले. सगळ्या आमराईत त्यांचा वावर होत असे. दिवसभर बागेत हुंदडायचे आणि रात्री ताणून द्यायचे हा त्यांचा छंद होता. त्यांच्या वावराने घराला चारचांद लागले. घराचे घरपण अनके पटीने सकारात्मक झाले. रोहितचा रिझर्ल्ट अजून लागायचा होता. पण त्याने मंबईला जाणे नाकारले. उलट गावातली १५/२० मुले जमा करून त्यांच्या खापर पणजोबांच्या समाधी समोरच क्रिकेटसाठी छान मैदान तयार करून पुरा दिवस त्यात ती मुले हुंदडत असत.

कुठेतरी मी वाचले होते, झाडांना मुलांचा, आपल्या मालकाचा सहवास हवा. त्यांना स्पर्श करावा मग ती अधिक जोराने फुलारतात. शेवटी ती जीवंतच ना, त्यांच्यातही परतात्म्याने प्राण ओतलेला असतो. त्यांचा जीवंतपणा त्या परिसराला जीवंत करातो. याचा प्रत्यय अण्णांना जाणवत होता.

रात्री जेव्हा सगळी नातवंडे गप्प मारीत घरात तेव्हा तर अण्णांच्या आनंदाला पारावर नव्हता. वेळ कधी जायचा हेही त्यांना समजत नव्हत. जो अनुभव यापूर्वी कधीच घेतला नव्हता आताशा ते अनुभवित होते आणि मनोमन सुखावत होते.

एक दिवस ते आपल्या घरातल्या कचेरीत आलेले उत्पन्न, बँकेचे व्यवहार यांचे हिशेब तपासत असताना रोहित त्यांच्या कचेरीत पुढच्या खुर्चीत बसला आणि त्यांच्याकडे प्रश्नार्थक नजरेने पहात.

''आजोबा! गेले पंधरा दिवस मला या वास्तुत काही वेगळेच भास होत आहेत. तुम्हाला काही जाणवले का हो?'' रोहित.

''हो! ही गोष्ट खरी आहे. पण बाळ मला या गोष्टीचा उलगडा अजून झाला नाही! जाणवले काहीतरी घरात! विशेषत: माझ्या वडिलांच्या बेडरूममध्ये तो नेहमीच बंद असतो, पण दरवाजे उघडे असतात तेव्हा!'' अण्णा.

''हो मलाही तसेच वाटते आजोबा कोणतरी वावरते आहे. आपल्या घरात असे गेले ८/१० दिवस मला जाणवते आहे, कोणीतरी अदृश्य शक्तिचा वावर आहे. असे मला वाटते!'' रोहित.

''रोहित तू बरोबर बोलतो आहेस. माझ्या वडिलांनाही तसा भास व्हायचा पण आम्ही मुंबईला गेलो ही वास्तू ओकी बोकी झाली. त्या नंतर माझे आईवडील गेले आणि गेल्या २५/३० वर्षात तसा अनुभव कोणाला येणार? जेव्हा घरात कोणाचा वावरच नव्हता!'' अण्णा.

''बर बाळ काय जाणवतय तुला या घरात?'' आण्णा.

''आता बघा आपण आज कितीजण? तुम्ही, आजी आणि मी, पण मला ना कोणता तरी अदृश्य चेहरा घरात वावरतोय असे वाटत आणि तो आपल्या सगळ्यांच्यामध्ये. स्वप्नात येत नाही पण ती छाया म्हणा किंवा आभास मला खूपच जवळचा वाटतो. नाही भिती वाटत. हे केव्हा पासून, तर जेव्हा आम्ही त्या समाधी समोर खेळायला लागलो त्यानंतर २/३ दिवसांनी!'' रोहित.

‘‘अरे वां! छान रोहित, ते तुझे खापर पंजोबा असावेत, ज्यांची समाधी माझ्या वडिलांनी बांधली. अरे ते मोठे संत होते, त्यांचे शेकड्यांनी शिष्य होते, मुले खूप आवडायची त्यांना, आम्ही त्यांच्या अंगा-खांदयावर खेळायचो; पण कधी त्यांची तक्रार नव्हती ते वारकरी होते. किर्तन करायचे. ग्रेट माणूस. आपल्या गावाचे ते भूषण होते. आपली शाळा आहे ना तिच्या बाजूचे विठ्ठल मंदिर त्यांनी बांधले, पुण्यवान आत्मा!’’ अण्णा.

‘‘ग्रेट!’’ रोहित

‘‘तू एक काम कर. लद्या गुरूवार आहे. सकाळी तू आंघोळ केल्यावर एक तांब्याभर पाणी आणि चार फुले घेऊन जा आणि प्रथम, मी दररोज धुतो ना समाधी तशी तू धू! फुले त्या पादुकांवर घाल आणि त्या पादुकांवर मस्तक ठेऊन नमस्कार कर.’’ अण्णा.

‘‘मग काय?’’ रोहित.

‘‘बघ चमत्कार!’’ अण्णा.

‘‘ठीक! उद्याच!’’ रोहित

आणि खरोखरच रोहितने सकाळी आंघोळ करून, समाधीकडे आंबराईत प्रयाण केले. खूप उत्सुकता होती मनात.... समाधीकडे जाताना.

तो सामाधीजवळ गेला. तत्पूर्वी आजोबांनी समाधीची पुजा केली होती. तेथे पोहचताच प्रथम त्याने समाधीचे दर्शन घेतले. तांब्यातले पाणी पादुकांवर ओतले, फुले घातली आणि त्याने आपले मस्तक पादुकांवर ठेवले. पण एक विचित्र अनुभूती रोहितला झाली. त्याची तद्री लागली. अंग शहारले त्याचे आणि कोणाचा तरी मुलायम हात, आपल्या डोक्यावरून, पाठीवरून फिरतोय असा भास झाला. किती वेळ तो तेथे होता हे त्यालाही समजले नाही..... आनंदाने तो घरी आला. खरे तर खापरपणजोबांचा अनुग्रह त्याला झाला होता. हे त्याला नंतर आजोबा म्हणाले. मग मात्र एका वेगळ्याच विश्वात आपण वावरत आहोत तसेंच रोहितला वाटत होते आणि त्या स्पर्शासाठी आभासासाठी जीवनभर त्याचे पाय गावकडे वळत. नंतरच्या काळात तो पंढरपुरलाही जाऊ लागला. घराण्याची वारकरी परंपरा जी खंडीत झाली होती ती पुन्ह चालू झाली होती आणि खापर पंजोबांचा ‘आभास’ नेहमीच त्याला या वास्तूत होत होता.....!!

०-०-०

# नक्षत्रांचा खेळ

सकाळची वेळ! ९ वाजले होते, शाम दादर स्टेशनवर आला. खूप गर्दी ट्रेनने जाणाऱ्या-येणाऱ्याची होती. त्या गर्दीतून वाट काढीत शाम प्लॅटफॉर्म नंबर एकवर आला आणि त्याने इंडिकेटर पाहिला. नेहमीची ९.०५ ची गाडी सुपर फास्ट केव्हाच निघून गेली होती. त्या नंतरच्या गाड्या ह्या सगळ्याच धिम्या गतीने जाणाऱ्या, म्हणजे आज आपण ऑफीसला नक्कीच लशीरा पोहाचणार याची खूणगाठ त्याने बांधली.

हि ९.०५ ची ट्रेन कधीच चुकली असे होत नव्हते. त्या गाडीतल्या पुढच्या डब्यात त्यांच्या मित्राचा ग्रुप असायचा, गाडीत चढल्या चढल्या बसायला मिळायचे आणि कर्जत कडून येणाऱ्या आगगाडीने व्ही.टी पर्यंतचा प्रवास छान व्हायचा. तीन नंबर प्लॅट फॉर्मवरून एक फास्ट ट्रेन जायची ९.३० ला. पण जेव्हा त्याने घड्याळाकडे पाहिजे फक्त दोन मिनिटे बाकी होती. म्हणजे दोन जीने चढून तीन नंबर वर पोहोचणे कठीण. शिवाय गर्दीही खूप. ती पार करता करता ट्रेन निघून जायची म्हणून शामने तो नाद सोडला आणि आता धिम्या गाडीनेच ऑफीस गाठायचे असे ठरवून तो त्याच फलाटावर लभा होता. उलट स्लो गाडी आणि ती बऱ्याच वेळाने आली असल्याने लतरणारांची गर्दीच अधिक होती.

गेली दहा वर्षे तो नॅशनल ग्रिंडले या बँकेत कॅशियरचे काम करीत होता. छान नोकरी, छान पगार पण एकट्या जीवाला काय लागते. वडीलोपार्जित छान तीन बेडरुमचा फ्लॅट. दादर भागातील हिंदु कॉलनीत. आता तो एकटाच एवढ्या मोठ्या घरात रहायचा. सकाळचा नाष्टा करून तो निघायचा, दुपारचे जेवण ऑफीसच्या कँटीनमध्ये आणि संध्याकाळचा डबा यायचा तो रेल्वेच्या चाळीतून त्याच्या मावशी कडून.

आठ नऊ वर्षापूर्वी जेव्हा त्याचे लग्न ठरले तेव्हा त्याची आई सांगायची....''बाळ... शाम! प्रपंच सुखाचा व्हावा असे वाटत असेल तर गरीब घरातली पण शिकलेली मुलगी पहा. नाकापेक्षा मोती जड होता कामा नये, नाहीतर बाळ! परवड होते रे पुरूषांच्या आयुष्याची. आता बहुतेक मुली नोकऱ्या करतात. पैसा खेळत असतो हातात. त्यांना नसते पर्वा नवऱ्यांची व सासू-सासऱ्यांची. फक्त लग्न होई पर्यंत त्या ठीक असतात पण मग आपली

नखे बाहेर काढतात. हा प्रकार अनेक वेळा आढळतो समाजात आजच्या काळात. तेव्हा सावधगिरीने जोडीदार निवड!''

हे सारे आई कळकळीने सांगत होती. कारण शामच्या शेजारच्या फ्लॅटमध्ये अशीच एक अघटीत घटना घडली. शेजारचे वकील बोकील यांना त्यांच्या सुनेने नेऊन वृद्धाश्रमात डांबले. प्रचंड कलह झालाय त्या दिवशी आणि त्यांचा मुलगा बायकोसमोर मुग गिळून बसला. षंढासारखा. अरे ज्यांनी जन्म दिला, आयुष्यभर खस्ता खाल्ल्या. त्यांच्या उतार वयात ही अवस्था. सगळ्या शेजाऱ्यांना खूप वाईट वाटले. पण कोण काय करणार. बोकीलांची सून पोलीस खात्यात आणि त्यानंतर तिने तिच्या नवऱ्याचे जे हाल केले. एका शुल्लक कारणाने. त्याचे जुने प्रेम प्रकरण. कारण बायकोच्या अशा वागण्याने अर्थात तो त्याच्या प्रेयसीकडे आकर्षित झाला आणि प्रपंचाचा तीन तिगाडा झाला.

हा सगळा अनुभव आणि आईचे काकुळतीला येऊन सांगणे यामुळे शाम सावध होता पण वाढते वय, एकाकी पण म्हणून त्याने 'सुमा' चे स्थळ स्वीकारले. शिवाय आई म्हणाली तुमची पत्रिका छान जमते. चांगला संसार कराल असे गुरूजी म्हणाले होते. आयुष्यभर सुखाने संसार कराल आणि त्यालाच शाम बळी पडला आणि लग्न झाले.

लग्नापूर्वी शामने खूप चर्चा केली सुमाबरोबर, पण तिच्या सांगण्यात काहीही विसंगती नाही आढळली त्याला. त्यावेळी त्याची आई हयात होती. सुमा शामबरोबर बीना अट लग्नाला तयार झाली, कारण तिच्या प्रियकराने तिला टांग दिली होती. त्याला सुमाचे सगळी थेरं माहित होती. पण लग्नानंतर पंधरा दिवसातच सुमाला शामच्या आईची घरात लपस्थिती असणे अवघड वाटू लागले. तिने शामला बजावले – आईला गावी पोहोचवा मला येथे तिची अडचण नको. मी माझ्या आईला येथे आणून ठेवणार आहे. बस! वादाची ठिणगी अशी पडली की पुऱ्या घराला आग लागली आणि शामनेच सुमाला माहेरचा रस्ता दाखविला. त्याने तिला पुन:घरी आणण्याचा प्रयत्न केला नाही. कालांतराने त्याची आई गेली आणि शाम एकटा पडला आणि जमेल तसे स्वत:चे आयुष्य रेटीत राहिला.

कां कोण जाणे पण आज गाड्या उशीराच धावत होत्या म्हणून शाम प्लॅटफॉर्मवर एका बाकड्यावर बसला होता. त्याने पाहिले गाडी येत होती, पण एवढयात डाव्या बाजूला उतारावरून एक स्त्री खाली कोसळली आणि

तिच्या हातातल्या कुबड्याच्या काठ्या शामच्या पायाजवळ येऊन पडल्या. हे पहाताच तो उठला आणि वेगाने पळत उतारावरून खाली घरंगळणाऱ्या त्या स्त्रिला त्याने अलगत सावरले आणि तिच्याकडे न पहाताच त्यानी तिला खाली प्लॅटफॉर्मवर आणले. बाकड्यावर बसवले. येवढ्यात येणारी गाडी प्लॅटफॉर्मवरून निघून गेली होती. त्याने त्याच्या बॅगेतली पाण्याची बाटली काढून तिला पाणी पाजले पण ती अजून वेगळ्याच ग्लानीत होती मागे मान टाकून ती त्या बाकड्यावर पडून होती.

''अहो बाई! तुम्हाला काही लागलयं कां?'' शाम.

पण तिने हु की चु केले नाही.

तेवढ्या वेळात शाम तिचा चेहरा न्याहाळत होता. त्याने तिला वरुन खालपर्यंत न्याहाळले.

''अहो! बाई, तुम्हाला कोठे लागले आहे कां?'' शाम.

आणि तिला जाग आली. तिने आपले डोके घट्ट पकडून ठेवले होते. म्हणजे तिच्या डोक्याला मार नक्कीच लागला असणार. शामने पाहिले तिने धडपडत आपल्या दोन्ही कुबड्या काखेला लावल्या आणि ती उठणार तर पुन: तिचा तोल गेला मग मात्र शामने तिला पुन: त्या बाकड्यावर बसवले. पहातो तर तिचा एक पायच नव्हता. पण साडीत असल्याने शामला दिसला नाही. ती बाकड्यावर आडवी झाली आणि शामने तिचा चेहरा न्याहाळला तर ती त्याची पत्नी सुमा होती. मग मात्र शामच्या काळजात धस् झाले. हे काय हिच्या वाट्याला आले. हे भोग तिच्या कर्माचे फळ आहे येवढे त्याने जाणले. आता १०.३० वाजून गेले होते, शामने ऑफीसला जाण्याचे रद्द केले आणि ज्या बाकड्यावर झोपली होती बाकड्याच्या शेवटच्या टोकावर बसून राहिला.

तिचा डोळा लागला होता. काहीतरी मार लागला असणार येवढे मात्र खरे. म्हणून का जाणे शामचे हृदय द्रवले. सहानुभूती वाटली तिच्या बद्दल आणि आता या प्रकरणाचा शेवट होई पर्यंत येथेच थांबायचे असा निर्णय त्याने घेतला. त्याने त्याच्या ऑफीसला फोन केला व मित्रांना सारी हकीकत सांगितली.

अर्ध्या तासाने तिला जाग आली पहाते तर शाम त्या बाकड्यावर बसला होता. त्याने पुन्ह तिला आपल्या बाटलीतले पाणी पाजले आणि तिला

विचारले....

''मॅडम! तुम्हाला कोठे लागलय कां?'' शाम.

ती फारसे नाही म्हणाली आणि ती सावरून बसली.

''तु येथे कशी?'' शाम.

''कर्माचे भोग!'' ती.

''तु सध्या कोठे रहातेस? आणि तुझ्या सोबत कोण रहातात?'' शाम.

''कोणी नाही! मी एकटीच असते!'' सुमा.

''मला ओळखलस का तू?'' शाम.

''हो.'' सुमा.

''मी काय म्हणतोय? तुला नाही वाटले कां की तू आपल्या घरी परत यावे असे.'' शाम.

''धीर झाला नाही!'' ती.

''हे तुझे आजारपण कसे?'' शाम.

''अपघात झाला!'' ती.

''आता कोठे जाणार आहेस?'' शाम.

''माझ्या घरी!'' ती.

''सध्या कोठे रहातेस तू?'' शाम.

''गोपचार चाळीत!'' ती.

''तिथे कशी पोहोचलीस?'' शाम.

''माझे कर्म! माझ्या घरच्यांनी मला घरात घेतले नाही. हाकलून लावली. आई-बाबा गेले. भावंडांनी थारा देण्यास नकार दिला. मग मी माझ्या मैत्रिणी कडे गेले; दोन महिने तेथे राहिले आणि सध्या तिच्याच जागेत रहातेय!'' ती.

''आपण डॉक्टरकडे जाऊ या का?'' शाम.

''नको!'' ती.

''तू काही खाल्लेस कां?'' शाम.

''नाही!'' ती

''काही खाणार कां?'' शाम.

''हो!'' ती

आणि ती दोघे समोरच्या स्वागत हॉटेलात आले. तिच्या हाताला धरूनच शामने तो दादर पुर्वेचा चौक क्रॉस केला.

''काय घेणार?'' शाम.

''वडा सांभार!'' ती

आणि शामने दोघांसाठी ऑर्डर दिली. ते दोघे बाहेर पडले...

''आता तू तिकडे तुझ्या घरी जाणार की? येणार आपल्या घरी!'' शाम.

''येते! तुमच्या घरी येते.'' ती.

''चल!'' शाम.

आणि तो रस्ता क्रास करून शामने टॅक्सी केली आणि आपल्या घरी हिंदु कॉलनीत आला. दार उघडून तो आत गेला तरी ती बराच वेळ बाहेरच होती...

''ये! आत ये!'' शाम.

ती घरात आली आणि कोचवर बसली. शामने तिला पाणी आणून दिले.

''तु तुझ्या बेडरूम मध्ये जाऊन पड!'' शाम.

आणि ती काही नं बोलता बेडरूम मध्ये जाऊन झोपली. शामने पाहिले तिने बेडरूमचा दरवाजा अर्धा उघडाच ठेवला होता.

दुपारचा १ वाजला होता. शामने फोन करून दोघांसाठी डब्बा मागवला आणि ती उठायची वाट पहात होता. ती उठली तेव्हा दोन वाजून गेले होते. ती उठली. बाथरूममध्ये गेली आणि डायनिंग टेबलच्या खुर्चीवर बसली.

''भुक लागलिय कां तुला?'' शाम.

''हो!'' ती.

आणि त्या दोघांनी जेवून घेतले.

अजून सुमा परक्यासारखीच वागत होती.

''तू येथे कायम रहाणार आहेस का?'' शाम. थोडा वेळ ती काहीच बोलली नाही. मग ती म्हणाली ''हो!''

''चालेल!'' शाम

''तुम्ही लग्न केलं का?'' ती.

''नाही! शाम नाही करावेसे वाटले कारण आपला घटस्फोट झाला नव्हता आणि कायद्याप्रमाणे आपण पाच वर्षे एकमेकांपासून वेगळे नव्हतो!'' शाम.

आणि अजून ती गप्पच होती. पण आता तिची मान खाली झुकली होती मग ती दोन हाताची घडी घालून डायनिंग टेबलवरच डोके ठेऊन झोपली.

तोवर शाम कोचावर बसला होता. आपण तिचे काय करावे, ही कशी चालू फिरु लागेल याचा तो विचार करीत होता. त्याने त्याचा मित्र रुपेश. याला फोन करून कृत्रीम पाय बसवणाऱ्या KEM च्या डॉक्टरांकडे चौकशी केली आणि उद्या हॉस्पीटलला येण्यास सांगितले. कारण अशा अवस्थेत ती घरात कशी वावरू शकणार? शामने एका आठवड्याची रजा घेतली आणि हे सगळे प्रकरण निस्तराचे ठरवले.

एक आठवड्यातच कृत्रिम पाय बसवून सुमा चालतच शामबरोबर घरी आली. येताना शामने तिचा हात आपल्या हातात घेतला होता. ती आज आनंदात होती.

''शाम! मला क्षमा कर!'' ती.

शाम काहीच बोलला नाही. व तिच्या बरोबर चालत घरी आला.

''क्षमा करण्याचा प्रश्न कुठे येतो? तू स्वत:च निघून गेलीस आणि आता स्वत:च आलीस. हे तुझेच घर आहे विसरून जा सगळा भूतकाळ!'' शाम.

''हो!'' ती.

दुपारचे दोन वाजले होते. ती जाऊन आपल्या बेडरूम मध्ये झोपली. ती आली, घरची झाली, त्याचे अप्रुप शामला जराही वाटले नाही. संध्याकाळी ५ वाजता शाम मार्केटला गेला. जेवणासाठीचे सगळे सामान आणले आणि ७ वाजता घरी आला. त्याने सगळे सामान किचनमध्ये ठेवले.

''आज जेवणाचे काय करणार?'' शाम.

''पुलाव!'' ती.

आणि शाम आपल्या बेडरूम मध्ये गेला. आज त्याचे डोके ठणकत होते. आज सकाळपासूनच्या सगळ्या घटना त्याच्या डोळ्यासमोरून सरकत होत्या. हा नियतीचा खेळ... ती असा आपल्या आयुष्याशी कां करीत आहे. काय लिहिले आपल्या जीवनात आणि त्याला राहून राहून आईचे बोलणे आठवत आहे आणि तो हरवला आपल्या स्वप्नात.

अजून त्याचे अख्खे आयुष्य पुढे जाणार आहे आणि पुढे काय काय घडणार आहे? आपण असेच जगत रहायचे.. पुढे येईल ते सारे जसेच्या तसे स्वीकारायचे असे त्याने ठरवले... येवढ्यात.

''अहो! जेवायला वाढतेय!'' सुमा.

''हो! आलो'' आणि तो हॉलमध्ये डायनिंग टेबलवर आला. दोघे

जेवली... आणि  हॉलमध्ये शाम आला, तीही आली. कोचवर विसावली. शामने तिचे हात आपल्या हातात घेतले.....

''आता जाणार नाहीस नां?'' शाम.

''नाही! कधीच नाही!'' ती.

आणि दोघे मिठीत बद्ध झाली....!!

नियतीला आव्हान देत !!

नक्षत्रांचा खेळाचा स्वीकार करीत!!

०-०-०

# अस्वस्थ आत्मा

मुंबईच्या पोलीस खात्यातली ३५ वर्षाची नोकरीतून जयराम निवृत्त झाला. पण गेल्या ६/७ वर्षापासून मुंबईत त्यांच्या मनाला काही शांती नव्हती. बापजाद्यांची जमीन त्यांच्या नजरे समोर रात्र दिवस त्यांना सतावत रहायची आणि त्यांचे मन गावातल्या कलमी आंब्याच्या बागात रेंगाळत रहायचे. केव्हा एकदा आपण निवृत्ती होतोय आणि आपल्या गावी जाऊन, जे अपुरे कार्य बाकी आहे ते पुढच्या ५-७ वर्षात करावे असे सारखे त्यांना वाटायचे.

आपण आपल्या बापजाद्यांनी लावलेल्या कलमी आंब्यात एकाही झाडाची भर आपल्या तरूण पणात घातली नाही. ना नवी काजू, फणसाची झाडे लावली याची त्यांना खंत जाणवत होती आणि आपण कधी निवृत्त होतोय याची ते वाट पहात होते.

पन्नास लाख एकराचे वावर आणि घरा शेजारचे डोंगर त्यांना सतत खुणावत होते. खूप वाटे त्यांना की निवृत्ती घ्यावी. गावात जावे आणि कमाईचा सगळा पैसा नव्या लागवडीत घालावा. निदान माझी नातवंडे तरी लद्या या फळांचा आस्वाद घेतील. या विचाराने त्यांच्या अंगात संचारले. ज्या दिवशी जयरामदादा गावात आले त्याच दिवशी त्यांनी गावात फेरफटका मारला. २० गडी केले, खड्डे मारायला. त्यांच्या रत्नागिरी भागातले कामगार कसबी. कशासाठी किती खड्डा लागतो त्या खड्ड्यात काय घालावे लागते, शेणखत, पाला-पाचोळा यांची त्यांना लत्तम माहिती. त्यामुळे खड्डे पाडून ते भरून घेतले चार दिवसात शंभर. खताची व्यवस्था केली पाणी तर मुबलक होतेच.

हातखांब्याला मोठ्या नर्सरीत ते आले. सोबत टेंपो आणि चार गडी त्यांनी आणले आणि पाचशे झाडातून छान झाडे त्यांनी निवडली. तत्पूर्वी त्यांनी आंब्याच्या आधुनिक लागवडीचा अभ्यास केला आणि उत्तमात उत्तम रोपे निवडली. त्याच बरोबर काजू, चिकू आणि यापूर्वी लोकांनी न केलेल्या लागवड झाडांची रोपेही त्यांनी निवडली. पूर्वी त्यांचा असा इरादा होती की आपण दापोली कृषी विद्यापीठात जावे; पण आता त्यांचीच एक शाखा हातखांब्याला झाल्याने त्यांनी आपला इरादा रद्द केला.

मे महिना सरून गेला होता. त्यांनी प्रथम या सगळ्या झाडांच्या जमिनीला तारेचे कंपाऊंड घातले आणि मग मृग नक्षत्रांच्या मुहूर्तावर सगळ्या झाडांची लागवड केली. आपण आपल्या आयुष्यात काहीतरी चांगले केले याचा आनंद जयरामरावांच्या मनात दरवळत होता नि मृगाच्या सरींचा शिडकावा झाला. त्यांचे मन शहारले आणि त्याच धुंदीत त्यांनी छानपैकी एक चक्कर कलमातून मारली. त्यांनी लावलेल्या झाडांना स्पर्श केला, हसली ती आणि जयरामदादाही. आज कार्य पूर्तीचा आनंद त्यांच्या तनामनात दरवळत होता. आनंदाच्या उकळ्या फूटल्या होत्या. जे स्वप्न आपण गेली १०-१२ वर्षे पहात होतो त्यांची पूर्ती झाली होती.

आता या सगळ्या १५ झाडांना वर्षभर पाणी पुरवठा व्हावा यासाठी काहीतरी भव्य दिव्य अशी व्यवस्था होणे जरूरीचे होते. त्यांनी गावातील त्यांच्या जमिनीतून फेर फटका मारला पण पाण्याचे स्त्रोत वर टेकडीवर नेणे जरूर होते. त्यांच्या घराच्या खालून एक छोटासा ओढा जात होता. बारमाही वाहणारा. त्याला एखादा छोटा गडगा घालावा आणि पंपाने पाणी चढवून झाडांना घालावे.

जयरामराव कृषी खांब्यातील कृषी अधिकारी जाधव यांना भेटले. पंपासाठी अर्ज केला आणि वीज खात्यातून वीजेची वायर ही थ्री फेज टाकून घेतली आणि काय योगायोग बघा मनगटा एवढा पाण्याचा स्त्रोत झाडांपर्यंत पोहोचला. त्यांनी पाईपाच्या नळीने पाणी झाडांच्या बुंध्या बुंध्यात खेळवले. कारण येवढ्या टेकडीवर पाणी घालणे मुश्किल होते. पण पाईपने पाणी शिंपण कमी कष्टाचे झाले.

योग असा की निसर्गाचे काही खरे नसते हे जयरामराव इतक्या वर्षाच्या अनुभवाने जाणून होते. पण आपण ओढ्यातून पाणी चढवण्याची शक्कल केली आणि फलदायी ठरली. झाडांना मुबलक पाण्यामुळे हिरवी गार पालवी आली आणि जयरामराव सुखावले. ते जाणत होते तुम्ही जर निसर्गाची सेवा केली तर तो मायबाप प्रसन्न होतो करणाऱ्यांवर.

त्यांच्या वडिलांनी, आजोबांनी पुर्वी जी झाडे लावली होती ना ती उत्तम फळे देत होती. त्यांनी यावर्षी सगळी फळे काढून रत्नागिरी मार्केटमध्येच निर्यातीला दिली मुबलक पैसा आला.

गेली दोन वर्षे ते सातत्याने प्रयत्न करीत होते आपले स्वप्न पूर्ण

करण्यासाठी. पण अजून बरीच जमीन बाकी होती पण काम आवाक्याच्या बाहेर होत आणि मुले हे करतील याची शाश्वती नव्हती.

या मधल्या काळात ७/८ वर्षे कधी निघून गेली. या झपाटलेल्या जयरामरावांना कळलेच नाही. हि सिंगापूर जातीची आंब्याची कलमे मोहरली आणि जयरामरावांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. ही बातमी नोकरांनी दिली.

आणि त्यांचे पाय बागेकडे निघाले. आणि प्रत्येक झाडाला स्पर्श करीत ते निघाले आणि एका झाडाशी येताच त्यांचा जीव घोटाळला आणि ते कोसळले. नोकराने पाणी पाजले आणि त्यांना घरी नेण्यासाठी लचलणार तर.... जयरामरावांचा श्वास थांबला होता कायमचा.... कर्तव्य पूर्तीच्या समाधानाने!! आणि हा अस्वस्थ आत्मा अनंतात विलीन झाला!!!

०–०–०

# गुरू दक्षिणा

आज निरोपाचा दिवस. ‘सुमन’ हायस्कूलच्या या वर्षीच्या बॅचला सेंड ऑफ देण्यासाठी शाळेच्या सभागृहात सर्व मुले दाटीवाटीने बसली होती. या शाळेच्या परंपरेने ९ वीच्या विद्यार्थ्यांनाही मागे बसण्याची सोय केली होती आणि स्टेजवर गेल्या दोन वर्षाचे टॉपर विद्यार्थी जे यावर्षी १२ वी ची परीक्षा देऊन आले होते. त्यांना ही बोलवण्यात आले होते. शिवाय सगळे शिक्षक, काही ट्रस्टी आणि गावातील या शाळेतून लत्तीर्ण होऊन उच्च पदावर आरूढ झालेले श्री प्रशांत कदम IAS यांना खास करून प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. जेणेकरुन त्यांच्या भाषणातून मुलांना बोधामृत मिळावे.

पाहुण्यांचे यथोचित स्वागत केल्यावर या शाळेचे हेड मास्तर श्री.सुर्वे सर यांनी सौ. ऋतुजा शिंदे मॅडमना कार्यक्रमाला सुरूवात करण्याची सूचना केली. प्रथम सरस्वती वंदना ९ वीच्या काही विद्यार्थ्यांनी सादर केले. या प्रशाळेचे एक हुशार आणि चतुरस्त्र शिक्षक श्री.टाकळे सर यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले आणि शाळेतील शिक्षकांनी यावर्षीच्या अभ्यास क्रमातील काही सूचना विद्यार्थ्यांना केल्या. त्याच बरोबर या शाळेची परंपरा विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात, स्पर्धेत जे यश संपादन केले त्याची माहिती पाहुण्यांना व्हावी यासाठी सविस्तर माहिती दिली. त्यानंतर सुर्वे सरांनी या शाळेतून जे अनेक विद्यार्थी पास झाले, जे डीप्लोमा, डिग्री घेऊन कशा प्रकारे जीवनाची वाटचाल करीत आहेत याची माहिती दिली. आता यावर्षी १० वीला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मनातील एक खंत बोलून दाखविली की, तुमच्यापैकी अनेक विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित केले असेल. तुमच्यापैकी कोणी डॉक्टर होतील, कोणी इंजिनिअर होतील, पण अजून पर्यंत या शाळेचा कोणीही विद्यार्थी IAS / IPS / IRS झालेला नाही. माझी अपेक्षा आहे मी पुढच्या सहा वर्षांनी निवृत्त होईन तेव्हा तुमच्यापैकी काही विद्यार्थ्यांनी या परीक्षा देऊन शाळेचे नाव उज्वल करावे. तीच मला गुरूदक्षिणा ठरेल. हे वाक्य त्यांनी पाच वर्षापूर्वी सेंडऑफ मध्ये लच्चारले होते आणि त्याचा पुर्नउच्चार त्यांनी केला. आजच्या या कार्यक्रमात त्यांचीही खंत त्यांनी इतक्या पोटतिडकीने मांडली की संपूर्ण हॉल, स्टेजवरचे शिक्षक उठून उभे राहिले. थोडा वेळ हॉलमध्ये शांतता पसरली. सुर्वे सर डोळे बंद करून

आपले भाषण थांबवून खाली खुर्चीत बसले. सगळेजण खाली बसले पण नववीतला एक विद्यार्थी मंदार अजून उभाच होता त्याचे डोळे पाणावले होते.

''सर! मी तुमचे हे आव्हान स्वीकारतो. तुम्ही जेव्हा निवृत्त होऊन सात वर्षे झाली असतील ना त्यावर्षी मी IAS झालेला असेन आणि तुम्ही त्या सेंडऑफच्या कार्यक्रमात हजर असाल आणि  सर मी त्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणा असेन!'' मंदार.

त्या मंदारच्या या तडफदार बोलण्याने संपूर्ण सभागृहाची पुरती रयाच बदलली. सरांनी त्याला पुढे बोलाविले आणि स्टेजवर येताच मंदारने सुर्वे सरांचे चरण स्पर्श केले. त्याला स्टेजवरच जागा करून दिली प्रमुख पाहुणे IAS अधिकारी प्रशांत यांच्या बाजूला. येवढ्यात मंदारने माईकवर बोलण्याची परवानगी मागितली आणि त्याला देताच तो उभा राहिला.

आदरणीय लपस्थित पाहुणे प्रशांत साहेब, माझे शिक्षक, विद्यार्थी मित्र हो मी या गावातला नाही खेड्यात राहणारा पण या शाळेच्या शिक्षकांबद्दल, इथल्या शिकवण्याच्या पद्धतीबद्दल माझ्या वडिलांनी ऐकले होते म्हणूण मला त्यांनी या शाळेत घातले आणि माझी राहण्याची व्यवस्था माझे नातेवाईक घाडगे गुरूजी जे या शाळेत शिकवत आहेत त्यांच्याकडे केली गेली. दोन वर्षे मी पहातोय सुर्वे सरांच्या मनात सलणारी IAS / IPS ची भावना किती तीव्र आहे आणि माझ्या विद्यार्थी मित्रांनो ते आव्हान आपण स्वीकारले पाहिजे. मी तर ते स्वीकारतोच आहे! माझी विनंती आहे सगळ्या शिक्षकांना ही गोष्ट सातत्याने विद्यार्थी मित्रांच्या मनावर बिंबवा. आपण या दोन्ही परिक्षेसाठी प्रयत्न करायचे या उद्देशाने दररोजच्या तासिकांपैकी एक तासिका वा रविवारी वेगळा क्लास घ्यावा. जेणे करून विद्यार्थ्यांना आवड निर्माण होईल. अवांतर वाचनाची सवय त्यांना जडू दे. जे आज माझ्याकडून घाडगे गुरूजी करीत आहेत. धन्यवाद! म्हणत तो थांबला. त्याने सर्व शिक्षकांना नमस्कार केला आणि बसला. तो बसेपर्यंत टाळ्यांचा कडकडाट चालूच होता. मंदारच्या भाषणाने सर्वच आश्चर्य चकित झाले.....

आणि सुर्वे सरांनी मंदारची ही सुचना तंतोतंत अमलात आणण्याची घोषणा याच सभेत केली. सर्व शिक्षकांनी मंदारला शुभेच्छा दिल्या आणि विना मूल्य मार्गदर्शन करण्याचे कबूल केले.

याचा परिणाम असा झाला की, सर्व शिक्षक IAS / IPS परिक्षांचा

अभ्यास करू लागले. प्रथम विद्यार्थ्यांचे तीन ग्रुप केले. सायन्स, आर्टस् आणि कॉमर्सकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे. त्या त्या वर्गासाठी त्या त्या शाखेचे शिक्षक नेमले आणि गेले वर्षभर हा अभ्यास चालू होता. या वर्षाची बॅच खूप हुशार दिसली, ती या प्रयोगाने.

आणि ऑक्टोबरमध्ये सुर्वे सर निवृत्त झाले त्यांच्या या गुरूदक्षिणेचा उच्चार पुन: त्यांनी आपल्या निवृत्तीच्या निरोप समारंभात केला आणि कायम बिंबवला गेला बाल मनावर.

या निरोप समारंभात खूप खूप बोलली मुले सुर्वे सरांविषयी. त्यांना या वर्षाचा महाराष्ट्र सरकार शिक्षक पुरस्कार मिळाला होता. त्यामुळे त्यांचा विशेष सत्कार गावाने, गावातील अनेक सामाजिक संस्थानी केला.

सुर्वे सर निवृत्त होऊन आपल्या गावी स्थायिक झाले. तेथे ही ते काही गप्प बसले नाहीत तालुक्यातल्या सगळ्या शाळांमध्ये जेव्हा त्यांना बोलावले जाई. याच IAS / IPS चा लच्चार करून नव्यापिढीला उद्युक्त करीत होते. मराठी मुले मागे पडतात त्याचे कारण त्यांना या परीक्षा विषयी योग्य मार्ग दर्शन होत नव्हते. त्यासाठी चिपळूण तालुक्यातल्या DBJ कॉलेजात हा कोर्स नव्याने सुरू झाला होता. मंदार या त्यांच्या विद्यार्थ्यानेही तेथे प्रवेश घेतला. तत् पूर्वी त्याने MSc केले होते. एक दिवस मंदारची आणि सरांची भेट त्याच महाविद्यालयात झाली. खूप आनंद झाला गुरू शिष्यांना. या वर्षी मंदारने प्राथमिक परिक्षा IAS ची पास केली होती. भारतात त्याचा २०६ वा नंबर आला होता. आणि आता त्याच्या फायनल परीक्षेची तयारी सुरू होती. शिवाय DBJ college ने त्याला Jr. Lecturer म्हणून जॉब दिला होता.

मंदार फायनल परीक्षा पास झाला आणि मुलाखतीतही अब्बल ठरला. त्याच All India मध्ये १०६ नंबर आला होता. तो आता आपल्या मसुरीच्या ट्रेनिंग साठीच्या कॉलची वाट पहात होता.

सातत्याने केलेला अभ्यास, दुर्दम्य इच्छा शक्ती यामुळे मंदारला हे यश लाभले. आपला रिझल्ट येताच प्रथम सुर्वे सरांचे गांव गाठले आणि सरांना भेटला. सरांचा आनंद तनात मनात मावत नव्हता. सरांच्या सात वर्षापूर्वीच्या १० वीच्या विद्यार्थ्यांपैकी सहा विद्यार्थ्यांनी प्राथमिक परीक्षा पास केली. ही दोन गुरू शिष्यांची भेट होताच सरांनी मंदारला हृदयाशी कवटाळले. दोघांच्याही डोळ्यातून आनंदाश्रू ओसंडत होते.

असे शिक्षक आणि असे ध्येयवादी विद्यार्थी यांनी टेरवच्या शाळेचे नावं उज्वल केले. दोन दिवस त्यांचा पाहुणचार घेऊन मंदार घरी परतला. गावात तर शाळेत आनंदाचे लधाण विद्यार्थ्यांच्या मनात लचंबळून येत होते.

आणि गावातल्या शाळेत सुर्वे सरांना बोलावून मंदारचा यथोचित सत्कार करण्यात आला. सुर्वे सरांचाही सत्कार शाळेने केला. त्यावेळी पूर्वी त्यांनी शाळेत केलेल्या रविवारच्या उपक्रमाची लपयुक्तता किती महत्वाची आहे हे आपल्या भाषणात विषद केले. यावेळी मंदारच्या शिक्षक, वडिलांचाही सत्कार केला गेला.

मंदारला मसुरीला जाऊन ट्रेनिंग पूर्ण करण्याचा कॉल आला आणि तो रवाना झाला.

आपल्या ध्येय पूर्तीचा आनंद मंदार त्याच्या प्रवासात आठवित होता आणि भविष्यात सुर्वे सरांचे काम पुढे नेण्याचा विचार त्याने केला होता.

सुर्वे सरांना त्यांची गुरूदक्षिणा मिळाली आणि ते अनेक विद्यार्थ्यांकडून तशी अपेक्षा ठेऊन होते. जे पहिली परीक्षा उत्तीर्ण झाले होते!!

# अदला बदल!

शरद आणि नंदिता हे दोघे ही लच्च पदस्थ सरकारी अधिकारी. शरद IPS आणि नंदिता IAS. दोघांच्याही पोस्टींग पुण्याला झाल्या होत्या. दहा-बारा वर्षापूर्वी त्यांच्या ओळखी पुण्यात आल्या आणि ते विवाह बद्ध झाले. त्या त्यांच्या पहिल्याच पोस्टींग होत्या. शरदची पोस्टींग मग तीन वर्षासाठी मुंबईला झाली, पण नंदिताची पोस्टींग मात्र पुण्यात झाली. शरद दर शनिवार, रविवारी पुण्याला येई. या गडबडीत नंदिताचे गरोदरपण लांबले पण शरदची IT Direbtor म्हणून पोस्टींग पुण्यात झाली आणि याच काळात नंदिता गरोदर राहिली. तिची बदलीही पुण्यातून मुंबईत होणार होती पण गरोदरपणाच्या कारणाने तीने ती थांबवली आणि पुण्यालाच राहण्याचा विचार पक्का केला. याचे कारण डिलीवरी नंतर येणाऱ्या बाळाची काळजी नंदिताचे आई वडील घेऊ शकत होते कारण ती दोघेही अजून सक्षम होती.

आता शरद नंदिता यांनी वयाची ३५ शी पार केली होती. आता या बाळंतपणा नंतर आपल्याला मुले नकोच असाही निर्णय घेतला होता कारण त्याच्या मिळण्याऱ्या प्रमोशनने त्यांना कदाचीत मुंबईत वा दिल्लीत जावे लागेल मग मुलांना बघणार कोण ही चिंता त्या दोघांना होती.

शरद आणि नंदिता मुंबईला बोरवलीला तिच्या भावाच्या लग्नासाठी दोन दिवसासाठी आले होते. लग्न कालच झाले आणि त्याच दिवशी रात्री नंदिताच्या पोटात दुखायला लागले. त्यांच्यासाठी हे ठिकाण परके होते. पण काही नातेवाईकांनी सुचवले बोरीवलीतील त्यांच्या समोर असलेल्या डॉ.पवार हे उत्तम डॉक्टर आहेत. त्या निष्णात आहेत तेव्हा तेथेच रात्री नंदिताला ॲडमिट करावे असे ठरले. रात्रीचे ११ वाजून गेले होते, आता यावेळी जरी वेगाने नंदिताला पुण्याला नेण्याचे ठरले तरी ते अशक्य होते. हेलीकॅप्टर मध्येच डिलीवरी होऊ शकते. त्यात नंदिताची ही पहिलीच वेळ कोणताही धोका पत्कारने संभव नव्हते. नंदिताला ॲडमीट केले व डॉ. पवार यांना पाचारण करण्यात आले. रात्री १२.३० वा. छानशा गोऱ्या बाळानं जन्म घेतला, तो मुलगा होता.

पण त्याच वेळी दुसऱ्या OT मध्ये एक महिला 'सुशमा' ही अडलेल्या अवस्थेत बाळंतपणासाठी तडफडत होती. नंदिताचे सिझरीन झाले कारण

बाळ पायाळू जन्माला आले होते, पण दोघेही सुरक्षित होते.

तिकडे दुसऱ्या OT मध्ये डॉ. पवारांना बोलवण्यात आले हि डिलीवरी खूपच अवघड होती पण खूप प्रयत्नाने नॉर्मल डिलीवरी झाली. आता सकाळी ४ वाजले होते आणि दोन्ही डिलीवरी नंतर डॉ. पवार आपल्या घरी गेल्या. हेड नर्सवर सगळी पुढची जबाबदारी सोपवून त्या गेल्या. त्या नर्सने एक एक बाळ ज्युनियर नर्सच्या हवाली केले व रिकव्हरीच्या रूममध्ये आणून ठेवले. नंदिताची सिझरीन झाली होती ती अजून शुद्धीवर आली नव्हती. नर्स तिची ड्युटी संपली म्हणून घरी गेली एक चुक झाली त्या दोन्ही बाळांच्या हातात अजुन नावाच्या पट्ट्या बांधल्या नव्हत्या तेव्हा कोणते बाळ कोणत्या आईचे हे कळणे अशक्य होते.

दुसऱ्या दिवशी काही अर्जंट डिलीवरीसाठी डॉ. पवार ९ वाजताच हॉस्पीटलमध्ये आल्या. वरील सगळा प्रकार त्यांच्या ध्यानी आला पण त्यांनी दोन्ही डिलीवरी आपल्या हाताने केल्या असल्याने मुलांचा रंग त्यांच्या ध्यानात आला होता पण पहिल्या व्हिजीटसाठी त्या आल्या तेव्हा त्यांच्या ध्यानी आले बाळांची अदला बदल झाली आहे. नंदिताचा मुलगा सुशमा जवळ आणि सुशमाचा नंदिताच्या जवळ ठेवण्यात आला होता. डॉ.पवारांच्या ध्यानी आलं. सुशमाने आपल्या जवळच्या बाळाला पाजले पण नंदिता अजून ग्लानितच होती. पण जेव्हा ती संध्याकाळी जागी झाली तेव्हा हे काळे सावळे बाळ असूच शकत नाही. आम्ही दोघेही गोरे पान आहोत ही काहीतरी हॉस्पीटलची चूक आहे हे ध्यानी येताच तिने डॉ. पवार यांना तक्रार केली बाळांची आदलाबदल झाली आहे.

त्यावेळी हॉस्पीटलचा स्टाफ हजर होता. त्यांना बोलावून डॉ. पवार यांनी सगळ्या गोष्टीची शहानिशा केली.

सुशमाही सावळी होती तिचे पतीही तिच्यापेक्षा काळसर तेव्हा त्यांना होणारे बाळ गोरे पान होऊ शकत नाही हे त्यांच्या अनुभवातून त्यांना समजत होते. शिवाय हेड नर्सला ही हे माहित होते पण आता सगळ्याच गोष्टींना उशीर झाला होता. सुशमाने दोन वेळा नंदीताच्या मुलाला अंगावर पाजले होते. ते गोरे पान बाळ पाहून तिला आनंद झाला होता.

पण नंदिता त्या काळ्यासावळ्या मुलाला पहायलाही तयार नव्हती हे ‘मुलं माझे नाही’ कशी नेऊ याला घरी. आम्ही दोघे गोरे पान आणि हे सावळे

बाळ हे तीने डॉक्टरांना सुनावले. आता तिला उद्या डिस्चार्ज घेऊन घरी जायचे होते. आणि डॉ. पवारांना भयंकर टेंन्शन आले. हा असा विचित्र प्रकार त्यांच्या मेडीकल प्रॅक्टीसमध्ये प्रथमच घडला होता. त्यांनी सगळ्या स्टाफला झापले पण आता या कैचीतून बाहेर कसे यायचे.

डॉ. पवारांचे एक वयस्क मित्र जे सध्या निवृत्त झाले होते. ते डॉ.दस्तुर, त्यांनी डॉ. पवारांना सांगितले तुम्ही त्या दोन्ही कुटुंबीयांना सांगा – दुध का दुध आणि पाणी का पाणी करण्यासाठी एकच उपाय आहे. पहिला म्हणजे त्या दोन्ही बाळांचे DNA तपासायचे. तुमच्या दोन्ही स्त्रियांच्या कोड ब्लडचा तपास करायचा आणि ठरवायचे ही बाळे कोणाची. नंदिता शरद यांनी त्याला होकार दिला पण सुशमा या गोष्टीला तयार नव्हती. 'हे माझे बाळ मी घेऊन जाणार.' तुम्ही मला रोखू शकत नाही. नाही तर मी पोलीसात जाईन.

शरद हे पोलीस खात्यातले वरीष्ठ अधिकारी तेव्हा आपली डाळ शिजणार नाही हे समजताच ती थंड झाली. DNA चा Report आला ते गोरे बाळ नंदिताचे व ते दुसरे सावळे बाळ सुशमाचे. कोड ब्लडचेही रिपोर्ट तसेच आणि आता त्यांच्या डिस्चार्जची वेळ आली.

सुशमाही गरीब कुटुंबातली तिची डीलीव्हरी सरकारी नियमाप्रमाणे फ्रि होती. ''डॉक्टर मी निघते पण हे बाळ मी माझ्या घरी नेणार नाही. त्या दुसऱ्या मुलाला गेले दोन दिवस अंगावर पाजले आहे मी त्याची आई आहे. आपल्याला हवेतर ही दोन्ही बाळे त्यांनी घरी न्यावीत!'' सुशमा

आणि ती तरातर हॉस्पीटल मधून गेली. क्षणभर शांती पसरली त्या हॉस्पीटलमध्ये पण यावर शरदनेच तोडगा काढला.

शरद भाऊंनी डॉक्टरांना सांगितले, ''मॅम तुम्ही चिंता करू नका, पण ही दोन्ही मुले आम्ही सांभाळू, आमची म्हणून. ह्या झालेल्या बाळाच्या अदलाबदली बद्दल परमात्म्याच्या मनात काही असेलच ना! तुम्ही निश्चिंत रहा मी ही जबाबदारी स्वीकारतो या दोघांनाही आम्ही सारखेच प्रेम देऊ, शिकवू, मोठे करू, नव्हे माझे आणि नंदीताचे नाव आई-वडील म्हणून देऊ... तसे तुम्ही डिस्चार्ज सर्टीफिकेटवर आणि बर्थ सर्टीफिकेटवर नमुद करा!'' शरद.

दोन्ही बाळे घेऊन ही उभयता पुण्याला आली. डॉ. पवारांनी रजिस्टरमध्ये ते ''सावळे बाळ, त्याच्या आई वडीलांनी नेण्यास नाकारले'' असा रिमार्क

मारून प्रकरण संपवले.

ही दोन्ही बाळे ज्यांची नावे ‘सुनिल’ त्यांचा मुलगा व ‘अनिल’ असे त्या सावळ्या बाळाचे नाव त्यांनी ठेवले. हॉस्पीटलला कळवले. डॉ. पवार यांनी त्यांचे बर्थ सर्टीफिकेट शरदना पाठवून दिले.

ही दोन्ही बाळे त्यांच्या (नंदिताच्या) आईच्या मार्गदर्शना खाली वाढत होती. खूप हुशार दोन्हीही शाळेच्या अभ्यासातही कमालीची दोघांची तयारी वाखाणण्या जोगी होती. ती दोन्ही बाळं सख्ख्या भावंडासारखी प्रेमाने वाढत होती. आता ती सातवीत होती पण जेव्हा आठवीत गेली तेव्हा त्यांच्या विचार सरणीत अभ्यासाच्या संदर्भा खूप फरक जाणवायला लागला. सुनीलचा ओढा नंदितासारखं IAS व्हावे आणि अनिलला शरद सारखे IPS व्हावे असे काहीशा जाणवू लागले. अनिल वडिलांकडे ओढला जाऊ लागला आणि बारावी झाल्यावर त्याचे आपले विचार पक्के होऊ लागले. अनीलने त्याच्या रूईया कॉलेजमध्ये NCC जॉईन केली. सुनिलचा ओढा तो रुईयाला ही असताना तेथील वाचनालयाकडे अधिकाधिक जाऊ लागले. दोन्ही मुलांनी आपली ध्येय पक्की केल्यावर IAS / IPS साठी लागणाऱ्या अभ्यासाची तयारी पदवीचा अभ्यास चालू असतानाच सुरू केली होती. सुनिल सायन्सला होता तर अनील आर्टसला. पण अभ्यास दोघेही जोडीने करायचे.

सुनिल, अनिल दोघेही डिस्टींगशनमध्ये पास झाले आणि वेळ न वाया घालवता त्याच वर्षी या परीक्षा या मुलांनी द्याव्यात हे शरद आणि नंदिता यांनी ठरवले व दोघांनाही या विषयांची परीक्षेची तयारी करण्यासाठी टाकले.

IAS / IPS या परिक्षांचे निकाल लागले. दोघेही पास झाले. आता मुख्य परीक्षा. येवढ्यात शरदची परीक्षा दिल्लीला झाली. तेथील अनेक सेंटर्सपैकी बेस्ट इंस्टीट्युटमध्ये त्या दोघांनाही शरदने ॲडमीशन घेतले. सध्या हे सर्व कुटुंब दिल्लीलाच रहात होते.

मुख्य परीक्षा झाल्या. मग, तोंडीपरीक्षा त्यात दोघांचीही निवड त्यांच्या इच्छेनुसार झाले आणि मसुरीची ट्रेनिंग परीक्षा पास करून आपापल्या मार्गाने निघून गेली. सुनिलची पोस्टींग दिल्लीलाच झाली आणि अनिल त्याच्या पुढच्या ट्रेनिंगला नागपूरला आला. पण तरीही या मुलांशी शरद नंदिता सतत संपर्क ठेऊन होते.

अनिलने आपली पोस्टींग मुंबईला न करता साताऱ्याला करावी अशी

विनंती केली व तो डी.एस.पी. चे प्रमोशन मिळे पर्यंत सातारा येथेच होता. नंतर तो कोल्हापूर येथे आला DSP म्हणून.

त्यावेळी एक अघटित घटना घडली. दिवाळी नंतरचे दिवस होते या भागात शेतकरी पुढच्या हंगामा पर्यंतचा वेगवेगळ्या देवींच्या जत्रा बैलांच्या शर्यती यात व्यस्त असतात.

श्री महालक्ष्मीच्या मंदिराची वर्षातून एक मोठी जत्रा भरत असे. जत्रेत शांतता राहावी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस सतर्क असत पण त्यांचे सगळे वरिष्ठही हजर असत. हा पालक गृहमंत्री जयवंतरावांचा भाग असल्यामुळे विशेष बंदोबस्त होताच. सतत पोलीस अधिकारी त्यांच्या मागे पुढे असत. त्या जत्रेच्या दिवशी भवानी मैदानात भव्य अशा विशेष स्पर्धांचे आयोजन केले होते. या समारंभाला कोल्हापूरच्या संस्थानाचे राजे शिव छत्रपती संभाजी ही हजर होते. त्यांच्या शुभहस्ते या स्पर्धांना सुरूवात झाली. मल्लखांब, दानपट्टा, तलवार, भालाफेक, बैल गाड्यांच्या स्पर्धा या प्रशस्त गजरात सुरू होत्या.

अनिल त्यावेळी जातीने सर्व व्यवस्था करीत होता. तेथेच पालक मंत्री, आमदार व इतर वरिष्ठ अधिकारी बसले होते. त्याच्या पुढेच बैलगाड्यांच्या स्पर्धेसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती. स्पर्धा ६ वाजता सुरू झाली. एकूण पाच स्पर्धेतून विजेत्यांची निवड करण्यात येणार होती. मंत्र्याच्या समोरच स्त्रियांची बसण्याची व्यवस्था करण्यात आली. पण शेवटच्या स्पर्धेच्या वेळी एक अघटित घटना घडली. त्या स्पर्धेतील एक बैलगाडी लसळली. बैलांनी जोखड मोडून पळापळ केली आणि मोडक्या गाडीच्या सांगाड्यासह ती गाडी स्त्रिया बसल्या होत्या त्यात घुसली. मंत्र्या, संत्र्यांनी पळ काढला... पण एक स्त्री मात्र विव्हळत तेथेच कळवळत होती. तिला बैलांनी तुडवले होते. डोके आणि छातीला  प्रचंड मार लागला होता. पण कोणीच मदतीला आले नाही. त्याच गर्दीत मंत्र्यांसमोर बसलेल्या अनिललाही थोडा मार लागला. त्याच्या पायावरून गाडीचे चाक गेले होते, बुट फाटले होते. तो विव्हळत होता लठता येत नव्हते. हे पोलीसांनी पाहिले आणि त्याला लचलतात येवढ्यात त्या विवळणाऱ्या स्त्रिला पाहून....

''जमादार! तुम्ही त्या स्त्रिला लचला आपल्या गाडीतून ताबडतोब सिव्हील हॉस्पीटला ॲडमीट करा. माझाही पाय दुखावला आहे. तुम्ही

मलाही तेथेच घेऊन चला!'' अनिल.

खरेतर बरेच लोक या स्पर्धेतील अपघातामुळे जखमी झाले. सर्वांना ॲडमीट करून उपाय सुरू केले होते. अनिलच्या पायाला थोडे फ्रॅक्चर झाले होते. डॉक्टरांनी त्याला बँडेज केले व घरी जाण्यास सांगितले. येवढ्यात अनिलला त्या स्त्रीची आठवण झाली. त्याने लंगडत जाऊन जनरल वॉर्ड मध्ये तिला शोधून काढले आणि तिच्याजवळ आला. डॉक्टरांनी अनिलला पाहिल तो कोल्हापूरचा DSP होता.

''या महिलावर तुम्ही काय काय उपचार केलेत! कशाची गरज पडल्यास मला सांगा मी सगळी व्यवस्था करीन!'' अनिल.

''सर! हीचे खुपच रक्त गेले आहे आणि रक्ताची कमतरता येथे आहे. हिचा B+ve रक्तगट रेअर आहे रक्त चढवणे गरजेचे आहे. ते मुंबई वरूनच येऊ शकते... आम्ही काय करावे समजत नाही. हीचे प्राण तरच वाचतील!'' डॉक्टर .

''डॉक्टर एक काम करा. माझा हाच रक्तगट आहे. तुम्ही माझे लागेल तेवढे रक्त घ्या. ताबडतोब!'' अनिल.

आणि ताबडतोब स्पेशल रूममध्ये त्या स्त्रीला हालवले आता रक्त डायरेक्ट चढवले. दोन बाटल्या रक्त दिल्यावर थांबवले. १५ मिनिटांनी त्या स्त्रीला जाग आली. तोवर अनिल कोचवरच आडवा होता.

''डॉक्टर आता तुम्ही यांना या स्पेशल रूममध्ये राहू द्या, हवेतर माझे नांव व पत्ता लिहा. माझ्या संपर्कात रहा.'' अनिल.

''ते साहेब होते बाई. अनिलराव त्यांनीच तुम्हाला या दवाखान्यात ॲडमीट केले. स्वत:चे दोन बाटल्या रक्त दिले म्हणून तुमचा जीव वाचला!'' डॉक्टर

हा साहेब कोण असावा तसा राहून राहून प्रश्न त्या स्त्रीला पडला होता. त्याला आपण भेटावे सतत तिला वाटत होते आणि तिचे डोळे त्या स्पेशल रूमच्या दरवाज्या कडे लागले होते.

त्या दिवशी संध्याकाळी अनिल घरी जाताना हॉस्पीटला आला. अंगावर साधे कपडे होते. तो त्या रूममध्ये त्या स्त्रिला भेटायला आला. समोरच्या खुर्चीत बसला.

''आई, तुझी तब्येत कशी आहे?'' अनिल.

''आता ठीक! पण बाळ तू कुठला; माझ्या जवळ कसा.''

''तुझे नाव काय?'' सुश्मा

''मला नाही माहित मी कुठला तो! पण सध्या माझी पोस्टींग कोल्हापूरला आहे. माझे आईवडील दिल्लीला आहेत! पण मी मुळचा पुण्याचा माझे आजोबा आजी पुण्याला असतात.'' अनिल.

''म्हणजे तु कोल्हापूरचा नाहीस?'' सुशमा.

''नाही!'' अनिल.

''तु मला त्या जखमी अवस्थेतून आणलेस. मोठे उपकार झाले माझ्यावर शिवाय तुझे रक्त दिलेस, माझा जीव वाचवलास! मोठे उपकार झाले. तू मला 'आई' म्हणालास मी तुला माझे बाळच समजले. माझे आता येथे कोणी नाही. माझे यजमान वीस वर्षापूर्वी गेले. मी मुंबईहून सारे आवरून येथे येऊन स्थायिक झाले. थोडी शेती आहे ती करते. त्यावर माझी गुजराण होते. लहानपणी हा खेळ मी पाहिला होता पण नंतर योग नाही आला म्हणून एकदा पहावा म्हणून सकाळ पासून येथे थांबून होते आणि पुढचे तुला माहित आहे. मी मेले असते तर चांगले झाले असते. आता एकटी आहे कोणी आधाराला नाही उतारवयात काय वाढून ठेवले असेल माहित नाही. एकाकी जगावे लागेल! जाऊ दे बाळ! तुझे लग्न झाले कां? आणि घरात कोण कोण असते?'' सुशमा.

''नाही! कोणी नाही मी एकटाच असतो. सरकारी नोकर चाकर आहेत. छान चालले आहे, जातो महिना दोन महिनांनी दिल्लीला!'' अनिल.

''कोण असते तेथे?'' सुशमा.

''माझे आई बाबा!'' अनिल.

''त्यांचे नाव सांगशिल का?''

''शरद आणि नंदिता ते फार मोठे सरकारी अधिकारी आहेत. भारत सरकारचे!'' अनिल.

हे ऐकताच सुशमा थरारली तिला भुतकाळात डॉ. पवारांकडे घडलेल्या सगळ्या प्रसंगाची आठवण झाली. ती तिचे बाळ तेथेच हॉस्पीटलमध्ये सोडून आली होती ते काळे सावळे असून आणि क्षणभर तिचे डोळे पाणावले. आता माझे मुल माझ्या जवळ असते तर? ते या बाळा येवढेच असते अनिल समोर हे सांगण्याची ही वेळ नव्हती. हॉस्पीटल मधून अनिलला त्याच्या सरकारी

बंगल्यावर परतायचे होते. लद्या पालक मंत्र्यांचे वास्तव्य कोल्हापूरात होते, सकाळपासून त्यांच्या मिटींग होत्या. त्यांची एक व्हिजिट पोलीस मुख्यालयात दुपारी होती व आता होऊ घातलेल्या लोक सभेच्या निवडणुकीत बंदोबस्त लत्तम ठेऊन अनिलला त्यांनी पूर्वीच ही जबाबदारी दिली होत. म्हणून अनिलने तेथून निघण्याची घाई केली.

''आई! मी येतो. लद्या तुला हॉस्पीटलमधून डॉक्टर सोडणार आहेत. मी येईन त्यावेळी!'' अनिल.

आणि संध्याकाळी अनिल हॉस्पीटलला आला डॉक्टरांनी अजून तिला Disbharge दिला नव्हता. त्यांची व्हिजीट जरा लांबली. आता सहा वाजून गेले होते.

''आई! तुझे घर कोठे आहे? मी तुला तुझ्या घरी सोडून जाईल! येईन मध्येमध्ये तुला भेटायला!'' अनिल

सुशमा काहीच बोलली नाही. डॉक्टरांनी तिला डिस्चार्ज दिला आणि अनिलच्या पोलीस गाडीने ते सुशमाच्या घराकडे निघाले. दहा मिनिटात ते तेथे आले. अनिलने त्याच्या गाडीतून लतरून तिचे घर पाहिले. एक पाकी छोटेसे घर होते. केंबळारी अर्धी कौले  फुटली होती ते घर बघून अनिल खूप दु:खी झाला.

''आई! हे घर तसे रहाण्याला आता सुरक्षित नाही. तू माझ्याकडे चल तू अजून पूर्ण बरी झालेली नाहीस. मग येथे येण्याचे पाहू बाळ खूप बरे वाटले तुझे बोलणे ऐकून आता त्या घरात मला पाणी कोण देईल कालपर्यंत मी अनिल होते. आता हात पाय पार जखडले आहेत. मला उठण्याबसण्यालाही त्रास होत आहे.''

''आई! मग तु माझ्याकडे चलच! मग पुढचे पुढे पाहू!'' अनिल.

आणि ती दोघे अनिलच्या बंगल्यावर आले, खूप मोठा ४ बेडरुमचा बंगला शिवाय सगळ्या सोयींनी युक्त खानसाम्याही होता.... अनीलने आपल्या खानसाम्याला बोलावले. व बोलला.

''हि माझी आई आहे! तिला काहीही त्रास होणार नाही! सकाळी तिला दुध दे, औषधे घ्यायला लावा. तिच्या बेडरूममध्ये छोटीशी लाईट लावा आणि तिची काळजी घ्या!'' अनिल.

दुसऱ्या दिवशी १० वाजता अनिलने डायव्हरला बोलावून घेतले आणि

मार्केटला जाऊन सुशमासाठी दोन साड्या, रेडिमेड ब्लाऊज, परकर तो घेऊन आला आणि सुशमाला दिले.

आता सुशमा घरात हिंडू फिरू लागली होती. हॉलमध्ये अनिलच्या एका टेबलावर तिने पहिले तर शरद आणि नंदिताचा फोटो फ्रेममध्ये होता तो पाहिला... आणि सुशमाच्या मनातल्या संशयाला दुजोरा मिळाला. म्हणजे अनिल हा माझाच मुलगा आहे. त्यांनी दोन्ही मुले नेली, वाढवली, शिकवली आणि उच्च पदाच्या पदावर त्याला नोकरीला लावले. हे त्यांचे मोठे उपकारच म्हणावे लागतील. त्याच क्षणी त्या जोडप्याबद्दल इतकी वर्षे धुमसत असलेला तिचा राग खाड्कन उतरला आणि बराच वेळ तिच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहत होत्या आणि अनिल हा माझा रक्तामासाचा मुलगा आहे. याबाबत तिच्या मनात शंका उरली नाही.

''तर अनिल हे तुझे आई बाबा!'' सुशमा.

''हो! सुशमा, तुझा जन्म कोणत्या हॉस्पीटलमध्ये झाला. डॉ. पवार यांच्या बोरीवलीच्या हॉस्पीटलमध्ये झाला तर! तुझी जन्मतारीख १/१/१९९८ खरे ना!'' सुशमा.

''होय आई! पण हे तुला कसे माहिती?''

आणि सुशमाने अनिलला मिठी मारली आणि ओक्सा बोक्सी रडू लागली तीचे रडणे थांबेना.

''बाळ! मी तुझी खरी जन्मदाती आई आहे. आज तु माझ्याजवळ माझा म्हणून नाहीस कारण हा सगळा प्रकार अदलाबदलीमुळे झाला!'' सुशमा.

''तो कसा?'' अनिल

आणि सुशमाने सगळी हकिकत अनिलला सांगितली

''त्या भल्या लोकांनी तुला मुलासारखे वाढवले, मोठा केला हे त्यांचे लपकार मी कधीच विसरू शकत नाही. खरचं ती माणसे देव माणसे निघाली नाहीतर तू बेवारस होऊन, पुढे तुझे काय झाले असते ते तो देवच जाणे!'' सुशमा

अजुनही अनिल सुशमाच्या मिठीत होता आणि अनिल समोर शरद आणि नंदीता यांचे चेहरे तरळत होते.

आपल्या जन्माची ही कथा अनिलला आश्चर्यकारक वाटली. पण याचा उलगडा त्याचे दिल्लीचे आई बाबा आणि हॉस्पीटल मधल्या नोंदीतूनच स्पष्ट

होणार होती.

मध्येच दोन दिवसांनी अनिल दिल्लीला गेला. आई बाबांना भेटला पण या गोष्टीची वाच्यता करण्याची हिमंत त्याला झाली नाही. तो तसाच घरी कोल्हापूरला प्लेनने पोहोचला. त्याने मुंबईला फोन केले तपासा अंती समजले ते हॉस्पीटल बंद झाले आणि त्या डॉ. पवारही हयात नाहीत.

घरी येताच त्याने सुशमाला सुनावले

''आई हे बघ! तु मला नाकारलस त्यांनी मला आई वडिलांचे प्रेम दिले, वाढवलं म्हणून मी आज असा आहे. त्यांचे उपकार माझ्यावर आणि तुझ्यावर आहेत. आता तू ह्या गोष्टी पूर्णपणे विसर. केव्हातरी ते येतील तू जराही या गोष्टी बद्दल विचारायचे नाही. माझे आई वडील तेच आहेत. तुझा तो अधिकार नाही. जरी तू माझी खरी आई आहेस. माझी ही फिरती नोकरी मी भारतात कोठेही असेन येत राहीन, तुला भेटेन, राहीन तुझ्याबरोबर हे पक्के ध्यानात ठेव!'' अनिल.

आणि दोन महिन्यात अनिलची बदली DSP म्हणून शिर्डीला झाली. हा बंगला सोडण्यापूर्वी अनिलने सुशमाचे घर सुधारले. अंगणात एक बोरींग पाडून घेतली पाण्याच्या व्यवस्थेसाठी. सर्व सोई तिच्यासाठी करून ठेवल्या आणि तिल्या त्या घरी सोडले. आठवडा भरात त्याला तेथे जॉईन व्हायचे होते. तत्पूर्वी तो सुशमाला भेटून गेला.

हा सगळा प्रकार खरेतर अदलाबदलीने झाला हे खरे पण त्यावेळी नियतीने काय योजिले होते अनिलच्या जीवनात त्याचे सारे चित्र आता आपणास दिसले. हा नियतीचा खेळ की अदलाबदलीचा हे वाचकानीच शोधावे हे बरे! नाही कां!!

०–०–०

# ध्यास भक्तिचा!!

कधी कधी काय होते; छोट्या मोठ्या घटना घडतात अगदी नगण्य, पण त्याचे परिणाम त्या परिसरातील मुलांवर, तरूणांवर, वृद्ध, निवृत्त लोकांवर खोलवर होतात. समरस होते ही मंडळी त्या घटनेच्या पडसादाने आणि मोठे गारूड होते. मना मनात, अंतर मनात खोलवर, खरेतर तो त्यांच्या जीवनाचा एक अविभाज्य भागच बनून जातो जगण्यातला.

असतो मुंबईतला वरळी विभाग, बहुतेक गिरणीत छोट्या मोठ्या कंपनीत काम करून आपला प्रपंच रेटीत असतात. सोबत घेऊन सुख दु:खाची भेंडोळी लसवित. पण काही ध्येयवाद नसतोच त्यांना फक्त आयुष्य रेटायचे. १२X१० च्या या BDD चाळीच्या खोल्या, त्यात दाटीवाटीने राहणारी एकत्र कुटुंबे. काम करणे बंद झाले की कोकणचा रस्ता धरतात पुन्हा न येण्यासाठी, आपल्या मुलांवर सोपवून सगळा भार. खर तर त्यातली ९०% कुटुंबे कशीतरी दोन वेळच्या जेवणात दिवस काढीत असतात. पण मंदिरात जाणे, भक्तिभावाने नमस्कार करणे, गाऱ्हाणे घालणे देवताना आपल्यासाठी, मुलाबाळांसाठी बस. फार अपेक्षा नसतात त्यांच्या मनात मुलांच्या शिक्षण बद्दल, काही भव्य दिव्य करावे यासाठी.

अशा या वरळीच्या भागात प्रचंड क्रांती झाली ती एका छोट्याश्या घटनेने आणि झपाटला हा परिसर पुढची ३०/३५ वर्षे भक्तिमय अंत:करणाने तो परिसर, परिसरातील लहान थोर मंडळी, ज्यांनी कात टाकली शाळेत जाणाऱ्या मुलांपासून सगळ्यांनीच.

अहो साई बाबांच्या भक्तीचा स्त्रोत खरे तर सगळ्यांच्या हृदयात, मनात भक्तिमय स्त्रोताने क्रांती केली असेच म्हणावे लागेल! त्यात प्रत्येकजण ओढला गेला आमचा राजू ही त्यातला एक...

वरळीच्या गिरणगावात बालपण गेले राजूचे. त्या बीडीडी चाळीच्या परिसरात अचानक एक साधू प्रकटले आणि तुम्हाला आश्चर्य वाटेल, त्या साधूंच्या वास्तव्याने तो परिसर पार झपाटला गेला. राजू आणि त्याच्या बरोबरची सगळी मुले, त्यावेळी तो शाळेत जायचा. मराठी मंदिरच्या शाळेत. शाळा सुटली की पाच पंचवीस मुले दुपारच्या आरत्यांना तेथे त्या साधूंसाठी लोकांनी लभारलेल्या तंबूस जमा व्हायची. दुपारच्या आरत्या होत आणि

प्रसाद घेऊन ती मुले घरोघर जायची.

कोणीतरी शिर्डीच्या साई बाबांचा भव्य फोटो आणून लावला व नंतर काही वर्षांनी तशीच हुबेहुब मूर्तीही बसवली. सभोवतालच्या भिंती लठल्या त्याला मंदिराचे स्वरूप आले. भाविक वाढले. सकाळ संध्याकाळ या परिसराचे वयस्क नागरिक हळू हळू जमा होऊ लागले. दुपार, संध्याकाळच्या आरत्यांना तुफान गर्दी होऊ लागली आणि त्या मठाचा एक ट्रस्ट लोकांनी केला पण त्याकाळी राजू आणि त्याचे मित्र जे तेथील निस्सिम भक्त बनले. त्या मठात जाणे, आरत्यांची तयारी करणे सगळी कामे हे बाळ गोपाळ मंडळी करीत होते.

आता तर संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. साई जयंती, साई पुण्यतिथी, दिवाळी, दसरा या काळात मोठी जत्राच भरे. दोन-तीन दिवस हा सोहळा चालायचा. तेथील तरूण मंडळी पार झपाटली होती. त्या वेळी राजू रुईया महाविद्यालयात शिकत होता. त्या तरूण मुलांनी ठरविले आपण दरवर्षी पायी चालत जायचे. सोबत साईची पालखी घेऊन आणि राजू आणि रमेश त्याचा मित्र सारे नियोजन काटेकोरपणे करीत असत. म्हणजे कधी निघायचे ते कोठे थांबायचे? तेथे जेवणाची व्यवस्था, लागणारा पैसा देणगी रूपाने जमायचा. सढळ हस्ते सर्व नागरिकांचा सहभाग असायचा.

तुम्हाला आश्चर्य वाटेल या सगळ्या मुलांनी उत्तम अभ्यास केला, नोकऱ्या मिळवल्या, ही सर्व साईबाबांची कृपा आहे याच भावनेने. गेली ३० वर्षे हा पालखी सोहळा चालू आहे आणि मंदिरही खूप मोठे बांधून घेतले. आता ते साधू खूपच वयस्कर झाले होते. ते कोठून आले हे ही कोणाला माहित नव्हते. खूप छान प्रवचन करीत. साईचरित्राचे पारायण नेहमी चालू असे. भक्तिचा धूर निघत होता. वरळीच्या परिसरात असेच म्हणावे लागेल.

राजू त्यावेळी रिलायन्स ग्रुपमध्ये चांगल्या पोस्टवर काम करीत होता. रमेश पोलीसमध्ये. सगळी मुले लत्तम नोकऱ्यात सेटल झाली होती. त्यात राजू आता चाळीशीला आला होता. लहानपणी ती त्यांच्या काकांकडे ३६ नंबरच्या इमारतीत रहात होता. पण ते गावाला गेले. मधल्या काळात गिरण गावात खूपच ललथा पालथ झाल्या गिरण्यातील बेकार लोकांनी गाव गाढला होता. राजूच्या काकांनी त्यांची रूम विकली आणि राजू मित्रांकडेच रहात होता. त्याने लग्नाचा विचार केला असेल पण जागा मिळण्यासारखी नव्हती

असे नाही. आणि राजूला वरळी अर्थात साईबाबांना सोडून जायचे नव्हते. कारण सबर्ब मधून नेहमी येणे. मठातली व्यवस्था पहाणे कठीण होते. पुर्वीचे बुजुर्ग लोक आता वयस्क झाले होते आणि मठाची जबाबदारी तरूण मंडळींवर सोपवून बाजूला झाले. त्यात सातत्याने शिर्डीचा पालखी सोहळा ही मोठी जबाबदारीच होतीच ना आणि यात राजूचे विवाहाचे वय होऊन गेले. त्यालाही त्याची चिंता नव्हतीच म्हणा आणि त्यात वयस्क झालेल्या महाराजांचे निर्वाण झाले.

आता त्या मठाची सगळी जबाबदारी राजू आणि त्यांच्या तरूण मित्रांच्या खांद्यावर आली होती. सकाळी काकड आरती, मग पारायण, पूजा, दुपारची आरती व संध्याकाळची शेजारती हे सगळे शिर्डीच्या साई मंदिरातल्या संस्कारासारखे काटेकोरपणे पाळले जात होते. महाराष्ट्र सरकारने या मंदिराला पर्यटनाचा 'क' वर्ग बहाल केला आणि याचवेळी BDD चाळीच्या पुर्नवसनाची तयारी सुरू झाली. खरे तर हे मंदिरच अनधिकृत होते पण आमदारांच्या दबावाने त्याचेही पुर्नवसन करायला त्यांनी या प्रोजेक्टचे कॉन्ट्रॅक्टर L & T ला करून द्यावा असा दबाव आला व या मठाचे पुर्नवसन होणार हे निश्चित झाले. पण मंदिराचे काय?

मंदिर पुन: बांधणार की नाही? ही बातमी व्हायरल झाली. राव प्रचंड अस्वस्थता संपूर्ण वरळीत पसरली. बिल्डरने सांगितले एक मंदिर ठीक, अहो प्रत्येक चाळीत मंदिर. आम्हाला म्हाडा परवानगी देत नाही. तुम्ही म्हाडाशी भांडा. आमचे हात बांधलेले आहेत. अख्खी वरळी आंदोलनाच्या पवित्र्यात. कामे थांबावली गेली. बिल्डरचा नाइलाज. महिनाभर काम ठप्प.

आणि या आंदोलनासाठी राजू महिनाभर कामावर गेलाच नाही. कंपनीत बोंबाबोंब. आता काय करावे यासाठी गुरूवारी आरतीनंतर सभा झाली. मंदिरासाठी आंदोलन तीव्र करण्याचे ठरले. म्हाडाला नोटीस दिली, काही लोक कोर्टात गेले पण अनधिकृत बांधकाम असलेल्या मंदिराला कोर्टानेही ठूकारले. स्थानिक पुढारी, आमदार, राजकारणी यांनी या विस्तवावर आपल्या भाकऱ्या भाजायला सुरूवात केली.

पंधरा दिवसातच मंदिराला नोटीस चिटकवली आणि पुढच्या पंधराव्या दिवशी दोन बुलडोझर मंदिराजवळ येऊन उभे राहिले. या काळात म्हाडाचे अधिकारी बिल्डरच्या लोकांबरोबर सकाळ-संध्याकाळ चक्कर मारून जात.

त्यांच्या हालचाली वाढल्या आणि लोक अस्वस्थ झाले. आता पर्वा सकाळी तोड कामाला सुरूवात होणार होती गेले दोन दिवस पोलीसांची मोठी फौजच मंदिराला विळखा घालून बसली. पण राजूसह काही कार्यकर्ते मंदिरात ढीय्या मारून बसले होते.

कारवाई सुरू होताच पोलीसांनी मंदिरात असलेल्या राजू आणि इतर १०/१२ कार्यकर्त्यांना बाहेर येण्याचा इशारा दिला. पण कोणीच बाहेर येईना. तेव्हा पोलीस मंदिरात घुसले. पण ततपुर्वी राजू मंदिराच्या दरवाज्यात लभा राहिला. त्याने पोलीस अधिकाऱ्यांना सात दिवसाची मुदत मागितली.... आणि तो आत जाताच एक प्रचंड नाग मंदिराच्या दरवाज्यात येऊन बसला. पोलीस लांब गेले म्हणजे थोड्या वेळासाठी पांगले. त्या नागामुळे मंदिरात कोणी जाईना. कारवाई थांबली, त्यात एक अधिकारी लोकांना विचारीत होता.

''हा! नाग कोणी सोडला?''

लोक म्हणत होते त्याचे वास्तव्य गेली ८/९ वर्षे मंदिरातच असते. तो कधी कधी त्या मंदिरा मागच्या वडाच्या झाडावर दिसतो. रात्री मंदिरात असतो!''

आणि त्याच वेळी पालखी सोहळा शिर्डीला दुपारी प्रयाण करता झाला. राजू सह दिडशे कार्यकर्ते दिंडी सोबत गेले. मंदिर उघडेच होते. आणि तो फणेवाला नाग दरवाज्यातच बसून होता. मंदिरात पुजा अर्चा चालू होत्या. त्या कार्यकर्त्यांना त्या नागाची भिती जराही वाटत नव्हती. रात्रीच्या शेजारत्या झाल्या की कोणीतरी दरवाजे ढकलून घेई. पण आत तो नाग आहे या भितीने कोणीही मंदिरा कडे फिरकत नव्हते.

एक आठवड्याने शिर्डीला गेलेली मंडळी परत आली. मंदिर जैसे थे होते. सगळ्यांना आश्चर्य वाटले. मग दुसऱ्या दिवशी जंगी भंडारा झाला. हजारो लोकांनी त्यात भाग घेतला आणि आता लगोलगच दत्त जयंतीचा सप्ताह होणार होता. गुरु चरित्राचे पारायण, साई चरित्राचे पारायण सुरु झाले. आरत्यांना प्रचंड गर्दी होऊ लागली, हा सगळा माहोल पाहून म्हाडानेही अहिंसेचे धोरण स्वीकारले. हे साई मंदिर या विभागाचा प्राण झाला होता. त्यात जवळच असलेली लोक सभेची निवडणूक, आता त्यामुळे नेते, आमदार यांचे तेथेच बस्तान असे. ती जागा जांबोरी मंदिराची मोक्याची जागा

होती. प्रचंड राजकीय दबावाला सरकारने कच खाल्ली. मंदिरावरची कारवाई थांबली आणि लगोलग विधान सभेची निवडणूक. सरकारने या मंदिरासाठी त्या प्लॉटच्या एका कोपऱ्यात जागा दिली आणि बांधकाम सुरु झाले. दोन महिन्यात भव्य मंदिर तयार झाले.

पण गेल्या आठ महिन्यात राजू काही ऑफिसला गेला नाही. कधी पीएल, कधी मेडीकल मारीत त्याने मंदिराचा मॅटर मार्गी लागत नाही तोवर कामावर जायचे नाही. असा निर्धार केला होता. प्रसंगी राजीनामाही देईन. असेही तो मित्रांना सांगत होता. त्याला रात्रंदिवस ध्यास होता तो मंदिर होण्याचा. दिवसरात्र मंदिर... मंदिर... मंदिर... बस्स!

आता सगळ्या मुलांचे स्वप्न पूर्ण झालेले होते. त्यासाठी एवढा संघर्ष केला होता त्यांनी. सगळे साईभक्तीने भारावले होते. ती जेव्हा शिर्डीला गेली तेव्हा दरवाज्यात दिसलेला नाग अजूनही दिसतो कधी कधी त्या पिंपळावर. सभोवताली एवढ्या इमारती झाल्या तरी ते पिंपळाचे झाड डौलाने नांदत आहे तेथे अजून. तो पिंपळ नाही ही कल्पनाही करु शकत नाही आपण कोणीही वरळीकर.

कोठून ते महाराज आले. त्यांनी भक्तिचे रोपं वरळीत लावले. आपल्या शक्ति पाताने वेड लावले गेल्या तीन पिढ्यांना आणि भक्तिचा अथांग कुंभ राजू च्या पीढीला मुलांच्या हाती सोपवून निघून गेले. त्यांच्या भक्तिने अनेकांची व्यसने सुटली, ७०-८० वर्षाचे बुजर्ग येतात, बसतात साई नामाचा जप करतात. अनेकांचे संसार फूलले आनंदी झाले. हा चमत्कार नव्हे काय?

साई शक्तिच्या आणि साई भक्तिच्या स्त्रोताने ही वरळीची जागा, पवित्र, भक्तिमय झाली आहे!!

०-०-०

# खेळ नियतीचा

औरंगबादच्या अखिल भारतीय संमेलनाच्या निमित्ताने माझे जाणे झाले. तीन दिवसाचे संमेलन. मी एक दिवस अगोदरच निघालो आणि माझे मित्र सदानंद यादव, जेष्ठ लेखक यांचे घरी लतरलो. त्यानंतर माझी व्यवस्था संमेलनाचे निमंत्रक करणार होते.

मी सकाळीच भाऊंकडे म्हणजे सदानंद यांच्याकडे येऊन दाखल झालो. आजचा पूर्ण दिवस मला मोकळा होता पण भाऊ हे संयोजनात असल्याने त्यांना सम्मेलनाच्या ठिकाणी जावे लागले. ही सात-आठ वर्षापूर्वीची गोष्ट.

त्यांच्या घरात एक सुंदर मुलगी राधा. हिच्या हवाली त्यांनी मला केले व माझी सगळी व्यवस्था तिने करावी अशी सूचना भाऊने तिला दिली. मी घरी येताच तिने मला पाणी, चहा व नाष्टा आणून डायनिंग टेबलवर ठेऊन. मी तिकडे जावी अशी हातानेच सूचना केली. एक अक्षरही ती बोलली नाही. मला आश्चर्य वाटले 'ही मोनी आहे कां?' असा संशय मला आला.

मी नाष्टा केला व भाऊच्या कबर्डमधून एक त्याचे नवे कोरे पुस्तक काढून वाचत बसलो. थोड्या वेळाने ती पुन्हा माझ्या जवळ आली आणि तिला काय सांगायचे होते हे मला कळेना. पण तिने डोक्यावर उलटा अंगठा ठेऊन काहीतरी सूचना केली आणि तिने बाथरूमकडे बोट दाखवले. म्हणजे मी आंघोळ करून घ्यावी असे तिला सांगायचे होते. हे मला समजले, आणि माझा संशय खरा होता असा माझा समज झाला. मी आंघोळ केली, एवढ्यात तिने डायनिंग टेबलवर जेवण ठेवले व जेवणाची सूचना केली.

दुपारची वेळ होती भाऊ (सदानंद) घरी आले. माझ्या मनातली त्या मुली विषयीची खद खद पाण्याला ऊकळी यावी तशी ओठावर येई, पण मी विचारू कसे त्यांना हाच प्रश्न मला पडला होता.

''काय रे तुला काय म्हणायचे आहे? एवढ्या कसल्या गहन विचारात तू आहेस, काय विचारायचे ते विचार ना?'' भाऊ.

''हो! विचारतो! ही घरातली मुलगी कोण? ती बोलत कां नाही!'' मी.

''सांगतो! ती एक मोठी कथा आहे. सांगतो, सतरा वर्षे होऊन गेली त्या घटनेला. येथील अ.भा.म. साहित्य सम्मेलना वेळेची ही घटना. संमेलन संपले आम्ही आवरा आवर करीत होतो. माझ्याकडे सभागृहाच्या व्यवस्थाची

जबाबदारी होती. रात्रीचे आठ वाजले होते. आम्ही लाईट ऑफ केली आणि येवढ्यात एका लहान मुलीच्या रडण्याचा आवाज आला. तिथे कोणी लहान मुल असेल अशी सुतराम शक्यता ही नव्हती आम्हाला. आता आवाज अधिक मोठा झाला. म्हणून कोण आहे हे पहावे म्हणून लाईट पुन्हाऑन करण्यास सांगितले.... तर एक पाच वर्षाची मुलगी, लाईट आली तरी मुसु मुसु रडतच होती. दिसायला खूप सुंदर, लांब केस, पाण्याने वाहणाऱ्या अश्रूंच्या धारेत डुबलेले डोळे पाहून मी चरकलो. ही येथे कशी?, कोठून आली? हिचे नाव काय, कोणाची मुलगी ही? अशा अनेक प्रश्नांनी, शंका कुशंकानी मी पार गोंधळून गेलो होतो!'' भाऊ.

''मग पुढे काय झाले?'' मी.

''सांगतो! आता आम्हाला लाईट बंद करावी लागणार होती. मी व कॉन्ट्रॅक्टरचा एक माणूस असे दोघेच आम्ही होतो. आता या मुलीचे काय करायचे कोठे ठेवायची हिला, घरी घेऊन जाऊ कां? बाकी सगळा परिसर काळोखला होता. शेवटी लाईट बंद करून, त्या मुलीला घेऊन मी बाहेर आलो. मी तिला विचारले....

''बाळा! तुझे नाव काय?'' भाऊ.

ती छान शी हसली! पण बोलली काहीच नाही.

''तू कोठे रहातेस?'' भाऊ.

पण ती काहीच बोलली नाही. मला प्रश्न पडला इतकी सुंदर, गोरीपान पण मळलेल्या फ्रॉक मधली... फक्त हसत राहिली आणि मनातून माझ्या हृदयात अलगद लतरली!'' भाऊ.

पहारेकऱ्याला सांगून मी माझी बाईक आणली, तोवर ती माझ्याजवळ बसून होती. ''तु माझ्या बरोबर घरी येतेस का?'' भाऊ.

म्हणताच तिने माझे हात पकडले आणि माझ्या तोंडाकडे पहात राहिली. माझे मनही दयेने ओसंडून वाहिले. खरेतर आजूबाजूचा परिसर शांत. चिट पाखरूही नव्हते त्या माळावर. मी माझी बाईक चालू केली. तिला पुढे बसवली आणि घरी आलो. तिला खाली उतरवले बाईक बंद केली आणि घराची बेल वाजवली.'' भाऊ.

पत्नीने दार लघडले? आणि ''ही कोण? कोणाची मुलगी?... कोठून आणलीत!'' पत्नी.

‘‘सांगतो! अश पण आत येऊन देशील की नाही!’’ भाऊ.

आणि ती दरवाज्यातून दूर झाली. आम्ही आत आलो. घरी येताच तिने हाताने ‘काहीतरी खायला द्या’ अशी खूण केली आणि एक हात पोटाला लावला. तिला भूक लागली आहे हे आम्हाला समजले. पत्नीने सगळ्यांना जेवण डायनिंग टेबलवर वाढले आणि ती सोफ्यावरच कलंडली.

‘‘आता बोल! तुझ्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे मी देतो!’’ भाऊ.

आणि घटनांची सगळी हकिकत भाऊने तिच्या पत्नीला सांगितली, ती पण अवाक झाली. ती उठली, त्या चिमुकलीला उचलून आपल्या बेडरूममध्ये जाऊन तिने झोपविले आणि परत आली.

आमचे लग्न झाल्यानंतर पंधरा वर्षे झाली तरी आमच्या घरात पाळणा हलला नाही. याचा खंत माझ्या पत्नीला सतत होत होती आणि आता तर चाळीसी पार झाल्यावर शक्यताही मावळली होती. आम्ही आशाच सोडून दिली होती.

भाऊ सांगत होते – मी पोलीसांना कळविले. फोटो काढून वर्तमानपत्रात प्रसिद्ध केला. पण कोणाचा प्रतिसाद आला नाही. तिला निराधारगृहात ठेवण्यापेक्षा आपणच सांभाळतो तसे पोलिसांना लिहून देऊन आम्हीच हिचे संगोपन करावे, छान शिक्षण द्यावे आणि मोठी झाल्यावर आमची कन्या म्हणूनच तिचे कन्यादान करावे असे विचार झरझर मनात येऊन गेले.

आणि आम्ही तिला आमची मुलगी म्हणून स्वीकारली. तिचे नाव ठेवले ‘सुंदरी’.

सुंदरी खूप सुंदर, अप्सराच जणू कलेकलेने वाढत गेली. त्याला आता सतरा वर्षे झाली होती. ती हुशार होती भाऊने तिला मुक–बधीर मुलांच्या शाळेत घातले. तेथून ती पदवीधर झाली. तिने नंतर BSI केलं व त्याच शाळेत शिक्षिका म्हणून लागली.

भाऊने तिला बोलता यावे यासाठी खूप प्रयत्न केले. अगदी मुंबईच्या प्रसिद्ध डॉक्टराना दाखविले. पण त्यांनीही हात टेकले.

मी १७ वर्षापुर्वी जेव्हा अ.भा.सा. संम्मेलनाला आलो तेव्हा त्या चिमुरडीला घरात खेळताना पाहिले होते. आता सुंदरी बावीस वर्षाची झाली होती.

भाऊ मला म्हणाले, ‘‘दादा मी फार मोठ्या विवंचनेत आहे. सुंदरी आता

लग्नाला झाली आहे, बीन आई बापाची पोर आता आम्हीच तिचे 'आई बाप' पण हिच्या बरोबर कोण लग्न करेल. कोणतीही गोष्ट गुलदस्यात न ठेवता खरे सांगितले तर स्वीकारील का कोण हिला... ?

आणि झटकन मी म्हणालो, ''मी स्वीकारीन माझ्या मुलासाठी! मी.''

भाऊ चाट पडला

''तू!'' भाऊ.

''हो! माझ्या अविनाशसाठी तो गेल्याच आठवड्यात लंडनहून आला आहे. त्याने मेडीसीन मध्ये PHD केली आहे.'' मी त्याला बोलावून घेता. तो ठरविल की या बाबत काय करता येऊ शकेल ते.

आणि दुसऱ्या दिवशी सकाळी अविनाश औरंगाबादला आला. त्या दिवशी संम्मेलनाचे लद्‌घाटन होणार होते. ढाले पाटील सर या संम्मेलनाचे अध्यक्ष स्थान स्वीकारणार होते. ह्या दिवशी सकाळचा वेळ तसा मोकळा होता. घरात वावरणाऱ्या सुंदरीला याची जराही कल्पना नव्हती. डॉ. अविनाश सर्व इंन्स्ट्रूमेंटसह आला होता. प्रथम सुंदरीला पहातात तो गडबडलाच हे आमच्या ध्यानात आले. इतके सुंदर ध्यान येथे पाहून क्षणभर त्याने डोळे मिटले आणि त्याने सुंदरीला तपासले. बराच वेळ तो तिच्याकडे पहातच होता आणि तीही त्या राजबिंड तरूणाला पाहून थोडा वेळ गडबडली.

''तुमचे नाव काय?'' डॉ. अविनाश

ती काहीच बोलली नाही.

अविनाशला मी काहीच सांगितले नव्हते सुंदरी बद्दल, सुंदरीने खुणेने 'मी बोलू शकत नाही' हे दाखविले. अविनाशच्या ध्यानी सगळे आले...

''फारशी सिरीयस केस नाही! ही बोलू शकते पण एक छोटीशी शस्त्रक्रिया करावी लागेल हिच्या जीभेला. अशा अनेक केसेस मी पाहिल्या आहेत. मग काय करावे?'' डॉ. अविनाश.

''पण ही शस्त्रक्रिया कोठे होईल?'' भाऊ.

''लंडनला!'' डॉ. अविनाश

मग थोडावेळ हॉलमध्ये शांतता पसरली. सुंदरी आत निघून गेली...

''आवि, तुला ही मुलगी पसंत आहे?'' मी.

आणि अविनाश गडबडला....

''हो! पप्पा!'' अविनाश.

''मग लग्न करून, तु हिला लंडनला घेऊन जा!'' मी.

.''माझी तयारी आहे!'' डॉ. अविनाश.

आणि मग डॉ. अविनाश भडाभडा बोलत होता. अशा केसच्या संदर्भात आणि मी, माझी पत्नी आणि भाऊ लभयता ऐकतच राहिलो. अविनाश इतक्या झटपट यासाठी तयार होईल अशी माझी अपेक्षा नव्हती. पण सारे घडले ते अनपेक्षीतच.

अधिवेशन संपले नी भाऊ उभयता सुंदरीला घेऊन मुंबईला आले आणि अविनाश सुंदरीचा विवाह वैदिक पद्धतीने करून मोकळे झालो.

मग पासपोर्टसाठी सुंदरीची धावपळ झाली आणि अविनाश-सुंदरी लंडनला रवाना झाली. काही गोष्टी ज्या घडायच्या असतात ना इतक्या वेगाने घडतात की आपण अचंबीत होतो.

लंडनला जाताच अविनाशने सुंदरीचे सगळे रिपोर्ट करून घेतले. सगळे नॉर्मल होते आणि अविनाशने त्याचे वरिष्ठ डॉ.रॉबर्ट यांच्याकडून ही शस्त्रक्रिया करून घेतली आणि काय आश्चर्य सुंदरीच्या स्वरयंत्रातील ...... भाग काढल्याने ती सुरूवातीला अस्पष्ट बोलू लागली. पुढे तीन दिवस ती हॉस्पीटलमध्येच होती.

घरी आल्यावर सुंदरी भाऊजवळ तिच्या आईजवळ काही शब्द बोलली. त्यांनाही आनंद झाला. आम्ही सुखावलो आणि महिनाभर थांबून ही जोडी स्विझरलँडला हनीमुनला गेली. आम्हा दोन्ही कुटुंबांना आनंद आवरणे कठीण झाले. ही घटना खरोखर अलौकिक होती. हे खरे कि नाही? याला काय म्हणावे?

संमेलनाला जाण्याचे मनात नसताना, माझा मुलगा लंडनहून यायला, मी तेथे जायला. सुंदरीला पाहून भाऊंना मी तिला सून म्हणून स्वीकारतो हे सांगणे हे नियतीचा खेळ नाही तर काय?

०-०-०

# स्फोट

बाबुराव मिलीटरीतून निवृत्त झाले, पण अधेमधें मुंबईला मुलाकडे त्यांचे येणे-जाणे होई. परवा गणपती पूर्वी ते त्यांची औषधे आणायला मुंबईला गेले आणि दोन दिवस गावाला येणार असताना त्यांच्या कानात दुखायला लागले. वैतागले. बरे तो रविवार होता. डॉक्टर ही नव्हते आणि संध्याकाळीच निघायचे होते. सी.एस.टी. वरुन ९.३० वाजताची ट्रेन होती. काय करावे त्यांना सुचेना. त्यांनी गावठी औषधे केली. पण कानातले दुखणे काही थांबेना. बैचेन झाले ते. मुंबईत रहावे, अश्विनी हॉस्पिटलला जावे तर ते ही शक्य नव्हते. मोठ्या मुश्किलीने ट्रेनचे तिकीट मिळाले होते. पुढे गणपतीला तर गावी जावे लागणारच होते. गाडी संध्याकाळची, शेवटी शोधा-शोध करुन घरात कानाच्या औषधाची एक बाटली त्यांना सापडली आणि नाइलाजाने त्यांनी त्या औषधाचे दोन थेंब कानात घातले आणि कानात प्रचंड आग झाली. कानातले दुखणे थांबले. पण तासाभरात पत्नीने काही काम सांगितले. त्यांना छान झोप लागली. त्यांना आवाज देऊन देऊन ती दमली. पण बाबुराव उठायचे नाव घेईनात. त्यांचे ऐकणे बंद झाले होते.

अगोदरच एक कान त्यांचा अधू झाला होता दुसऱ्या महायुद्धात म्हणून त्यांना मेडीकली अनफीट म्हणून घरी पाठविले होते. पण मग त्यांना एका कंपनीत वॉचमनची नोकरी लागली होती. तेथून निवृत्त झाल्यावर ते कायमचे गावालाच स्थायिक झाले होते. ते गावाला आले, चिपळूणला आणि तिथल्या कानाच्या डॉक्टरांकडे त्यांनी लपचार सुरु केले, फरक पडला २०% फक्त. दुखणे अगोदरच थांबले होते. पण ऐकणे बंदच झाले म्हणा. मोठी अडचण झाली होती. कोण काय बोलतोय ते त्यांना काहीच कळत नव्हते. बायको बिचारी सैरभैर झाली. त्यांच्या या नव्या वेडाने आणि बाबूराव नव्याच विचार चक्रात सापडले.

त्यांनी एस.टी.च्या गाडीने जायचे ठरविले. रात्री ९ ची चिपळूण गाडी, सेमी लक्झरी.

''अहो, तुम्हाला कुठे जायचे आहे ? तिकीट कोठपर्यंत देऊ ?'' कंडक्टर.

बाबुराव चक्रावले.... ''काय ?'' बाबुराव.

‘‘ तिकीट कोठपर्यंत देऊ ? हि गाडी रत्नागिरीला जाते!’’

बाबुरावांना काहीच ऐकायला येत नव्हते! काय बोलतोय कंडक्टर काहीच समजत नव्हते. बाबुरावांनी हातानेच इशारा केला आणि लांब हात केला.

‘‘रत्नागिरी का ?’’

कंडक्टरने साडे पाचशेचे तिकीट दिले.

‘‘ऐवढे ! का !’’

चिपळूणचे द्या असा इशारा केला.

‘‘मग असे सांगा ना.... ’’

‘‘तुम्ही असा दूरचा हात केला मला वाटले रत्नागिरी की काय ?’’

‘‘ऐकायला आले नाही का ?’’ कंडक्टर

तरीही बाबुराव गप्पच ! वैतागल्यासारखे करीत कंडक्टरने पुन्हा दुसरे तिकीट दिले.

‘‘हां, हे बरोबर.’’ बाबुराब.

बाबुराव गाडीत बसले. त्यांच्या बाजूला एक गृहस्थ बसले होते.

‘‘कोठवर जाणार ?’’

बाबुराव गप्पच.

‘‘अहो तुम्ही कोठवर जाणार ?’’ त्यांनी पुन्हा विचारले तरी बाबुराव गप्पच. त्या गृहस्थाने बाबुरावांचा नाद सोडला. त्यांचा डोळा लागला होता.

सकाळी गाडी चिपळूणला आली.

‘‘चिपळूण आले का ?’’ बाबूराव.

‘‘चिपळूणला उतरायचे आहे का ?’’ दुसरे गृहस्थ.

तरी बाबुराव गप्पच. पण लतरल्यावर त्यांना समजले की चिपळूण आले आणि ते खाली लतरले.

ते मग रिक्षा पकडून त्यांच्या टेरव गावाला आले. रिक्षा गावतली नव्हती. कोण्या दुसऱ्या गावतली होती. त्या रिक्षावाल्याला कोठे जावे कळत नव्हते. पण बाबुराव सांगितले त्याप्रमाणे ते घरी परतले.

पत्नीने दार उघडले. मग ते घरी आले.

‘‘कसा प्रवास झाला ?’’ पत्नी.

बाबुराव गप्पच.

पत्नीला थोडा संशय झाला. काल मुलाने त्यांच्या या आजाराबद्दल सांगितले होते. रात्रभर त्या काळजीने तिलाही झोप लागली नाही. आणि बाबुराव घरी आल्यावर त्याची प्रचिती तिला आली.

आता हे गांव, चिपळूण तालुक्याला एकमेव डॉक्टर. गर्दी मरणाची. शिवाय तो दिवस सोमवार. सोमवारी चिपळूणचे सगळे दवाखाने बंद. तो दिवस तसाच चिंतेत गेला. बाबुरावांच्या पत्नीने काही गावठी औषधे टाकली कानात. पण काहीही उपयोग झाला नाही.

सकाळी त्यांनी रिक्षाने चिपळूण गाठले. १५ पेशंट पहिलेच आले होते. प्रत्येक पेशंटला १/२ तास... म्हणजे दुपार होणार होती. त्या दोघांनी ठरवले आज हॉस्पिटलातच जेऊन जायचे. घरी ती दोघेच, म्हणजे जेवण कोण करणार?

दुपारी दीड वाजला.. त्यांचा नंबर लागला. अर्धा तास डॉक्टर तपासत होते. त्यांनी सोनोग्राफी केली. कानातला मळ काढला. पण तसाही काही फरक पडला नाही. फक्त कण कण असा आवाज येई.

''तुम्हाला काही मार लागला होता कां ?'' डॉक्टर.

''अहो डॉक्टर काय विचारत आहेत ?'' पत्नी.

बाबुरावांची ना हु ना चु.

''अहो ! काय विचारत आहेत डॉक्टर. येताना काही मार लागला कां ? अहो डॉक्टर असे विचारत आहेत.'' पत्नी.

तरीही बाबुराव गप्पच.

''यांना कोणताही आजार नाही. त्या घातलेल्या औषधामुळे हा प्रकार झाला आहे. ४/८ दिवसात ऐकायला येईल. तुम्ही ही औषधे घ्या.''

त्या दिवशी सकाळी त्यांच्या पत्नीने दुध तापायला ठेवले. आणि बाबुरावांना सांगून गेली. जरा बघा! मी येते बाथरुममधून.. तुम्ही लक्ष ठेवा. मात्र दुध आटणार नाही याची काळजी घ्या. त्या निघून गेल्या. आणि बाबुराव आपल्या कानाच्या चिंतेने त्रस्त होऊन डोक्याला हात लावून बसले. किती वेळ गेला हे त्यांना समजला नाही. आणि एकाएकी प्रचंड स्फोट झाला.... दुधाच्या टोपाचा, दुध जळाले, लालबुंद झाला टोप... त्याचा आकारच बदलला... तेढा-मेढा झाला तो. प्रचंड धुर झाला किचनमध्ये, काही दिसेनाच. साऱ्या घरभरचा धुर काढण्यासाठी खिडक्या लघडल्या.

आणि त्या प्रचंड आवाजाने... काय झाले ! काय झाले ! म्हणत बाबुराव किचनमध्ये आले....

''तुमचा पराक्रम !''

''कसला ?''

''पण अहो तुम्हाला ऐकायला आले बघा.''

त्या प्रचंड आवाजाने बाबुरावांना ऐकायला येऊ लागले.

''म्हणजे कानाच्या पडद्यावरचा औषधाचा दुसरा पडदा दुर झाला आणि ऐकायला येऊ लागले... सरु !'' बाबुराव.

''होय ! असेच झाले. आता चिंता नको.'' पत्नी.

''पुन्हा असा अघोरी लपाय करु नका. औषधांची एक्सायरी बघा आणि मगच औषधे घेत जा. हा प्रकार त्यामुळे झाला तर !'' पत्नी.

''म्हणजे हा त्या औषधाचा साईड-इफेक्ट होता तर!'' बाबुराव.

''होय.'' पत्नी.

बाबुराव गप्पच होते.

''अग तुझे एक लिटर दुध गेले. टोप वाकडा तिकडा झाला म्हणून मला आज हे ऐकायला येणे सुरु झाले.'' बाबुराव.

''अगं ऐकलेस का ? माझ्या कानातून ॐ चा आवाज सतत येत आहे !'' बाबुराव.

''म्हणजे तुम्हाला देव पावला तर!'' पत्नी.

''असेच वाटते. हा प्रताप त्या स्फोटाचा !'' बाबुराव.

''हो स्फोटाचा !'' पत्नी.

०-०-०-०

# कोलदांडा

शांता आणि रघू यांचे लग्न टेरव गावात, अगदी धूम धडाक्यात झाले. सगळ्या गावला निमंत्रण दिले होते. आदल्या दिवशी हळद, दुसऱ्या दिवशी लग्न आणि मग ललघवणीचा दिवस. अख्खा बकरा तुटला आणि त्याच दिवशी हळद लतरणीपण झाली. लग्न थाटात पार पडलं.

आता मुलगा आणि मुलगी एकाच गावातली. फक्त वाड्या वेगळ्या. पण समाज एकच. तसे ते काही लव मॅरेज नव्हते. एकमेकाची पसंती झाली. एकटीत एकमेकांना पाहिले असे केव्हा तरी. नाही तरी रघू नेहमी आपल्या बाईकने कंपनीत जाई खेरडीच्या एम.आय.डी.सी.मध्ये. पेपरची मिल होती ती. तीन शिफ्ट चालत. रघुने डिप्लोमा केला होता. हुशार होता तो. गेली चार वर्षे या कंपनीत तो काम करीत होता. आणि शांता चिपळूणच्या एका लॅबमध्ये काम करायची. बहुतेकदा ती एस.टी.ने जाई आणि संध्याकाळी ८ च्या एस.टी.ने घरी येई. सारे काही सुरळीत चालले होते. इन-मीन-तीन माणसे... शांता, रघू आणि रघूची आई.. पासष्ट वर्षे होऊन गेलेली... म्हातारपणे झुकलेली. त्यांचे लग्न झाले डिसेंबर मध्ये आणि ४-५ महिन्यात कोरोनाची लाट गावात आली.

तत्पूर्वी अख्या भारतात ही लाट पसरली. माणसे भयभीत झाली ती अमेरिका, युरोप, चीन इ. देशातील बातम्याने. हजारो माणसे मरत होती. सुरुवातीला यावर काहीच लपाय नव्हते. पण मोदी सरकारच्या हिंदुस्थानात यावर लपाय सापडले. प्रत्येक माणसाला लसीकरणाचे डोस दिले जात होते. आरोग्य यंत्रणा युद्ध पातळीवर काम करीत होत्या. चिपळूणमध्येही गावागावात सतर्कता पाळली जात होती. अगदी नियमाप्रमाणे.

शांताची लॅबही मोठी अद्ययावत असल्यामुळे तिच्याही कामाचा लोड वाढला होता. तसेच रघुच्या कंपनीतही काम वाढले होते. रात्री पेपर नेण्यासाठी अनेक ट्रक येत. त्यांचे ड्रायव्हर, क्लिनर महाराष्ट्राच्या भारताच्या बाहेरुन येत असत. ना मास लावणे... अगदी घाणेरडे लोक. त्या वातावरणात रघूला काम करावे लागे. आणि कोरोनाचे इंजिक्शन घेऊनही त्याला ताप येऊ लागला. त्याने पंधरा दिवसाची रजा घेतली. काही दिवसातच त्याला कोरोनाची लक्षणे दिसू लागली आणि त्याला चिपळूण मधल्या एका

हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आले. सगळे उपाय करुनही काही आराम पडेना. करोनाच्या रुग्णांसाठी हॉस्पिटलमध्ये ॲडमीट करण्यात आले. सगळे लपाय करुनही काही आराम पडेना. कोरोनाच्या रुग्णांसाठी हॉस्पिटलने वेगळी व्यवस्था केली. शांता किंवा कोणालाही हॉस्पिटलमध्ये प्रवेश नव्हता.

शांता हळव्या मनाची, रघुच्या आजाराने पार हबकली होती. रघुला त्या हॉस्पिटलला ॲडमिट केल्याला एक महिना होऊन गेला होता; त्या हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केलेले बरेच पेशंट बरे होऊन जात होते, पण रघुला उपायांचा काहीच फायदा होत नव्हता. आणि त्यात त्याचा अंत झाला.

शांतावर तर पहाड कोसळला होता. अशाही परिस्थितीत तिने सासूला सावरले. त्याचे दिवस कार्याचे सोपस्कर पार पडले आणि शांता आपल्या कामावर रुजू झाली. वर्ष होऊन गेले रघुला जाऊन. आणि वर्ष श्राद्धाला तिचे सगळे नातेवाईक आले. त्यात तिचे मामा आनंदराव तिवरेकर आले होते. शांताची अवस्था पाहून त्याला खूप दु:ख झाले. त्यांनी शांताजवळ एक प्रस्ताव ठेवला, की तिने पुन्हा लग्न करावे. वर्ष श्राद्धाच्या त्या कार्यक्रमाला समाजातले खूप नातेवाईक हजर होते. त्यांच्या समोरही आनंद रावांनी असा प्रस्ताव ठेवला की योग्य स्थळ पाहून तिने पुन्हा विवाह करावा. त्यांचे हे म्हणणे ऐकूण समाज बांधवांनी चूपी घेतली. कोणी काहीच बोलले नाही या प्रस्तावावर....

''अहो आनंदराव हे कसे शक्य आहे?'' शंकरराव.

''शंकरराव म्हणतात ते बरोबर आहे. पण आमच्या मराठा समाजात तशी प्रथा नाही.'' रघु तात्या.

''का नाही! अहो ते दिवस आता इतिहास जमा झाले. जुना काळ गेला. आता जुन्या सगळ्या समाज विघातक प्रगतीला आड येणाऱ्या प्रथा आपल्याला बदलायला हव्यात. ती तरुण आहे. का तिने अख्खे आयुष्य वैधव्यात काढावे, बोला !'' आनंदराव.

''अहो पण आमच्या उच्चभ्रु समाजात तशी प्रथा नाही!'' शंकराराव.

त्यात आपला समाज मोठा, १८/२० गावात पसरलेला आहे ते काय म्हणतील ? हा तुमच्या प्रस्ताव खरे तर जरी चांगला असला तरी सगळ्या समाज बांधवांनी तो स्वीकारायला हवा ! मी तुम्हाला सांगतो पूर्वी कै.सखाराम लर्फ मामासाहेबांनी या विचाराला चालना दिली होती. अनेक विवाह झाले. पण मग याला पुढे चाल मिळाली नाही. तेव्हा आपण पुन्हा हा

विषय प्रकर्षाने समाजापुढे मांडावा, असे मी आनंदरावांना सुचवतो !'' माधवराव.

''पण यात वेळ काढूपणा होता नाहीतर हे गुऱ्हाळ असेच चालत राहील. आणि हा विषय तसाच राहील !'' आनंदराव.

मग निदान तुमची तशी अनुमती आहे काय ?

''नाही ! आम्ही एक गाव व आताची उपस्थित मंडळी या विषयाला अनुमती देऊ शकत नाही !'' माधवराव.

''ठिक आहे ! मी पहातो मी माझ्या भाचीला अशा अवस्थेत ठेऊ शकत नाही!'' आनंदराव.

''पहा तुम्ही... '' माधवराव.

खरे तर या समाजात ते जरी ९६ कुळी म्हणत असले तरी पुरोगामीत्वची पाळे अजून खोलवर रुजलीच नाहीत. समाजात अशा अनेक प्रथा परंपरेने चालू आहेत, त्या समाजातल्या तरुण मुलांना प्रगतीशीलतेकडे घेऊन जाणाऱ्या नाहीत. आंतरजातीय विवाह होत आहेत. मुले-मुली समाजापासून दूर होत आहे. त्याची कोणालाच पडली नाही. शिवाय प्रत्येक पुरोगामी विचारात कोलदांडा घालण्यातच बुजूर्गांना धन्यता वाटत आहे. या नकार घंटा कोठेतरी थांबायला हव्यात.

आनंद रावांनी समाज बांधवांची एक सभा लावली. ते समाजातील एक मोठे मान्यवर, विद्वान अभ्यासू, साहित्यिक म्हणून समाजाला परिचित होते. शिवाय येणाऱ्या सर्व उपस्थितांची लत्तम व्यवस्था त्यांनी केली होती. समाजाच्या अडचणी, सामाजिक चाली, परंपरा, धार्मिक कर्मकांड, मुलांचे शिक्षण इ. विषय चर्चेला होते. त्यांच्या मनात एक ट्रस्ट करण्याचे होते. त्यासाठी स्वत: त्यांनी पाच लाखाची देणगी, त्या सभेत जाहीर केली. शिवाय एक कोटीचा फंड उभारुन मुला-मुलींना शिक्षणासाठी स्कॉलरशिपही देऊ केली. त्यांनी या ट्रस्टसाठी सर्व गावातील एक सुशिक्षित सदस्य निवडला व उत्तम संघटना बांधण्याचा संकल्प सोडला.

या सभेत समाजतील कालबाह्य प्रथांबाबत चर्चा झाली. बदलत्या सामाजिक, शैक्षणिक आधुनिकतेचा आढावा घेऊन समाजातील गावोगावातील मुलांना शाळेत जाऊन समाज लपदेशन करणे, शेतीतील आधुनिकीकरण याशिवाय अनेक विषय या सभेत हाताळले गेले.

शेवटी त्यांनी जो विषय समाजापुढे ठेवला तो पुर्नविवाहाचा. अकाली

किंवा पुरुषाच्या मृत्यूनंतर अत्यंत हिन अवस्थेतून लरलेल्यांना जावे लागते. एकाकी जीवन आर्थिक अडचणी, समाजाची स्त्रियांकडे बघण्याची उपभोगात्मक वृत्ती यातून स्त्रीला उत्तम उर्वरीत आयुष्य जगता यावे यासाठी समाजाने पुढाकार घेऊन या जीवांचे पुनर्विवाह घडवून त्यातून त्यांना उर्वरीत आयुष्य सन्मानाने जगता यावे म्हणून जुन्या प्रथांना मोडीत काढून नवे पर्याय समाजाने स्वीकारावे असा विषय त्यांनी समाज बांधवांसमोर मांडला.

प्रथम नकारात्मक सूरच उमटले की, इतके वर्षे त्यात बदल झाला नाही तेव्हा त्या प्रथा तशाच चालू ठेवाव्या असा सूर काही लोकांनी लावला. त्यात शांताचा गाव पुढे होता. आनंदरावांनी यावर लत्तम पुरोगामी विचार मांडले. पण तरीही कोणी काही बोलायला तयार नव्हता. या सभेला ॲड.यशवंतराव कदम हे एक निष्णात वकील. आता लतार वयात त्यांच्या शिरगावात स्थायिक झाले होते. त्यांनी अर्धा तास या विषयावर भाषणात सगळ्यांचे समुपदेशन केले. समाजाची आजची परिस्थिती, शिक्षणाच्या प्रसारामुळे बदलता समाज मानवी जीवन इ. आणि आनंदरावांनी मांडलेला पुर्नविवाहाचा विषय, यामुळे होणारे फायदे, न केल्यामुळे होणारे नुकसान, समाजातील नैतिक-अनैतिकता याविषयी जेव्हा त्यांनी आपले विचार मांडले. तेव्हा कोठे लोकांच्या मनात सकात्मकतेला चालना मिळाली व समाजातील लोकांमध्ये चर्चा सुरु झाली.

शिवाय अशी कोणती स्थळे जी पुर्नविवाहास उत्सुक आहेत का याची माहिती जेव्हा गोळा झाली तेव्हा १३० स्थळांची नोंद झाली. त्यातील अनेक तरुण-तरुणी जे उत्सुक होते विवाहासाठी पण योग्य स्थळे मिळत नव्हती वा समाजातील प्रथेचा कोलदंडा होता त्यांनी सकारात्मक भूमिका घेतली. अनेक मुला-मुलींनी आपले विचार मांडले व त्यातून बुरसटलेल्या जुन्या प्रथांचे विघटन सुरु झाले व एक विवाह संस्थेचाच जन्म त्यातून झाला.

शांतानेही आपले विचार या सभेत मांडले आणि आश्चर्य म्हणजे तिचे बोलणे संपताच सचिन चव्हाण ह्या इंजिनिअर मुलाने आपले विचार मांडतांना शांताशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली. तो कोयना प्रकल्पात इंजिनियर होता. आनंदरावांनी त्याची पूर्ण माहिती घेतली. व त्यांना शांताची दिली आणि लग्न ठरल्यात जमा झाले.

त्यानंतर चर्चा पुढे सरकली... त्यात सायुदायिक विवाहाला चालना मिळाली. कारण अनाठायी होणारा लग्नासाठी खर्च इ. ना फाटा देऊन कमीत

कमी खर्चात विधीयुक्त विवाह व्हावेत. हा विषय समाजाला नवा. लगाच पैशाची उधळपट्टी हौसेपाई, पण गरीबाला न परवडणारी व त्यात गरीबही भरडला जातो. कर्ज काढून सण करावे तसे विवाह होतात आणि २/३ मुली असतील तर बाप कर्जाखाली मेलाच म्हणून समजा नाहीतर तो रस्त्यावर यायचा. म्हणून ही टूम उत्तम म्हणून सर्वांनी लत्फूर्तपणे पाठींबा दिला. शेवटी या विवाहाचा खर्च आनंदराव यांनी लचलण्याचे ठरवले. त्यात वकील यशवंतराव, अप्पासाहेब शिंदे यांनीही हातभार लावणार असे सर्वांसमक्ष जाहीर केले. महिनाभरातच हा कार्यक्रम करण्याचे ठरले.

त्याचदिवशी संध्याकाळी सचिन चव्हाण, आनंदरावांबरोबर शांताच्या घरी आले. आनंदरावांनी कन्यादान करावे असे शांता म्हणाली. सचिन एकटाच होता, आई-वडील कोणीही नव्हते तेव्हा शांताच्या सासुला सांभाळण्याची जबाबदारी सचिनने उचलावी असे ठरले.

मार्च २०२२ ला सामुदायिक विवाहाच्या मंडपात हा विवाह संपन्न झाला. आता शांताही आनंदी होती. तिच्या पुढच्या आयुष्याचा प्रश्न सुटला होता.

काही म्हणा आनंदरावांच्या पुरोगामी सकारात्मकतेची फळे आता समाजात दिसू लागली होती. शिक्षण, शेती यात आमुलाग्र बदल झालेले दिसत होते. समाजात एकसुरीपणा आला होता, जुन्या चालीरिती बदलल्या आणि समाज प्रगतीपथाकडे निघत आहे असे बदल झालेले जाणवले. अनेक मुले परदेशात शिक्षणासाठी गेली. शिक्षण संस्थांनी पुढील शिक्षणासाठी कंबर कसली. केंद्र सरकारच्या अनेक योजनांचे आयोजन समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचले. त्याचे परिणाम आजूबाजूच्या तालुक्यात पसरले. सुस्तावलेले शेती खातेही कार्यरत झाले. छोटे छोटे धंदे सुरु झाले. महिला, पुरुष, तरुण यांच्या हाताला कामे मिळाली. हे सगळे आनंदरावांच्या पुरोगामी विचारांचे फलित होते.

महाराष्ट्र सरकारने आनंदरावांना पुरस्कार देऊन सन्मानित केले. प्रगतीचे वारे सर्वत्र वाहू लागले. येवढे मात्र खरे त्यातून समाजाचे उत्थान झाले. त्यासाठी आनंदरावांना हा खेळ करुन समाजाने शांताच्या लग्नात घातलेला कोलदांडा समूळ उखडून टाकला, कारण त्यांना दिसत होती शांताच्या जीवनाची भविष्यातील संकटांची परवड.

०-०-०

# ओलावा वात्सल्याचा

आयकर मधल्या सगळ्याच अधिकाऱ्यांना आपण कोणाकडे रेडला जात आहोत याची कल्पना नसते. संजयला आदल्या दिवशी उदया ६ वाजता ऑफिसमध्ये हजर रहायला सांगितले होते आणि तो सकाळी ६ वाजताच घरुन निघून त्याच्या डि.जी.च्या कार्यालयात हजर झाला. पहातो तर काय... मोठी फौजच त्या ठिकाणी हजर होती. याचा अर्थ मोठी रेड असणार... कोण्या मोठ्या अधिकाऱ्यावर .... एवढे मात्र खरे.

वरिष्ठांनी ५-६ अधिकाऱ्यांचा ग्रुप करुन त्यांच्या हातात लखोटे दिले. त्यांच्यासाठी गाड्या हजर होत्या. संजय त्यावेळी निरीक्षक पदावर होता. गाड्या म्हणजे ... लांब कोठेतरी रेड असणार यात शंका नव्हती.

संजय सिनियर व अनुभवी निरीक्षक होता. त्याच्या युनिटमध्ये तोच सिनियर होता व एक अधिकारी. तो ज्युनियर होता. म्हणजे वरिष्ठांनी सगळी जबाबदारी संजयवर टाकली होती म्हणा. त्यांना खात्री होती की संजय हाच योग्य अधिकारी या रेडसाठी होता.

आपल्या रेडच्या इप्सित ठिकाणी पोहचताच, आपल्याला दिलेले लखोटे लघडायचे अशा सुचना वरिष्ठांच्या होत्या. ती रेड गोरेगावला होती आणि रहेजासारख्या एका मातब्बर विकासकावर. संजय तेथे पोहोचताच त्याने त्या जागेचे निरीक्षण केले ती जागाच एक अख्खा मजला होता. आणि ते त्या विकासकाचे रहाते घर होते.

घर म्हटले की मोठी जबाबदारी असते. घरात स्त्रिया, मुले लहान मोठी. तेव्हा कुटुंबातील सर्वांवर मोठे संकट आले असे वाटते. त्यांच्या युनिटमध्ये एक स्त्री अधिकारीही होती. तिने प्रथम घरातल्या सर्व स्त्रियांना योग्य त्या सूचना दिल्या व एका रुममध्ये यायला सांगितले. स्त्रिया-मुले यांनी मोठा गोंधळ केला. आरडा-ओरड झाली. संजयने सर्वांना समज दिली.

''आम्ही तुम्हाला त्रास देण्यासाठी आलो नाही. आम्ही तुमच्याकडे आमच्या ऑफिसचे तपासणीचे काम करायला आलो आहोत ते संपले की आम्ही निघून जाऊ. तुम्ही शांत रहा. मुलांना शाळेत पाठवा. घाबरु नका.'' संजय.

आणि शांतता निर्माण झाली. लहान मुले खेळायला लागली. घरातले

सर्व व्यवहार सुरु झाले. स्त्रियांच्या मनातली भीती पळाली. अधिकारी आपणास काहीही त्रास देणार नाही याची त्यांना खात्री पटली. आमच्या युनिटमधले त्या घरात घरातल्या सारखे वावरत होते. पण तिची नजर घरातल्या हालचालीवर होती. एवढे खरे कारण सगळ्या स्त्रिया काहीतरी कुजबूजत होत्या.

तिच्या बोलण्यावरुन संजयला वेगळाच भास झाला. घरात भरपूर दागिने कालच आणले आहे. आणि परवा घरात एक लग्न होते, त्या बिल्डरच्या लहान भावाचे हे मला जाणवले. म्हणजे अधिक सावधता हवी. कोणीही निमित्त करुन ते बाहेर नेऊ शकतील.... दुध आणायच्या किंवा काहीही... आम्ही सगळे सावध होतो.

संध्याकाळ होत आली परंतु त्या रात्री सेंट्रल ऑफिसमधले काम संपत आले नव्हते. पण घरातले वातावरण मात्र कमालीचे तंग जाणवत होते. त्या दिवशी त्या घरात कोणीही जेवले नाही.

संजयने त्या महिला अधिकाऱ्यासह जाऊन जेवण करा अशा सूचना दिल्या. घरातली बच्चे कंपनी जेवली. पण मोठे कोणीही नाही. मग पुन्हा संजयने सर्व स्त्रियांना आज ऑफीसचे काम काही आटोपणार नाही. हे सांगून त्यांना जेवून घेण्यास सांगितले. पण कोणीही अन्नाचा कणही घेतला नाही.

संजयने सांगितले तरी कोणीही जेवायला होकार दिला नव्हता. त्यात ७/८ वर्षाची सोनू नावाची मुलगी होती, तिने सकाळपासून रुसवाच धरला होता. का कोण जाणे ? पण ती आमच्यावर रागावली होती. ती थोडी समंजस होती. इतर मुले ३/४ वर्षाची होती. माझे अधिक लक्ष तिच्याकडेच होते, आम्ही त्या घरात आल्यापासून तिच्या वागण्यातील चलबिचल पाहून. पण तिने संजयचे लक्ष वेधून घेतले होते. तिच्याबद्दल प्रेम, आस्था वाटत होती. अगदी माझ्या नातीसारखी आणि तिचे पाणीदार डोळे अधिक भेदक वाटत होते.

रात्र ते सकाळ ते काही झोपू शकले नाहीत. मात्र अधिकारी आळीपाळीने डुलक्या काढीत होते. सकाळी चहासाठी आमचा एक इन्स्पेक्टर गेला पण चहा काही मिळाला नाही, तो परिसर खूप लांब होता रहदारीपासून. आम्ही आमच्या ड्रायव्हरला पाठविले चहा आणायला. हे त्या घरातल्या एका गृहिणीला ध्यानात आले आणि आम्हाला चहा मिळाला नाही हे तीने जाणले.

तीने आम्हाला चहा दिला. आम्हालाही आनंद झाला. त्या घरातल्या लोकांना आमच्याबद्दल सहानुभूती आहे हे ही जाणवले.

संजयचे त्या महिलेचे आभार तीही सुखावली.

''आपणासाठी नाष्टा करायला सांगू का खानसामाला ?'' ती स्त्री.

''हो चालेल.''

कारण जवळपास काही मिळण्यासारखे नव्हते. हे त्या स्त्रीला माहीत होते.

दुपार होत नाही, अजून त्या ऑफिसमधले तपासाचे काम संपले नव्हते. संध्याकाळी संजयच्या बॉसचा निरोप आला.

''तुम्ही सापडलेले दागिने व इतर मौल्यवान वस्तू घेऊन त्या कंपनीच्या हेड ऑफिसला या.'' वरिष्ठ.

संजयने दागिने नेणार म्हणून त्याचा पंचनामाही सुरु केला आणि घरात सर्व स्त्रियांनी एकच गोंधळ घातला. त्याने त्यांच्या वरिष्ठांना काहीही घडू शकेल असे सांगितले. कोणीही बेशुद्ध पडू शकेल. हे सांगताच वरिष्ठांनी इरादा बदलला व घरीच थांबण्यास संजय आणि अधिकाऱ्यांना आज्ञा दिली.

वरिष्ठांनीही या गोष्टीबद्दल संजयचे अभिनंदन केले. जेव्हा महिला तेथे असतात, मुले असतात काही विशिष्ठ समारंभ त्या घरी असतात. तेव्हा सौजन्याने वागणे असावे याबद्दल.

दुसऱ्या दिवशी सकाळी पार्टी ८ वाजता घरी आली व इतर कामाला लागली. मोठी मुले शाळेत निघाली. आम्ही त्यांची दप्तरे तपासून त्यांना आमच्या गाडीनेच शाळेत सोडले. पण ती मुलगी सोनू मात्र घरीच राहिली. एकजात ती शाळेत जायला तयार होईना. एकसारखी 'माझा हार!' असेच ती म्हणत होती.

संजयचे वरिष्ठ ही आले. त्यांनी कालच्या कारवाईचा आढावा घेतला व दागिने व इतर किमती दस्तऐवज (FD) सिझ करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा संजयने उद्या त्यांच्या मुलीचे लग्न आहे हे वरिष्ठांना सांगितले.

ही बातमी घरात स्त्रियांमध्ये पसरली. घरात हलकल्लोळ झाला. कोणालाच ही गोष्ट आवडली नाही. त्यात सोनूचा हारही होता. तिने तर हंगामाच केला. ती येऊन संजयला बिलगली.

''अंकल माझा नेकलेस तेवढा सोडा! मला उद्या लग्नात घालायचा आहे. प्लीज अंकल... तेवढा सोडा!

आपण काय करावे संजयला कळेना. त्याने धीर करुन घरमालकाला एक

सूचना केली. ''आम्ही एक दागिनापण सोडू शकत नाही. आपण जर बँक गॅरंटी दिली तर सगळे दागिने सोडता येतील. तुम्ही तशी वरिष्ठांना विनंती करा.'' संजय.

ही कल्पना त्या व्यापाऱ्याला खूप भावली आणि त्याने त्या दागिन्यांच्या किमती एवढी बँक गॅरंटी देतो असे सांगितले.

''अंकल थँक्यू!'' म्हणत सोनूने मिठी मारली. तिचे ते रडे काही पुढचे १५ मिनिटे संपत नव्हते. संजयच्याही डोळ्यात पाणी उभे राहिले.

तिने अख्खे घर आनंदाने डोक्यावर घेतले. बराच वेळ ती संजयला कवटाळून होती.

''अंकल थॅंक्यू ! थॅंक्यू अंकल''

आणि त्या मायेच्या ओलाव्याने संजयचे मनही पाझरले सोनूच्या प्रेमाने!!!

०–०–०

# शाप–उप:शाप

सुनिता आणि सुहास यांचे लग्न मोठ्या थाटामाटात झाले मुंबईला. हे लग्न एक अरेंज मॅरेज होते. बघण्याचा कार्यक्रम, पत्रिका जुळवणे इ. चे सोपस्कर पूर्ण करुन आणि दोघांच्या पसंतीने जमवले होते.

पण या लग्नाला प्रखर विरोध होता तो सुहासच्या आईचा. सुनिताही सुहासच्या आईची मैत्रिण; पण दोन वर्षापूर्वी काहीतरी धुसपूस सुरु झाली. कारण सुहासच्या आईला सुनिताही तिच्या भावासाठी पत्नी म्हणून हवी होती. पण सुनिताने त्याला प्रखर विरोध केला आणि ठरावापूर्वी सारे बिनसले. पण सुनिताला लग्न करायचे होते ते सुहासशी. तो तिच्या कॉलेजमध्ये होता ती बी.ई. करत असताना. हेच कारण सुहासच्या आईला खूप झोंबले, तरी पण सुहासचे लग्न रीतसर मागणी घालून ठरले.

खरेतर सुहासच्या आईला सून म्हणून येणे पसंत नव्हते. सुरुवातीला दोन तीन महिने हे सुनिताला जाणवले. तिने घराशी जुळवून घेण्याचा प्रयत्न केला पण उपयोग झाला नाही. सुहासने ते रहात असलेल्या इमारतीत दुसरा फ्लॅट भाड्याने घेतला व मग तो विकतही घेतला. सुनिता सुहास यांचा वावर आई–बाबांच्या फ्लॅटमध्ये होताच. पण जेवणासह सगळे व्यवहार स्वतंत्र होत होते.

ती दोघे नोकरी करीत असल्यामुळे आणि दोघांच्या ऑफिसच्या वेळा, शिफ्ट घ्यावी लागत असल्यामुळे प्रपंच करणे सुनिताला तारेवरची कसरत करण्यासारखे होते. लग्नानंतर आता ५ वर्षे होत आली होती. पण सुनिताचे बाळाचे स्वप्न अधुरेच राहिले होते. घरात पाळणा हलत नाही यावरुन गेले वर्षभर सुहासच्या आई–वडिलांचीही कुरकूर चालू होती. आणि एक दिवस ह्याचा स्फोट झाला. सासू–सासऱ्यांनी गावला जायचा निर्णय घेतला.

या त्यांच्या म्हणण्याने सुहास–सुनिता यांना खूप दु:ख झाले आणि टेंशनही आले. आजवर जे आज होईल, लद्या होईल याची वाट पहात होते, पण सकारात्मक असे काही झाले नाही. शेवटी आई–वडील गावाला त्यांच्या वडिलोपार्जित घरी रहायला गेले. त्या दोघांनी मग खूप विचार केला. आता आपण औषधोपचार करावे. मेडीकल ट्रिटमेंट घ्यावी असे दोघांनी ठरवले. याबाबत मार्गदर्शन करणाऱ्या अनेक संस्था मुंबईत कार्यरत होत्या. ती दोघेही नोकरी करणारी असल्याने त्यांनी प्रथम रजा घेतल्या १५ दिवसाच्या आणि या

साठीच्या सोपस्करासाठी डॉ.नरीयानी यांच्या गायनॅक हॉस्पिटलमध्ये नांव नोंदविले. मेडीकल टेस्ट झाल्या. त्यात काहीही न्यूनता सापडली नाही.

पुढे तीन महिने औषधोपचाराने सुनिताच्या प्रकृतीत सुधारणा झाली आणि तिला दिवस गेले. सुनिताने डिलीव्हरी पर्यन्त घरीच आराम करावा असा सल्ला डॉक्टरांनी दिला. तिने रजा घेतली आणि कामाला व जेवणाला एक मुलगी ठेवली. आता तिची प्रकृती व पोटातील बाळ अगदी सुरक्षित आहे असा निर्वाळा सातव्या महिन्यात डॉक्टरांनी दिला. सुनिता आनंदात होती.

पण सातव्याच महिन्यात तिला प्रसुतीच्या वेदना होऊ लागल्या आणि तिला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करावे लागले. तिची डिलीव्हरी थोडी अडचणीची आहे असे डॉक्टरांनी सांगितले. नॉर्मल डिलीव्हरी शक्य नाही म्हणून सिझरीयन करावे लागेल असे डॉक्टर म्हणाले आणि सिझरियन झाले. मुल काही रडायला तयार नव्हते. महत प्रयत्नाने ते मूल रडले पण ही प्रिमॅच्युर डिलीव्हरी होती आणि डॉक्टर म्हणाले पुढचे दोन महिने मुलाला हॉस्पिटलमध्ये रिकव्हरीसाठी ठेवावे लागेल. शिवाय ही नार्मल डिलव्हरी नसल्यामुळे मुलाची वाढ कशी होईल यावर सगळे अवलंबून आहे. असेही डॉक्टरांनी सांगितले.

आणि दोन महिन्यानंतर हे बाळ पूर्णपणे नॉर्मल नाही असे डॉक्टरांनी सांगितले. सुहास व सुनितला हे समजताच त्यांच्या पायाखालची वाळूच सरकली. कारण आता या गोळ्याला वाढवणे, त्याची काळजी घेणे. अशक्य प्राय होते. दोघे नोकरीत, सुनिताची रजाही संपत आलेली, तिने पुन्हा मुलाच्या संगोपनासाठी रजा घेतली. हा सीलसिला वर्षभर चालूच होता. ते मूल फक्त श्वास घेत होते. ना बोलणे, ना काही हालचाल. त्या मुलाच्या वाढत्या वयाबरोबर व्हायला हव्या होत्या त्या हालचाली होत नव्हत्या. ते निर्जीव बाळ फक्त दुध प्यायचे. बाकी शरीराच्या हालचाली शुन्य. दिवस पुढे पुढे जात होते. दोन वर्षे झाली आणि क्षुल्लकशा आजाराने त्या मुलाने डोळे मिटले.

शेवटी सुनिताची मातृत्वाची झोळी रिकामीच राहिली. खूप दुःख झाले त्या दोघांना पण परमेश्वराची इच्छा... त्यातूनही ते सावरले. पण तेवढ्यावर सगळे थांबले नाही. आता आपण मूल होण्याचा प्रयत्नांना फुलस्टॉप द्यायचा असे बरेच तिच्या मनात होते. ती विषाची परिक्षा पुन्हा नकोच. या निर्णयाप्रत

सुनिता आली. आता आपल्याला मुलच नको, असे तिने ठरवले. आणि आपला विचार तिने सुहासला सांगितला. तो काय बोलणार ! कारण गेली दोन वर्षे सुनिता ज्या अग्नी दिव्यांतून गेली ते सुहासने प्रत्यक्ष पाहिले होते.

''मी काय म्हणते, आता मूल नको या निर्णयाप्रत मी आले आहे. मला या अग्नीदिव्यांतून जायचे नाही. तेव्हा... मी माझे न मूल होण्यासाठी ऑपरेशन करुन घ्यायचे असे ठरवले आहे.'' सुनिता.

''ठिक आहे ! मी काय बोलणार. तो सर्वस्वी तुझा निर्णय आहे. मी तुझ्या निर्णयास सहमत आहे.'' सुहास.

आणि एका आठवड्याची रजा घेऊन सुनिताची सर्जरी झाली. मग महिनाभर तीन बिनपगारी रजेवर होती. आणि नंतर ऑफिसला जाऊ लागली.

तरीही आपली मातृत्वाची भूक काही पूर्ण झाली नाही. यामुळे सुनिताच्या मनात वेगळ्याच विचारांनी घर केले होते. आपण एखादे मुल दत्तक घ्यावे असे तिला राहून राहून वाटत होते. सुनिताने सुहासजवळ एक प्रस्ताव ठेवला – ''आपण मुल दत्तक घेऊ या का ?''

''हरकत नाही ! पण चांगले, आपल्या जातीचे मिळायला हवे ! कोणते तरी घेणे आपल्याला अडचणीचे होऊ शकते !'' सुहास.

''आपण ते शोधताना खूप काळजी घेऊ.'' सुनिता.

तसा विचार सुनिता–सुनिल यांनी डॉ.नरीयानी यांच्याजवळ बोलून दाखवला.

आणि तशी संधी चालून आली. त्यांच्या एका मराठी पेशंटची डिलीव्हरी त्यांच्या हॉस्पिटलमध्ये झाली. पण ती स्त्री आठ दिवसात गेली. तिने दोन मुलांना जन्म दिला होता. पण त्या मुलांना नेण्यास त्यांच्या घरचे कोणीही आले नाही आणि एक दिवस त्या स्त्रीचा पती आला.

''मॅम ! मी एकटा आहे. घरी दुसरे कोणीही नाही या मुलांची काळजी घेण्यासाठी. ना आई, ना वडील, तिच्या माहेरचे कोणी नाही. मी खूप अडचणीत आहे. आपणच काही मार्ग सांगा !'' त्या स्त्रीचा नवरा.

आणि दुसऱ्या दिवशी संध्याकाळी सुनिल–सुनिता हॉस्पिटलमध्ये आले. त्या मुलांचे वडील, सुनिल व डॉक्टर यांच्या चर्चेतून त्यातून एक मुलगी होती ती दत्तक घेण्याचे कबूल झाले. पण दुसऱ्या मुलाचे काय ? हा निर्णय अनुत्तरीत होता. त्या दोन मुलांना वेगळे करणे हेही सुनिलला आवडले नाही.

त्याने सुनिताला विचारले काय कराव ?

‘‘आपण दोन्ही मुले दत्तक घेऊ !’’ सुनिता

‘‘वा ! छान!’’ डॉ.नरीयानी.

आणि सगळे कायदेशीर सोपस्कार पूर्ण करुन दोन्ही बाळे त्यांनी घरी आणली. त्यात एक मुलगी व दुसरा मुलगा होता. आता या दोन मुलांच्या संगोपनाची जबाबदारी सुनिता व सुनिल यांनी स्वीकारली. सुनिताने प्रथम तीन महिन्याची रजा घेतली. शिवाय घरात एक कायम स्वरुपी नोकर महिला ठेवली. ती दोन्ही बाळे कलेकलेने वाढत होती. छान बाळसे घेतले होते दोघांनी. सुनिल ज्या टी.सी.एस. कंपनीमध्ये नोकरी करीत होता, त्या कंपनीने सुनिलला प्रमोशन देऊन यु.एस. ला पाठविण्याचा निर्णय घेतला. हि नेमणूक १० वर्षांसाठी होती.

सुनिल प्रथम यु.एस. ला एकटा गेला व नंतर परत येऊन सुनिता व दोन्ही मुलांना घेऊन यु.एस.ला गेला. तो सध्या बोस्टनला रहात होता. पण सतत संपुर्ण यु.एस. चा चार्ज त्याच्याकडे असल्यामुळे सतत फिरतीवरच असायचा. पण सुनिता दोन्ही बाळांचे सारे काही स्वत: करी कारण नोकर मिळत नव्हता. सुनिता खूष होती. तिची मातृत्वाची भूक ओसंडून वाहत होती... एवढे खरे.

कालांतराने ही हकीकत सुनिताच्या सासुला समजली, तिलाही आनंद झाला आणि सुनिताच्या मनातील सासुबद्दलचा रागही हळूहळू कमी झाला. या आपल्या नातवंडांना पाहण्यासाठी ती दोघे यु.एस.ला येऊन गेली. चांगले सहा महिने राहिले तेथे आणि पुन्हा भारतात परतले. सुनिताच्या मनातल्या मनातली सासु-सासऱ्यांबद्दलचा राग आता ओसरला होता. घरातले वातावरण अगदी आनंदी होते.

सुनिताला वाटले ही देवाची कृपाच होती. तिला वाटले तो सासु-सासऱ्यांचा शाप-उशापात परिवर्तित झाला आहे आणि ती सारे काही विसरुन गेली. पण दत्तक प्रकरणाचे काहीही सासू-सासऱ्यांना सांगितले नाही. सारे काही गुलदस्त्यात राहिली. कायमची !!

०-०-०

# पिंपळपार !

संध्याकाळ झाली की वाडीतल्या पिंपळाच्या पारावर खूप गर्दी व्हायची पोरांची, अगदी मावळतीला सुर्य दिसेनासा होईपर्यंत आणि मग आवरा आवरीला सुरुवात व्हायची पोरांची, खेळाची सगळी आयुधे गोळा करायला आणि मग रात अंथरायला लागायची काळोखाची चादर....

बऱ्याच अख्यायिका लोक सांगत त्या पिंपळाबद्दल. कोणी म्हणत तो स्वयंभू आहे. कोणी म्हणत, तेथे एक संन्यासी साधू झोपडे बांधून रहायचा त्याने लावले ते. त्याचे वय किती ? आमचे आजोबा, पंजोबांच्या वेळचा तो म्हणजे १५० वर्षे झाली असतील त्याला. पण अजून तटस्थ मानेने तो लभा आहे आपला डोलारा सांभाळीत.

पावसाळा सोडला तर पोरांचा तो आधारवड असायचा. वर्षातून एकदा त्याची पानगळ व्हायची. हिरवीगार त्याची पालवी सुकायला लागायची. खच पडायचा सकाळी पिंपळाखाली. आणि दुपार उलटून गार हवा सुरु झाली की सगळी पानगळ पार दूर व्हायची पारावरची. मग पोरांचेच राज्य. त्यात आताशा वडाच्या झाडांनी वारवर केला होता. लांब लांब पारंब्या अगदी जमिनीवर टेकल्या होत्या, नी पोरांनी झोपाळे बनवले त्यावर. मग काय विचारता आळी पाळीने सगळे खेळत.

हे सारे आठवत आहे आज वयाच्या सत्तरीत आणि जेव्हा आम्ही लहान होतो तेव्हाचा सगळा चित्रपट डोळ्यासमोरुन सरकत जातो नी थांबतो आता त्या पारावर बसल्यावर.

मुळात आता मुलेच कमी, त्यात बरीच पुण्या-मुंबईला गेलेली. पण तेव्हा खंडीभर मुले असायची. आताच्या इंग्रजाळलेल्या मुलांना पिंपळपाराचे नाविन्य ते काय ? बारा महिने गावात राहून शाळेत शिकणारी मुले त्यांना पिंपळ प्यारा. पण मे महिन्यात गावात येणाऱ्या मुलांना त्याचे प्रेम काय ? आम्ही म्हणजे आमची पिढी या पिंपळपाराचे पारायण दररोज करायचे. ते आमच्या रक्तामासांत भिनले होते, तसे या अगंतुकाच्या मानात नाही.

आतातर त्याच्या फांद्या प्रचंड वाढल्या होत्या. लोकांची ओरड होत असे. कोणाच्या भात शेतीवर तर कोणाच्या कलमावर, नारळीवर त्याची सावली पडायची, पिकाला, फळांना त्याचा अडसर यायचा आणि म्हणून

त्याच्या काही फांद्या तोडायचे ठरले. गेली पूरी रयाच गेली त्याची... जणू जीवंतपणाच हरवला होता त्याचा. ओका बोला दिसायचा; त्याला पहाण्याची हिम्मत नव्हती होत आम्हाला ना त्याच्या पारावर बसण्याची. आणि पार दिसायचा ओसाड झालेला.

वर्ष असेच गेले आणि मग हिवाळा आला तो नवे वस्त्र नेसल्यासारखा, सोबत घेऊन.... लालबुंद टपोरी फळे पाखरांसाठी मग तो झाला लेकुरवाळा गजबजला त्याच्या नव्या साजातला बुंदा, फांद्या, पण नव्हती सावली पारावर, फक्त त्याच्या बुंध्यावर लाजल्या सारखी.

पुन्हा जेव्हा चार पाच वर्षांनी परतलो. पूर्ण वाढ झाल्यासारखा तो पानोपानी हिरवाळला होता. पारही नव्याने बांधला वाडीतल्या लोकांनी आणि तो वाट पहात होता गोजिरवाण्या बाळांची, खेळायला. पण अजून पारंब्या टेकल्या नव्हत्या पाराला. नुकतीच त्यांची शेपटे लोंबत होती. आशाळभूतपणे पोरांची वाट पाहत. पण पोरे.... ? शुकशुकाट होता सगळीकडे. संध्याकाळी तो पार ओका-बोका होई, गळून जाई त्या बाळांची वाट पहात सांजावे पर्यन्त.

मे महिना लजाडला. ही पोरांची गर्दी नव्या जुन्यांच्या गजबाजारात तो हरवला आपले अस्तित्व आणि आठवत राहिला आपला भूतकाळ आम्हा म्हाताऱ्या-कोताऱ्यांच्या सोबतीत.

पोरांनी गजब केले त्या पारावर. पिंपळ झाडाच्या बुंध्याशी एक टोकेरी, गोल अगदी गुबगुबीत दगड नव्हे हनुमंत बसवला. फासला त्याला शेंदूर, लागल्या उदबत्या, वर कसली बसली फुले वाहली आणि फेर धरुन नाचली ती पिंपळाला कवटाळीत. तो हसला, हरवला. डबडबले त्याचे नयन आनंदाश्रुनी भूतकाळ आठवून, मग एक मात्र झाले. आताशी उरल्या-सुरलेल्या बाया पिंपळावर येत. पूजा-पाठ करीत. कोणी पूजाही घातली एका वर्षी. आणि परंपरा झाली दरवर्षीची. पूर्वी नव्हता पण आताशा बेंजो, गाणी यांच्या आवाजाचाही कानेर ही सहन होत नाही त्याला. तो वाट पाहतोय केव्हाची एकदा सूर्य डुबतोय नी काळोख पडतोय, नी शांत वातावरणात तो डोळे मिटतो.

त्या पिंपळपाराला जीवंतपणा येतो तो उन्हाळ्यात आणि हिवाळ्यात जेव्हा त्याच्या फांदी फांदीवर येतात लाल टपोरी फळे नी पारावरच्या सभा सुरु

होतात. आणि पुरा आसमंत रंगी-बेरंगी व्हायचा सप्तरंगातील सुरावटी सारखा.

पुन्हा पावसाळा येण्याची चिन्हे दिसू लागली.. आषाढ आला. सोसाट्याचा वारा येई कधी संथ कधी रुद्र रुप पांघरुन, आक्राळ विक्राळ आणि अजब झाले…

उखडला गेला तो मुळापासून नी परिसर ओकाबोका झाला. सारे संपले होते. उरल्या होत्या फक्त आठवणी, आमच्या बालपणातल्या ….. पडद्यावर आठवायला.

आता पाराजवळ जाताना, त्याकडे पाहण्याची हिम्मत होत नाही. डोळे ओलावतात. … ! आणि साऱ्या बालपणातल्या आठवणीत डबडबल्या डोळ्यात उभ्या राहतात…..

०-०-०

# जीवन साफल्य

माझ्या ऑफिसमध्ये म्हणजे इनकम टॅक्समध्ये त्याच्या कामाच्या निमित्ताने आलेले एक गृहस्थ राम वाच्छानी. नाशिकहून आले होते. त्यांचे काम झाल्यावर मी आणि ते चहा पिण्यासाठी आमच्या ऑफीसच्या कॅंटीनमध्ये आलो.

''साहेब ! तुम्ही माझे काम झटपट केलेत जराही वेळ लावलात नाही. न आढे-वेढे घेता मला तुम्ही मोकळे केलेत. मला नाशिकला तातडीने जाणे आहे. आज शिर्डीच्या साई मंदिराच्या भक्त निवासाचे टेंडर भरायचे आहे. पाचच्या आत, आजच..., पण तुम्ही तुमचे काहीच बोलला नाही !'' वाच्छानी.

''माझे काय ?'' मी.

''पैसे किती देऊ सांगा !'' वाच्छानी.

''नाही! माझे काही नाही ! सर मी पैसे घेत नाही. आपले काम झाले. आपण आनंदात जा!'' मी.

''असे कसे ? तुम्ही नाशिकला या ! आपण शिर्डीला जाऊ दर्शनाला. मी एक दिवस आड जातच असतो. तेथे आमचे काम चालू आहे. जरुर या.'' वाच्छानी.

''हो जरुर येईन, मी पण गेलो नाही बऱ्याच वर्षात शिर्डीला. नक्की येईन, येण्यापूर्वी फोन करेन !'' मी.

योगायोग असा की नाशिकला अखिल भारतीय सम्मेलन होते. तेथे जाणे होतेच. त्यांना कळविले, त्यांनी माझ्यासाठी हॉटेल बुक केले आणि पुन्हा फोन केला.

''हॉटेल बुक केले आहे आपल्यासाठी... तुम्ही या !'' वाच्छानी.

मी म्हटले - ''नको, कॅन्सल करा. माझे माझे बुकींग साहित्य संमेलन-वाल्यांनी केले आहे. धन्यवाद !''

साहित्य संमेलनाचा कार्यक्रम तीन दिवसाचा होता. पहिल्या दिवशी उद्‌घाटना व्यतिरिक्त काही कार्यक्रम नव्हता. मी वाच्छानींना फोन केला. ते तेव्हा शिर्डीलाच होते. त्यांनी गाडी पाठवली आणि मी शिडीला पोहोचलो. दर्शनाला खूप गर्दी होती पण वाच्छानींनी VIP पास घेतल्याने दर्शन झटपट

झाले आणि  आम्ही नाशिकला निघालो.

रस्त्यात वाच्छानी सतत बोलत होते. अगदी हिंदुस्थानात आल्यापासूनचे सगळे सुख-दु:खाचे, संघर्षाचे दिवस... सारे काही सांगितले त्यांनी. आणि मी कान देऊन ऐकत होतो. आणि ते बोलतच होते.

‘‘साहेब ! तुमच्यासारखी देव माणसे भेटणे कठीण, अहो येथे तुमच्या खात्यात पैसे दिल्याशिवाय पेपर हलत नाही !’’ वाच्छानी.

मी काहीच बोललो नाही.

‘‘साहेब तुम्ही मला प्रथमच भेटत आहात. माझे आयुष्य संघर्षात गेले आगदी बालपणापासून आजपर्यंत. इमानदारीत कष्ट करीत काम करीत आहे. उत्तमात उत्तम काम आपल्या हातून व्हावे, यासाठी प्रसंगी कमी पैशात काम केले आहे. त्यातील एक काम म्हणजे बी.एम.सी.ची इमारत. मी जे काही कमावले त्यातील बरेच संस्थांना दान केले. कारण मी जे भोगले ते कोणाच्या नशिबी येऊ नये हाच त्या मागचा लद्देश होता. अनेक शिक्षण संस्थांना दान केले. कारण माझे शिक्षण मी पूर्ण नाही करु शकलो हेच त्याचे कारण.

मी मन लावून ऐकत होतो त्या प्रवासात. पण मध्येच मी जेव्हा त्यांच्याकडे पाहिले. त्यांचे डोळे अश्रूंनी डबडबले होते. मी त्यांचे बोलणे थांबवले. मी त्यांना जवळ घेतले आणि त्यांचे डोळे पुसले.

‘‘मला माझ्या आई-वडीलांची आठवण झाली.’’ वाच्छानी.

पण ते थांबायला तयार नव्हते....

‘‘साहेब, भारत पाकीस्तानची फाळणी झाली तेव्हाची गोष्ट. माझे सगळे कुटूंब विस्थापित झाले. आई-वडील त्या प्रचंड गर्दित कोठे हरवले माहीत नाही. तेव्हा मी फक्त १० वर्षाचा होतो. पाय नेतील तिकडे जात होतो... सोबतच्या लोकांबरोबर. ना कोणी ओळखीचे ना पाळखीचे. पण सगळे समदु:खी. कच्चा रस्ता, धुळीचे लोट लोकांच्या चालण्याने उठत होते. काही लोक बैल गाडीतून जात होते. पण मी एकटाच होतो. पुन्हा पुन्हा रडू येत होते. पोटात भुकेचा आग-डोंब. सगळेच रित्या हाताचे... कोणाजवळ काय मागणार!’’ वाच्छानी.

आणि पुन्हा त्यांचे डोळे अश्रुंनी भरले. असे काही ऐकायला मिळेल असे काही ऐकायला मिळेल असे वाटले नव्हते मला. थोडा वेळ थांबून त्यांनी पुन्हा मला सांगायला सुरुवात केली. मला वाटले हे मला का सारे सांगत

आहेत. हा काहीतरी पुर्व जन्मीचा ऋणानुबंध असावा असे राहून राहून वाटत होते.

उन्हाळा कडक होता. आम्ही चालतच होतो. माझा वेग तो काय ? सोबतचे लोक पुढे पुढे जात होते. पायातल्या चपलाही फाटल्या होत्या. पण तरीही चालणे चालूच होते. रात्री कोठेतरी लोक थांबे. मी ही तेथे थांबे. कोठे पाणी मिळे, कोठे खायला मिळे... मला एक लहान मुलगा पाहून. खूप सोसले मी त्या चार दिवसाच्या प्रवासात.

आणि आम्ही हिंदुस्थानच्या बोर्डरवर येण्यापूर्वी समजले जे लोक आगगाडीने येत होते त्या दिड-दोन हजार लोकांना मुस्लमानांनी कापून टाकले. मला वाटले माझे आई-वडील तर त्या गाडीत नसतील ना ? माझ्या डोक्यातून त्यांच्या आठवणींने अश्रूंच्या धारा वहात होत्या. मी एकाकी होतो. खाली जमीन आणि वर आकाशाचे छप्पर होते बस्स. फाटके तुटके कपडे, पाय चालून सुजले होते, प्रचंड थकवा आला होता. आधार घ्यावा तरी कोठे? आणि त्या आगगाडीतील घटनेनंतर प्रचंड टेन्शन आले होते. आपण आपला जीव वाचविला पाहिजे. यासाठी सतत चालत होतो आणि एकदाची आम्ही बॉर्डर ओलांडली. हायसे वाटले. सुटलो एकदाचे. जवळ कोणी नातेवाईक ना कोणी प्रेमाचे. लजाड माळासारखे सगळे आयुष्य समोर होते. हा प्रवास बरेच काही शिकवून गेला मला.

माझा भविष्यकाळ मला काळाकुट्ट वाटत होता. पुढे काय? असा विचार करण्याचे ते वय नव्हते. पण जेव्हा आम्ही भारतात आलो. इथले संपूर्ण वातावरण वेगळे होते. सुरक्षित वाटत होते. येथे खूप टेंट बांधले होते. लोक त्यात आसरा घेत होते. खाण्यासाठी अन्नाची गरज होती. मोठ-मोठ्या रांगा लावून लोक लभे असलेले दिसत होते. पण तरीही मी एकटा होतो, आई-वडिलांची आठवण येई, ते कोठे असतील, की नसतील या जगात ? आठवण येई आणि डोळे पाण्याने भरत. गेले अनेक दिवस एक सलवार आणि एक कुडता हाच काय तो अंगावर होता. बस !

एके दिवशी एका संध्याकाळी एका कुटुंबाबरोबर मी स्थिरावलो. मग त्यांची पाठ मी सोडली नाही. पण भारत सरकारने माझ्यासारख्या मुलांची वेगळी व्यवस्था केली होती. कपडे, चप्पल सारे काही दिले. तिथे थोडे दिवस थांबल्यावर माझी धडपड सतत चालू होती ती काहीतरी शिकण्याची. आणि

त्याच दिवशी नावांची नोंदणी झाली. कोठून आले, आई-वडील कोण, साऱ्याची नोंद झाली आता मी स्वतंत्र होतो. माझा पाकीस्तानशी काहीही संबंध नव्हता. आता मी पूर्णपणे भारतीय झालो होतो. आता माझे भवितव्य तिथेच घडवायचे होते. मनात काहीतरी भव्यदिव्य करावे अशी मनिषा या लहान वयात जागली आणि स्वप्न रंजनात दिवस जाऊ लागले. पण ती स्वप्नेच होती.

पण या स्वप्नांना छेद मिळाला, जेव्हा मी पाहिले आमच्या तंबूजवळ एका इमारतीचे काम चालू होते. रोज पूरा दिवस मी व्हरांड्यात बसून त्या इमारतीचे काम पहात असे. अनेक कामगार त्यात पाकिस्तानहून आलेले होते. माती, विटा, सिमेंट उचलण्याचे काम करत होते. मजुरी मिळे ते खूश होते. ते खूश होते कारण जेवण तंबूजवळील भटारखाण्यात ओळीने मिळत होते. मी मात्र ह्या वयात स्वप्नांचे डोंगरच लभे करत होतो. असे वाटत आपण त्या इमारतीच्या मालकाला भेटावे काम मागावे. अर्धीमुर्धी तरी मजुरी मिळेल. एक दिवस आपणही अशी इमारत बांधू. आपली बांधकाम करणारी कंपनी असेल. बालपणातले सगळे कष्ट पुन्हा सुखात परावर्तित होतील.

आणि एक दिवस मी त्या मालकाला भेटलो.

''शेठ ! काही काम मिळेल का ?''

''हो ! पण तु अजून लहान आहेस !''

''मी लहान असलो तरी काहीतरी झेपेल ते काम करीन जी मजूरी द्यायची ती द्या !'' वाच्छानी.

''ठीक, तू माझ्या ऑफिसमध्ये ये.'' मालक.

''आणि दुसऱ्या दिवशी मी त्या मालकाच्या ऑफिसमध्ये आलो. ते ऑफीस बघून माझ्या स्वप्नातला एक तुकडा जागा झाला. ''अरे एक दिवस तुझीही अशी केबीन असेल!'' असे मला त्या क्षणी वाटले आणि मी बुडालो स्वप्न सागरात क्षणभर. मी बराच वेळ त्या शेठ समोर उभा होतो.

''अरे ये बाळ!'' मालक

''काम करोगे ना.''

''हां, जी.''

''पहला यह ऑफिस संभालो।'' मालक.

मी दिवसभर ऑफिसात वावरत होतो. कोण काय करतय ? कसे

करतय? मालकाची स्टाईल.... जेवताना, बोलताना, खाताना-पिताना... सार आत्मसात केले मी. मी मोठा होत होतो, शिकत होतो. आणि स्वप्नांना छेद देण्याची मनोमन इर्षा करीत होतो.

माझी अडचण होती ती शिक्षणाची, चौथी-पाचवी शिकलेला मी, पण ज्या वातावरणात वाढलो तेच शेवटी माझे भांडवल झाले. जीवनभर लपयोगी पडले मला. एक दिवस ते मालक म्हणाले, ''बेटा तू हुशार आहेस. या शहरात माझी दुसरी कंपनी आहे. मला छोटी-मोठी कॉन्ट्रक्ट मिळतात. माझ्याकडे वेळ नाही ते पहायला. तू ते काम पहा. तू समज तुझीच कंपनी आहे. बस... तो शगुन होता मला. मी हो म्हणालो आणि काम पाहू लागलो.

त्यावेळी मी १७-१८ वर्षाचा होतो. त्या मालकांचा मी आवडता झालो होतो. मी विश्वासाला पात्र झालो होतो. आणि आपले काम इमाने इतबारे करीत होतो. त्या पूर्वीच्या चार वर्षात मी रात्रीच्या शाळेत जात होतो. लर्दू हिंदीबरोबर इंग्रजी ही तोडके मोडके येत होते. मात्र मी हिशोबात तरबेज झालो होतो. त्या मालकाने ती कंपनी माझ्या नावावर केली. आणि एका वेगळ्या अनुभूतीचा अनुभव आला.

पण हे सगळे तात्पुरते होते माझ्यासाठी ! मला इथे थांबायचे नव्हते. रात्री, दिवस मला डोळ्यासमोर दिसे ती अनेक मजली इमारत. आणि योग आला. पाकिस्तानातून आलेल्या निवासीतांसाठी सरकारने घरे बांधण्यासाठी टेंडर काढले. माझ्या मालकाला ते टेंडर लागले. आणि माझी रवानगी केली कल्याण, उल्हासनगरला. ह्या संधीचा मी फायदा उचलला. त्यावेळी मी वीस वर्षाचा असेन. बांधकामाचे सारे खाच-खळगे मी इथेच शिकलो. दिवस रात्र काम करीत होतो. एक दिवस मालकाची फेरी अमृतसरहून कल्याणला आली. मालकाने माझे काम पाहिले आणि त्या कंपनीचा बिनभांडवली पार्टनर करुन टाकले. म्हणजे पैसा मालकाचा आणि मी मात्र मालक. मालक एक दिवस मला म्हणाले, ''राम ! जिंदगी में सबसे बडा रुपैया है। वही भगवान है। ध्यान मे रखो।''

आणि तोच रुपयाचा मंत्र जपण्याचा मी विचार केला आणि जपला जीवनभर, भगवंतासारखा...! - राम

लग्न झाले माझे आणि जोतीचा जन्म झाला. तिचा मोठा पायगुण आणि मी 'जोती कंन्स्ट्रक्शन' ही कंपनी स्थापन केली आणि जीवनात प्रचंड बदल

माझ्यात झाले. प्रथम मी बांधकामाची कामे घेऊ लागलो. प्रचंड काम, उत्तम काम यामुळे माझ्या कंपनीचे नाव ही नाशिकमध्ये झाले. माझ्या कंपनीचे नाव भव्यदिव्य व्हावे अशी मनिषा केव्हापासून माझ्या मनात होती. पण ती साकार व्हायला पुढे वीस वर्षे गेली. आणि त्याचवेळी शिर्डीच्या साईनाथांच्या भक्त निवासाची टेंडर मला लागली. म्हणजे ज्योती कंपनीला. कारभार वाढला. बँकांनी मदत केली, कामे लभी राहू लागली. आणि खरे सांगू पैशाचा पाऊस पडू लागला.

मी गरीबीच्या खस्ता खालेल्या, खिशात एक पैसा नव्हता. जेव्हा हिंदुस्थानात आलो, पैसा काय करु शकतो आणि तो कमविण्यासाठी किती कष्ट घ्यावे लागतात याची जाणीव मला होती. मी माझ्या पूर्वीच्या शेठने सांगितल्या-प्रमाणे पैशालाच देव मानीत आली. त्या पैशाला सन्मान देण्याचे ठरविले आणि त्याचा विनियोग शिक्षणासाठी, गरीबांसाठी केला. पण भिक नाही दिली कोणाला. कष्ट करा आणि कमवा. तुम्ही धडधाकट आहात. कष्ट करु शकता.  मी त्या हातांना काम दिले. आणि शिर्डीचे काम जोरात सुरु होतेच. मी एकटा होतो दुसरा कोणी कुटुंबातला मदतीला नव्हता, म्हणून माझ्या पत्नीच्या भावांना बरोबर घेतले. कारण माझे शिर्डीला दररोज जाणे होत नव्हते. ते तरुण होते. त्यांनाही लभे केले. सन्मान दिला. काम दिले आणि ती दोन्ही कुटुंबे नाशिकमध्येच स्थिरावली.

माझी कन्या ज्योतीही सी.ए. झाली. टाईम्स ऑफ इंडियामध्ये नोकरी करु लागली. तिच्यासाठी ताजमहल हॉटेलशेजारी एक फ्लॅट घेतला. आता नाशिक मुंबई सुरु झाले. माझे वय वाढत होत. आता वयाची सत्तरी मी पार केली. थकलो होतो. पण व्यवसाय चालू होता.

नाशिकमध्ये भव्यदिव्य असे कन्स्ट्रक्शन लभे रहावे असे नेहमी वाटे. पण मार्ग सापडत नव्हता. ती संधी चालत आली. नाशिकच्या बी.एम.सी. ऑफिससाठी एक मोठी बिल्डींग बांधण्याच ठरले. मी टेंडर भरले कमीतकमी. मला यातून फायदा नको होतो. एक ज्योती कंपनीने बांधलेली वास्तू होणे हे माझे लद्दिष्ट्य होते. आणि ही प्रतिष्ठेची इमारत उभी राहिली. मी फायद्याचा-तोट्याचा विचार केला नाही आणि सुंदर इमारत आज दिमाखात उभी आहे आणि सुंदर इमारत आज दिमाखात लभी आहे आणि त्याखाली पाटी आहे ज्यावर माझ्या ज्योती कंपनीचे नाव हे ''ज्योती कन्स्ट्रक्शन''. मी भरुन

पावलो.

साहेब, आता माझ्या मनातली सगळी उद्दिष्टचे सफल झाली. माझे मेहूणे कंपनी सांभाळीत होते, आणि मी निवृत्तीकडे झुकलो होतो.

साहेब ! हे सगळे का सांगितले. तर या भारत देशाने मला पाय ठेवायला जागा दिली, आकाशाचे छप्पर दिले. भरुन पावलो मी. तुमच्यासारखा दोस्त भेटला. हे माझे महत्त भाग्य. आजवर मी स्वच्छ व्यवहार केला धंद्यात. जीवन सफल झाले साहेब...! पण एक ध्यानात ठेवा साहेब. जीवनात 'पैसाच' महत्त्वाचा आहे आणि तो जर इमानदारीने, कष्टाने कमावला असेल ना तर सुख चालत येईल पायाशी. समाधान हेच सुख दुसरे काही नाही. मी ज्या परिस्थितीत इथे आले.. काय होते माझ्याजवळ ? पण माझ्या इमानदार स्वभावाने जग माझ्याकडे चालत आले. माझे झाले.

जीवनात दुःख आणि सुख म्हणजे काय असते हे समजून त्या शिदोरीशी इमानी राहिले तरच जीवन सफल होईल.

खूप बोललो साहेब. पहा नाशिक आले... आता तुम्ही तुमचे साहित्य सम्मेलन करा... पण पाहुणचार माझ्याच घरचा घ्यायचा !

मी अजून कोणत्या जीवन प्रवाहात वावरत होतो, हरवलो होतो... त्यांच्या जीवन प्रवाहात...

'हो.' मला नाही म्हणता येईना आणि मी दोन दिवसांनी मुंबईला आलो. त्याचे बोल माझ्या कानात घूमत होते.... सतत जीवनाचे साफल्य आणि अंतरचक्षुसमोर त्यांची छबी !

०–०–०

# दरवळ

नंदन IRS झाला आणि त्याची पहिली पोस्टींग जम्मूला झाली. मसुरीची दिड वर्षाची ट्रेनिंग पूर्ण करून तो जम्मूच्या इनकम टॅक्स ऑफीसमध्ये रूजू झाला. त्या काळात जम्मूमध्ये फारशी वस्ती नव्हती. पण जेव्हा काश्मीरातल्या अतिरेक्यांनी सगळ्या हिंदूना पळवून लावले तेव्हा सरकारने काही कॅम्प बांधून त्यांची व्यवस्था केली. अशी पंचवीस-तीस हजार कुटुंबे बेघर होऊन येथे आली आणि त्यांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी 'नंदन' या तरूण अधिकाऱ्यांवर सरकारने टाकली. सारे काही स्थिर होत असताना नंदनची बदली श्रीनगरला झाली. तिथल्या इनकम टॅक्स ऑफीसमध्ये. तिथे नव्याने त्या खात्याची पुर्नरचना करून काम सुरू केले. सध्या नंदन तिथल्या इनकम टॅक्स कमीशनर विरेन माथूर यांचा Ac (Ha) पोष्टवर होता.

इनकम टॅक्सच्या अपीलाची अनेक प्रकरणे तशीच प्रलंबित होती. ती बहुतेक श्रीनगरमधल्या वापाऱ्यांची होती आणि त्याचा निपटारा ताबडतोब करावा अशी सूचना फायनान्स मिनिस्टरने केल्याने एक कॅम्प मुंबईच्या ITAT ची एक टीम तेथे पाठविण्यात आली व त्यांचे ऑफीस श्रीनगरमधल्या सरकारी इमारतीत सुरू झाले, अर्थात ती जबाबदारीही नंदनलाच पार पाडावी लागली आणि श्रीनगरला अनेक वेळा त्याचे येणे जाणे सुरू झाले.

नंदन हा तरूण, एकटाच असल्याने तो तेथील सरकारी रेस्ट हाऊसवर लतरत असे. आठवड्यातून एक दिवस तरी त्याची तेथे व्हिजीट असे. तो मार्च महिना होता. ITAT च्या कामाला सुरूवात झाली त्याचा होऊन गेला होता. त्या आल्हादकारक हवामानात नंदनने एक आठवडा थांबायचा विचार केला. त्याच्या ITAT च्या इमारतीमध्ये सरकारच्या अनेक खात्यांची कार्यालये होती. त्यात भारत सरकारच्या 'टुरीस्ट' डीपार्टमेंटचेही कार्यालय होते.

तो रविवार होता. कामाच्या धावपळीत नंदनने अजून पूर्ण श्रीनगर पाहिले नव्हते म्हणून हा रविवार कारणी लावावा असे ठरवून नंदनने आपल्या सरकारी गाडीने गुलमर्गला जायचे ठरवले आणि सकाळीच त्याने तेथे प्रयाण केले. त्यावेळी श्रीनगरचे हवामान थंड अगदी अल्हादकारक होते. प्रथम सकाळी त्याने श्रीनगरचा सनराईज पॉईंट पाहिला आणि धाब्यावर छानसा रोटी राजमाचा नाष्टा केला. त्याकाळात भारतातून अनेक टुरीस्ट आले होते. आणि

मग तो गुलमर्गला आला. त्याच्या गाडीला भारत सरकारचा तिरंगा होता. त्यामुळे त्याला VIP ट्रिटमेंट तेथील टुरीस्ट डीपार्टमेंटच्या अधिकाऱ्यांनी दिली आणि त्याची रहायची व्यवस्था VIP सुटमध्ये केली. त्या रिसॉर्टमध्ये जेवणाचीही व्यवस्था होती.

रात्री ८ वाजता नंदन बाहेर व्हरंड्यात बसला होता. येवढ्यात त्याचे लक्ष गेले. त्याच्या शाळेतली मैत्रिण स्नेहा बाहेरून आली. नंदनला तिला पाहून खूप आश्चर्य वाटले, ही येथे कशी? नंदनला तिने पाहिलेच नाही.

''स्नेहा!'' नंदन.

आणि या नावाने हाक मारताच ती थांबली आणि नंदनला येथे पाहून आश्चर्य वाटले आणि...

''अरे! नंदन तू येथे कसा? आणि बाहेर लाल दिव्याची गाडी बघून तिने सिक्युरिटीला विचारले'' –

''यह गाडी किसकी?'' स्नेहा.

''ये साब की!'' सिक्युरीटी.

आणि क्षणभर ती तेथेच थबकली आणि आत जाण्यापूर्वी ती नंदन जवळच्या खुर्चीत बसली.

''आश्चर्य वाटले मला! तुला येथे पाहून ! तुझी पोस्टींग कोठे आहे?''

''जम्मूला! पण सध्या मी डेप्युटेशनवर आहे. श्रीनगरला!'' नंदन.

''अरे वा! मग भेटी होणारच!'' स्नेहा.

''हो! मी Govt. Rest house मध्ये थांबलो आहे. अजून एक आठवडा तरी नक्की आहे येथे!'' नंदन.

''तु कोणत्या बॅचची ? १९७२ ची!'' स्नेहा.

''मी ही! त्याच बॅचचा! पण आपली डिपार्टमेंट वेगळी! म्हणून भेट झाली नाही!'' नंदन.

''तू एकटाच आला आहेस कां? लग्न वगैरे केलीस कां?'' स्नेहा.

''नाही.'' नंदन.

''चल! आपण लद्या भेटू! येथे लद्या खूप बर्फ पडणार आहे. तुझी गाडी गॅरेजमध्ये ठेवायला सांगते! लद्या कोठेही बाहेर जायचे नाही! वादळाची शक्यता आहे! आताच मेसेज आला आहे!'' स्नेहा.

''मला जेव्हा हवामान क्लीअर होईल तेव्हा, खिलन मर्गला जायचे आहे!

नंदन.

''जरूर!'' स्नेहा.

''अग पण तू नाही सांगितलेस लग्न केलंस कां तू ते!'' नंदन

''नाही! ही पोस्टींग खूप खडतर आहे! सतत VIP येत असतात! लग्नाचा विचार करायला फूरसत कोणाला आहे! येथून सुटका झाल्यावर पाहू!'' स्नेहा.

ती आणि नंदन आपआपल्या सुट मध्ये गेले.

पुढचे तीन दिवस खूप बर्फ पडला रस्ते ब्लॉक झाले. पंतप्रधान येणार होते पण त्यांचा दौरा स्थगित झाला आणि स्नेहाने सुटकेचा सुस्कारा सोडला.

मग काय नंदन, स्नेहा मोकळेच होते, गप्पांचे फड तासन-तास चालू होते, जेवण ही बरोबर होई, पूर्वी फक्त तोंड ओळख होती पण, आता दोघांची ओळख आणि पुढे मैत्रित रूपांतर व्हायला वेळ लागला नाही. दोघेही आपल्या मनात एकमेकांबद्दल विचार करीत होते. अजून दोघेही अविवाहीत तेव्हा... कुछ-कुछची ठिणगी दोघांच्या ह्रदयात कधी पडली हे त्यांनाही समजले नाही.

अजून नंदनने श्रीनगर पूर्ण पाहिले नव्हते. मुगल गार्डन आणि जवळ पासचे सगळे पॉईंट पहायचे बाकी होते पण ते श्रीनगरला आल्यावर.

दुसऱ्या दिवशी वातावरण निवळले. नंदन आणि स्नेहा आपआपल्या गाडीने श्रीनगरला आले.

आणि ही जोडगोळी श्रीनगरला नंदनच्या गाडीतून भटकंतीला निघाले. हवामान स्वच्छ होते त्यांनी मुगल गार्डनमध्ये पाय टाकले आणि अचानक जोरदार पावसाची सर आली. नंदनने स्नेहाचा हात धरून तिला जवळच्या झाडाखाली आसरा घेतला. दोघेही ओलेचिंब झाले होते. पावसामुळे चार वाजताच छान फुलांचा सुगंध सगळ्या परिसरात पसरला होता आणि गेले अर्धा तास ते एकमेकांजवळ पावसाच्या शिडकाव्यापासून एकमेकांचे संरक्षण करीत होते. अजून मोठी सर येईल म्हणून त्या दोघांनी गाडीत बसून श्रीनगर मधल्या रेस्ट हाऊसकडे प्रयाण केले आणि पंधरा मिनिटात आले.

मग फ्रेश होऊन दोघांनी बरोबर डीनर घेतले. मग भेटी होतच राहिल्या.

त्याच आठवड्याच्या शनिवारी ITAT चा Camp संपला आणि त्याच दिवशी स्नेहाचा निरोप घेऊन ते जम्मूला जाणार होता. पण स्नेहाने नंदनला

थांबविले आणि रात्रीचे डीनर त्याने बाहेर थ्री स्टार हॉटेलमध्ये घेतले आणि दुसऱ्या दिवशी सकाळी नंदन जम्मूला परतला.

या दोघांच्या मनात प्रेमाचा अंकूर केव्हाच उमलला होता आणि दोघांच्याही जम्मू – श्रीनगर – जम्मू अशा वाऱ्या होत राहिला आणि म्हणून एका शुभ मुहुर्तावर श्रीनगरच्या शंकर मंदिरात विधीवत विवाह केला. दोन मनांचे मिलन झाले. नंदनने स्नेहाची बदली जम्मूला करून घेतली आणि या दोघांचा प्रपंच सुरू झाला. त्याची सुरूवात मोगल गार्डन मधल्या धूव्वाधार पावसाच्या सरींनी, आहे की नाही नवल!

तो सुंदर फुलाचा दरवळ त्यांच्या जीवनात रंग भरत गेला आणि हनिमुनसाठी दोघेही मुंबईहून महाबळेश्वरला रवाना झाले!!

०–०–०



**लेखक**

# ॲड. यशवंत बाबुराव कदम

**(नमनेश्वर)**

यशवंत कदम यांच्या **''हळव्या मनाची पाखरे''** या कथासंग्रहातील कथा म्हणजे त्यांच्या जीवनातल्या अनुभवांचा परिपाक आहे. या कथांमधून सर्वसामान्य माणसांच्या जीवनातील सुख–दुःखाच्या परिस्थितीची जाणीव व्यक्त झाली आहे.

कदम यांनी समाजात घडणाऱ्या घटना सूक्ष्म निरीक्षणातून शब्दबध्द केल्या आहेत. त्यांनी वर्णन केलेल्या प्रसंगांना दृश्यात्मकता प्राप्त झालेली आहे. कथांची मांडणी अगदी सहज परंतु, परिणामकारकरीत्या केलेली दिसते, त्यांच्या निवेदनशैलीत रसिक वाचकाला सोबत घेऊन जाण्याची ताकद आणि कथानकात गुंतवून ठेवण्याचची हातोटी आहे.

लेखक मुळात कवी असल्याने त्यांच्या लेखनास काव्यात्मकता प्राप्त झाली आहे. त्यांनी आपल्या कथा लेखनासाठी स्वतःची एक वेगळी शैली निर्माण केलेली आहे.

**– कमलाकर राऊत**

कवी व समीक्षक